वर्षः पहिले

# समपथिक

समपथिक ट्रस्ट (रजि. नं.: ई ३६६२, पुणे)




मूल्य ₹१००/-

समलिंगी, उभयलिंगी, द्विलिंगी व तृतीयपंथी

विषयावरचा वार्षिक दिवाळी अंक 2019

e-version 1.0. May 2020

SAMAPATHIK TRUST

# समपथिक ट्रस्ट

(रजि. नंबर ई३६६२)

**पहिला मराठी समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी दिवाळी अंक-२०१९**

**दिनांक** : १० ऑक्टोबर २०१९, पुणे

**संपादक** : बिंदुमाधव खिरे

**Email** : samapathik@hotmail.com

**Contact** : 9763640480

**मुखपृष्ठ** : नीलम नागवेकर

**मुद्रितशोधन** : मीरा बेगमपुरे

**मुद्रण** : अनिल उकरंडे, चंद्रशेखर बेगमपुरे

**मूल्य** : १०० रुपये

● या दिवाळी अंकातील लेख, माहिती, कविता, गोष्ट, नाटक यांचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे आहेत. यातील कुठचाही मजकूर वापरावयाचा असल्यास लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

● **अपवाद**-IPS व WPA ची मराठी अनुवादित लैंगिकतेवरील भूमिका व भा.दं.सं ३७७ चा फ्लो-चार्ट, अनुवादकर्त्यांना व समपथिक ट्रस्टला श्रेय देऊन, आपण हे समाजप्रबोधनासाठी त्यांची संमती न घेता ना-नफा तत्त्वावर वापरू शकता.

● या दिवाळी अंकातील लेख, माहिती, कविता, गोष्ट, नाटक यातील मतांशी संपादक-बिंदुमाधव खिरे, मुद्रक- अनिल उकरंडे, चंद्रशेखर बेगमपुरे, अर्थसाहाय्य देणारे -VIIV, द हमसफर ट्रस्ट, समपथिक ट्रस्ट सहमत असतीलच असे नाही.

अर्थसाहाय्य

ViiV Healthcare | Being Equal — Being LGBTQ in India | SAMAPATHIK TRUST | THE HUMSAFAR TRUST

**माननीय**

**दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजित प्रकाश शाह,**

**न्यायमूर्ती एस. मुरलीधर**

**व**

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा,**

**न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर,**

**न्यायमूर्ती आर. एफ. नरीमन,**

**न्यायमूर्ती डॉ. डी. वाय. चंद्रचूड,**

**न्यायमूर्ती इंदू मल्होत्रा**

**यांस**

**आदरपूर्वक अर्पण**

आपल्या भा.दं.सं. कलम ३७७ च्या ऐतिहासिक निकालामुळे
आम्ही अंधारातून उजेडात आलो.

## अनुक्रमणिका


| नाव | साहित्य प्रकार | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| | अंकाचे अर्पण | | |
| | प्रास्ताविक | | |
| शब्दकोश | कोणते शब्द वापरावे? | बिंदुमाधव खिरे, सुरेश खोले, पुष्कर एकबोटे व सौरभ बोन्द्रे | ६ |
| न्यायदेवतेचा आम्हाला आधार | ३७७ निकालाचा, काही महत्त्वपूर्ण परिच्छेदांचा मराठी अनुवाद | अनिल उकरंडे | ११ |
| ३७७-फ्लोचार्ट | ३७७ केसचा प्रवास | बिंदुमाधव खिरे | १४ |
| ए.सी.पी. भानुप्रताप बर्गे | शुभेच्छा लेख | बिंदुमाधव खिरे | १८ |
| त्रिदेव गौडा | तृतियपंथी (ट्रान्समॅन)ची मुलाखत | - | २० |
| सजातीय ध्रुव | कथा | संदेश कुडतरकर | २४ |
| तृतीय-प्रकृत लैंगिकता व पौराणिक पात्रे | लेख | सागर बर्वे | २७ |
| बिनयवांगा वायनयना | श्रद्धांजली | बिंदुमाधव खिरे | ३२ |
| बॉलीवूड आणि समलैंगिकता | लेख | ओंकार जोशी | ३३ |
| समलिंगी जोडपी | काही भारतीय समलिंगी जोडपी | - | ४० |
| यवतमाळ येथील पहिला समलिंगी विवाह | या लेखातील काही भागाचा अनुवाद | सौरभ बोन्द्रे | ४५ |
| - | कविता | सुरेश खोले | ५० |
| गोष्टी सांगेन लैंगिकतेच्या चार | लेख | अनुज घाणेकर | ५४ |
| नव्या वेशीच्या पल्याड | लोकसत्तातील लेख | अशोक राव कवी | ५७ |
| महापालिकेमधले देवदूत | लोकसत्तातील लेख | अशोक राव कवी | ६० |
| सिसा शर्मा | समलिंगी स्त्रीची मुलाखत | - | ६४ |
| मूकनायक- पहिले मराठी समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी, व्दिलिंगी साहित्य संमेलन(२०१८) | कोलाज | - | ६६ |
| माय लव्ह फॉर साधना | आत्मकथन | दीपांकर बॅनर्जी | ६९ |
| प्रवासातील असाही अनोखा अनुभव | आत्मकथन | उमेश देशपांडे | ७३ |
| - | कविता | संदेश कुडतरकर | ७६ |
| आत्मकथन | तृतीयपंथी (ट्रान्सवूमन) | विजया वसावे | ७८ |
| - | कविता | अभिलाष चौधरी | ८२ |
| बेरीज-वजाबाकी | LGBTI वरील काही महत्त्वाच्या घडामोडी | बिंदुमाधव खिरे | ८३ |
| रात्रीत उघडलेली गुपिते | कथा | राहुल शिंदे | ८७ |
| अद्वैत- पुणे आंतरराष्ट्रीय क्वियर चित्रपट महोत्सव (२०१९) | कोलाज | - | ९३ |

| नाव | साहित्य प्रकार | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| फेरा | नाटक-मोनोलॉग | बिंदुमाधव खिरे | ९५ |
| ट्विट-ट्विट | ट्विटस् | - | १०२ |
| आमचे (भिन्नलिंगी) दोन शब्द | अनुभव | अमोल शिंदे, अस्पाक फकिर | १०४ |
| IPS- भारतीय मानसोपचार संघटनेचं समलिंगी, परालिंगी लैंगिकतेबद्दलची भूमिका | मराठी अनुवाद | सुरेश खोले, बिंदुमाधव खिरे, अनिल उकरंडे | १०६ |
| WPA- जागतिक मानसोपचार परिषदेची समलिंगी, परालिंगी लैंगिकतेबद्दलची भूमिका | मराठी अनुवाद | सुरेश खोले, बिंदुमाधव खिरे, अनिल उकरंडे | १०९ |
| शांती | द्विलिंगी (इंटरसेक्स) व्यक्तीची कथा | बिंदुमाधव खिरे | ११३ |
| - | कविता | अभिजित गडाख | ११५ |

# संपादकीय : पहिल्या दिवाळी अंकाच्या निमित्ताने

मी पहिल्यांदा एक वार्षिक अंक काढण्याचा प्रयत्न केला तो २००३ साली. अगदी माफक– १६ पानी अंक काढला. त्याचं नाव होतं 'साथीदार'. तो फक्त 'गे' (समलिंगी) विषयावरच होता. इतर म्हणजे उभयलिंगी, तृतीयपंथी, द्विलिंगी पैलू त्यात नव्हते. पुढचे वर्ष म्हणजे २००४ साली 'साथीदार'चा दुसरा वार्षिक अंक काढून मी हा पूर्णपणे फसलेला प्रयोग बंद केला. माझ्याकडे अनुभव नव्हता, लेखक नव्हते आणि वाचक नव्हते.

पुढच्या दशकात ८ पुस्तके लिहून झाली व २०१८ ला पुण्यात पहिला एक दिवसीय समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी मराठी साहित्य संमेलन भरवले. त्या संमलेनानंतर विचार आला, की हा छोटासा प्रयोग परत एकदा करावा. १५ वर्षांनंतर मला थोडा जास्ती अनुभव आला आहे आणि लेखक व वाचकही थोडे वाढले आहेत.

याला कितपत प्रतिसाद मिळणार? दर वर्षी असा अंक काढला जावा अशी मागणी असणार का? आणि असली तरी आपण ती पूर्ण करू शकू का? हे सगळे प्रश्न जसे २००३ साली होते तसे आजही आहेतच (म्हणून नमुन्यादाखल २००३ च्या अंकाच्या संपादकीय लेखातील एक उतारा व २००४ च्या संपादकीय लेखातील एक उतारा खाली दिला आहे). पण जित्याची खोड....

**बिंदुमाधव खिरे**

**ऑक्टोबर २०१९**

**कोण विकत घेणार?** ('साथीदार' वार्षिक २००३)

काही मित्रांना विचारल्यावर लक्षात आले, की बहुतेकजण हा अंक विकत (किंवा) फुकट घ्यायला तयार नाहीत... कारण हा अंक घरी घेऊन जाता येणार नाही... ते कदाचित एका अंकाचे पैसे देतील पण अंक घेणार नाहीत. त्यामुळे या वेळी फक्त ५० अंकच काढायचे ठरविले......

**बिंदुमाधव खिरे**

**प्रतिसाद** ('साथीदार' वार्षिक २००४)

मागच्या अंकाला अपेक्षेप्रमाणे खूप कमी प्रतिसाद मिळाला. डीस्ट्रिब्युशन हा एक महत्त्वाचा प्रॉब्लेम आहे. मराठी वाचक हा अंक घरी घेऊन जाऊ शकत नाहीत हा दुसरा प्रॉब्लेम आहे. तरीही हा अंक जेवढी वर्षे शक्य होईल तोवर काढणं गरजेचं आहे. होमोफोबिक प्रवृत्ती विरुद्ध आवाज उठवणारी मासिकं असणं काळाची गरज आहे....

**बिंदुमाधव खिरे**


## हा अंक काढण्यास ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सर्वांचे मनापासून आभार

- VIIV, द हमसफर ट्रस्ट
- श्री. अशोक राव कवी (अध्यक्ष, हमसफर ट्रस्ट, मुंबई)
- श्री. विवेक राज आनंद (मुख्य कार्यकारी अधिकारी, हमसफर ट्रस्ट, मुंबई)
- लोकसत्ता चतुरंग, आरती कदम ('नव्या वेशीच्या पल्याड' व 'महापालिकेमधले देवदूत' हे अशोक राव कवी यांचे लेख प्रकाशित करण्यास लोकसत्ता चतुरंगने परवानगी दिली.)
- अम्रितानंदा चक्रवर्ती– सर्वोच्च न्यायालयाच्या वकील
- सुरेश खोले, पुष्कर एकबोटे, सौरभ बोन्द्रे, अॅड. संतोष लोणकर
- नीलम नागवेकर
- चंद्रशेखर बेगमपुरे
- अनिल उकरंडे
- अरविंद नारायण, सिद्धार्थ नारायण,विक्रम डॉक्टर, सोपान मुलर, उमंग सेथ
- डॉ. गिताली वि. म., मुकुंद किर्दत यांनी 'असामी असामी' ('पुरुष उवाच' २०१३) या लेखातील काही भाग या अंकात ('आमचे दोन शब्द' लेख) छापण्यास परवानगी दिली.

# शब्दकोश

**शब्दसंकलन : बिंदुमाधव खिरे, सुरेश खोले, पुष्कर एकबोटे, सौरभ बोन्द्रे**

| इंग्रजी शब्द | जवळचा मराठी शब्द | ढोबळ अर्थी |
|---|---|---|
| Biological Sex | लिंग (शारीरिक लिंग) | शरीराची जननेंद्रीय |
| Gender / Gender Identity | लिंगभाव | आपण जग स्त्रीच्या का पुरुषाच्या नजरेतून बघतो व अनुभवतो तो आपला लिंगभाव असतो |
| Female | स्त्री | शरीराची जननेंद्रीय स्त्रीची असणे व लिंगगुणसुत्र XX असणे |
| Male | पुरुष | शरीराची जननेंद्रीय पुरुषाची असणे व लिंगगुणसुत्र XY असणे |
| Intersex | द्विलिंगी | ज्या व्यक्तीला जन्मतः काही अंशी स्त्रीची व काही अंशी पुरुषाची जननेंद्रिय असतात/ज्यांची लिंगगुणसुत्र XX किंवा XY यापेक्षा वेगळी असतात/ज्यांच्या दोन गोनाडस्‌मध्ये सलग्नता नसते अशा व्यक्ती |
| Feminine | बायकी | स्त्रियांची म्हणून समाजाने मानलेली गुणवैशिष्ट्ये व्यक्तीमध्ये दिसणे |
| Masculine | पुरुषी | पुरुषाची म्हणून समाजाने मानलेली गुणवैशिष्ट्ये व्यक्तीमध्ये दिसणे |
| Cisgender | सीसजेंडर (आधुनिक शब्द) | ज्या व्यक्तीचा शरीर व लिंगभाव एकरूप आहेत अशा व्यक्ती. उदा.१ शरीराने पुरुष असणं व लिंगभाव पुरुषाचा असणं. उदा.२ शरीराने स्त्री असणं व लिंगभाव स्त्रीचा असणं. बहुतेक व्यक्ती सीस-जेंडर असतात |
| Gender-fluid | अस्थिर लिंगभावी | ज्या व्यक्तीचा लिंगभाव कायमस्वरूपी पुरुषाचाही नाही व स्त्रीचाही नाही; ज्यांचा लिंगभाव कधी स्त्रीचा तर कधी पुरुषाचा असा अस्थिर असतो अशा व्यक्तींना अस्थिर लिंगभावी म्हणतात |
| Transgender | तृतीयपंथी/परालैंगिक | ज्या व्यक्तीचे शारीरिक लिंग व लिंगभाव यांत संलग्नता नाही अशा व्यक्ती. तृतीयपंथी दोन प्रकारचे असतात. तृतीयपंथी स्त्री (ट्रान्सवुमन) व तृतीयपंथी पुरुष (ट्रान्समॅन).<br>ट्रान्सवुमन- जन्मत: मुलग्याची जननेंद्रीय पण लिंगभाव स्त्रीचा असतो<br>ट्रान्समॅन - जन्मत: मुलीची जननेंद्रीय पण लिंगभाव पुरुषाचा<br><br>टिपणी: हा निसर्गाने दिलेला लिंगभाव बदलता येत नाही व हा आजार किंवा विकृती नाही |

| | | |
|---|---|---|
| Sex Reassignment Surgery (SRS) | लिंगबदल शस्त्रक्रिया | १.पुरुष → स्त्री : पुरुषाची जननेंद्रीय (सर्व किंवा काही भाग) काढून स्त्रीच्या जननेंद्रीयांची घडण करणे.<br>२. स्त्री → पुरुष : स्त्रीची जननेंद्रीय (सर्व किंवा काही भाग) काढून पुरुषाच्या जननेंद्रीयांची घडण करणे. |
| Sex Assignment Surgery (SAS) | लिंग घडवण्याची शस्त्रक्रिया | द्विलिंगी व्यक्तीच्या एका लिंगाशी सलग्न असलेले अवयव ठेऊन दुसऱ्या लिंगाचे अवयव काढून टाकणे. |
| Transsexual | परालैंगिक | १. काहीजण SRS झालेल्या ट्रान्सजेंडर व्यक्तीला ट्रान्ससेक्शुअल म्हणतात.<br>२. काहीजण ट्रान्सजेंडर व ट्रान्ससेक्शुअल हे समानार्थी शब्द म्हणून वापरतात. |
| Drag | ड्रॅग (आधुनिक शब्द) | विशिष्ट कार्यक्रमात ज्या व्यक्ती आपल्या शारीरिक लिंगाच्या विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीची वेषभूषा करतात अशा व्यक्ती (उदा. पुरुषांनी साडी नेसून लावणी म्हणणे/नाचणे.) |
| Crossdresser | प्रतीवेशी | ज्या व्यक्तींना आपल्या शारीरिक लिंगाच्या विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीची वेशभूषा करायला आवडते अशा व्यक्ती. (उदा. पुरुषानी साडी नेसणे) |
| Shemale | शीमेल (आधुनिक शब्द) | ज्या व्यक्तींनी कमरेवरील शरीर स्त्री समान ठेवलेलं असतं (उदा. स्तन बसवणे, केस वाढवणे इत्यादी) व कमरेखालील शरीर पुरुषाचं असतं अशा व्यक्ती. |
| Sexual orientation | लैंगिक कल | आपल्याला कोणत्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण जाणवते तो आपला लैंगिक कल असतो. |
| Heterosexual orientation | भिन्नलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना फक्त विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते |
| Bisexual orientation | उभयलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना स्त्रीबद्दल व पुरुषाबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते |
| Homosexual orientation/Gay | समलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना त्यांच्याच लिंगाच्या व्यक्तीबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते |
| Closet | अव्यक्त | ज्या व्यक्तीने आपली लैंगिकता इतरांना सांगितलेली नाही अशी व्यक्ती. |
| Come out / Coming Out | सांगणे | आपली लैंगिकता इतरांना सांगणे (उदा. एखाद्या व्यक्तीने आपल्या मित्राला किंवा पालकांना आपण समलिंगी आहोत हे सांगणे जे आजवर त्यानी समाजाच्या भीतीपोटी गुपीत ठेवलं होतं) |

| | | |
|---|---|---|
| Sexual Role | लैंगिक भूमिका | लैंगिक संबंधात कोणती भूमिका घेतो? यांत तीन प्रकार असतात– घालणारा, स्वीकृत, दोन्ही. |
| Insertive (Top) | घालणारा / गमनी | लैंगिक संबंधात घालणाऱ्याची (पुरुषाची) भूमिका घेणे. |
| Receptive (Bottom) | घेणारी, स्वीकृत | लैंगिक संबंधात घेणाऱ्याची (स्त्रीची) भूमिका घेणे. |
| Versatile | दोन्ही लैंगिक भूमिका | लैंगिक संबंधामध्ये अशी व्यक्ती घालणाऱ्याची किंवा घेणाऱ्याची लैंगिक भूमिका घेते. |
| Autosexual | स्वकामी | जी व्यक्ती स्वतःच स्वतःला लैंगिक सुख देते अशा व्यक्तीला स्वकामी म्हणतात |
| Asexual | कामरहित | ज्या व्यक्तीला दीर्घकाळ कोणत्याच व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटत नाही अशी व्यक्ती |
| Pansexual | मुक्तलिंगी | ज्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारची शरीररचना असलेल्या, कोणताही लिंगभाव असलेल्या व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटते अशी व्यक्ती |
| LGBTIAQ | – | L- लेस्बियन, G- गे, B - बायसेक्शुअल, T - ट्रान्सजेंडर, I - इंटरसेक्स, A - असेक्शुअल, Q - क्वियर |
| Queer | क्वियर (आधुनिक शब्द) | हा शब्द दोन अर्थी वापरला जातो.<br>१. सर्व लैंगिक अल्पसंख्याक व्यक्तींना एकत्रितपणे संबोधण्यासाठी उदा. समलिंगी, द्विलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी इत्यादी.<br>२. अशा लैंगिक अल्पसंख्याक व्यक्ती की ज्यांची लैंगिकता LGBTIA लैंगिक अल्पसंख्यांकाच्या चौकटीत बसत नाही |
| Partner | सहचर | लैंगिक जोडीदार |
| Relationship/ Live-in relationship / Partnership | सहजीवन | जोडप्याने विवाहबाह्य लैंगिक नातं प्रस्थापित करून एकत्र राहणे. |
| Civil Partnership | नागरी सहजीवन | जोडप्याने विवाहबाह्य लैंगिक नातं प्रस्थापित करून एकत्र राहणे. (या नात्याला कायद्याची मान्यता असते.) |

# मानाचा मुजरा!!!

भा.दं.सं ३७७ कलम असंवैधानिक असल्याचा ऐतिहासिक निकाल देणाऱ्या न्यायमूर्तींना आमचा मानाचा मुजरा!

## दिल्ली उच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीश



न्यायाधीश ए. पी. शाह



न्यायाधीश एस. मुरलीधर

## सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीश



मुख्य न्यायमूर्ती. दीपक मिश्रा



न्यायमूर्ती. ए.एम.खानविलकर



न्यायमूर्ती. आर.एफ.नरीमन



न्यायमूर्ती. डी. वाय. चंद्रचुड



न्यायमूर्ती.इंदू मल्होत्रा

## भारताचे पहिले LGBTI ॲक्टिव्हिस्ट!




अशोक राव कवी (अम्मा)


# ऋणनिर्देश !

भा.दं.सं ३७७ च्या न्यायालयीन लढ्यात, सर्वोच्च न्यायालयात १३ मानसोपचारतज्ज्ञांनी भा.दं.सं ३७७ च्या विरोधात हस्तक्षेप याचिका दाखल केली. डॉ. शेखर शेषाद्री, डॉ. सौमित्र पाठारे, डॉ. अरविंद पंचनदिकर, डॉ. जॉली लाहा, डॉ. साबीर हज़्रा चौधरी, डॉ. कौस्तुभ जोग, डॉ. रमण खोसला, डॉ. भूषण शुक्ल, डॉ. अलोक सरीन, डॉ. विक्रम पटेल, डॉ. देवेंद्र शिरोळे, डॉ. देबाशिष चटर्जी, डॉ. सर्बानी दास रॉय यांचा आम्हाला खूप अभिमान आहे! या यादीतील ६ जण महाराष्ट्रातले (सर्व पुण्याचे) आहेत. यांचे फोटो खाली दिले आहेत.


डॉ. अरविंद पंचनदिकर


डॉ. भूषण शुक्ल


डॉ. कौस्तुभ जोग


डॉ. रमण खोसला


डॉ. सौमित्र पाठारे


डॉ. देवेंद्र शिरोळे (दिवंगत)

---

भा.दं.सं ३७७ च्या न्यायालयीन लढ्यात, सर्वोच्च न्यायालयात १७ LGBTI मुलामुलींच्या पालकांनी भा.दं.सं ३७७ च्या विरोधात हस्तक्षेप याचिका दाखल केली. विजयम पी. एस., बिना गुहाथाकुर्ता, चित्रा पालेकर, शैलजा व सुरेश हेम्माडी, वी. पद्मा, ममता जेना, जानकी वासुदेवन, के. एस. वासुदेवन, शकुंतला खिरे, मिन्न सरण, मुनिथायाम्मा, ए. फ्लेवी, शोभा दोषी, विजयलक्ष्मी राय चौधरी, आवा चक्रवर्ती, ममता गुहा, केया घोष यांचा आम्हाला खूप अभिमान आहे! या यादीतील ४ पालक महराष्ट्राचे (३ मुंबईचे व एक पुण्याचे) आहेत. यांचे फोटो खाली दिलेले आहेत.


शकुंतला खिरे


चित्र पालेकर


शैलजा व सुरेश हेम्माडी

फोटो उपलब्ध नाही
शोभा दोशी (दिवंगत)

---

लॉयर्स कलेक्टिव्ह चे सर्वोच्च न्यायालयाचे वकील आनंद ग्रोवर, डॉ. रमण गंगाखेडकर (माजी संचालक, राष्ट्रीय एडस् संशोधन केंद्र (NARI)), विवेक राज आनंद (मुख्य कार्यकारी अधिकारी द हमसफर ट्रस्ट, मुंबई), ए.सी.पी. भानुप्रताप बर्गेसाहेब (निवृत्त) यांचे मनापासून आभार.

फोटो उपलब्ध नाही
आनंद ग्रोवर


डॉ. रमण गंगाखेडकर


विवेक राज आनंद


ए.सी.पी. भानुप्रताप बर्गेसाहेब (निवृत्त)

# न्यायदेवतेचा आम्हाला आधार !



अनिल उकरंडे

अनिल उकरंडे स्वतः समलिंगी आहे. 'समपथिक ट्रस्ट' पुणे मध्ये ते प्रोजेक्ट कोऑर्डीनेटर म्हणून काम करत आहेत. पिंपरी-चिंचवड शहराच्या पहिल्या LGBTI अभिमान पदयात्रेचे (२०१९) ते आयोजक आहेत.

**ईमेल -** ukarandeanil@gmail.com

आदरणीय भारतीय सर्वोच्च न्यायालयाने ०६ सप्टेंबर, २०१८ रोजी भा.दं.सं. कलम ३७७ (नवतेज सिंघ जोहर व इतर विरुद्ध भारत सरकार, कायदे आणि न्याय विभाग) यांवर आपला ऐतिहासिक निर्णय देत दोन प्रौढ व्यक्तींनी सहसंमतीने खाजगीत ठेवलेल्या समलिंगी संबंधांना गुन्हाच्या यादीतून वगळलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला व सांगितले, की भा.दं.सं. कलम ३७७ हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४, १५, १९ आणि २१ कलमांचे उल्लंघन करणारे आहे.

सर्वोच्च न्यायालय आपल्या निकालपत्रात असे नमूद करते, की समलिंगी, उभयलिंगी आणि तृतीयपंथी समाज हा भारतीय समाजाचा अविभाज्य घटक असून त्यांसदेखील इतर नागरिकांप्रमाणे सर्व मूलभूत अधिकार आहेत. त्यांनाही आपले जीवन अभिमानाने जगण्याचा अधिकार आहे, शारीरिक लिंग, लैंगिकता आणि लिंगभाव नैसर्गिक असून आपल्या आवडीनुसार आपला जोडीदार निवडण्याचा घटनादत्त अधिकार समलिंगी, उभयलिंगी आणि तृतीयपंथी व्यक्तींना आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव हे या व्यक्तींच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे असे न्यायालय मानते. आपल्या अधिकारांच्या लढाईला मिळालेले हे यश आपल्याला समाजाप्रती अधिक जबाबदार आणि पुढील न्याय्य हक्कांसाठी अधिक संघटित होण्याची प्रेरणा देते.

सदरच्या लेखात मी घटनापीठाने दिलेल्या निकालपत्रातील काही प्रेरणादायी आणि महत्त्वाचे इंग्रजीमधले परिच्छेद मराठीमध्ये भाषांतरित करण्याचा एक छोटासा प्रयत्न केलेला आहे.

**सरन्यायाधीश– दीपक मिश्रा, न्यायमूर्ती– ए.एम.खानविलकर**

I. निसर्ग जे देते ते नैसर्गिक. याला अंतर्निहित निसर्ग म्हणतात. म्हणून व्यक्तीच्या त्या व्यक्तीमत्त्वाच्या पैलूचा आदर केला पाहिजे, न की त्याचा अनादर किंवा त्याला तुच्छ लेखले पाहिजे. अंतर्निहित निसर्ग आणि त्याच्याशी निगडित नैसर्गिक आवेग स्वीकारले गेले पाहिजेत. कालबाह्य विचारसरणी व आदर्शवाद यांच्या आधारे समलैंगिकतेला समाजिक पातळीवर अमान्य करण्याने अशा व्यक्तींच्या अस्मितेला मोठा धक्का बसतो. व्यक्तीची अस्मिता नष्ट करणे म्हणजे त्या व्यक्तीच्या अस्मितेला घडवणाऱ्या खाजगी जीवनाचा अधिकार, निवडीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारांना चिरडणे होय. (पान. क्र.६)

ii. या व्यतिरिक्त LGBT समाजातील व्यक्तीने आपल्या जोडीदाराप्रती सार्वजनिक ठिकाणी दाखवलेले

प्रेम, जोपर्यंत असभ्य किंवा ज्यामुळे सामाजिक सलोखा बिघडणार नाही तोपर्यंत बहुसंख्यांच्या वक्रदृष्टीमुळे प्रतिबंधित केले जाऊ शकत नाही. भा.दं.सं. कलम ३७७ प्रौढ व्यक्तींनी सहसंमतीने खाजगीत केलेला संभोग गुन्हा ठरवते. हे कलम धडधडीतपणे बेलगाम आहे, संदिग्ध आहे व त्याचबरोबर व्यक्तीच्या 'निवडीचा अधिकारावर' (freedom of choice) विपरित प्रभाव पाडणारे आहे. (पान.क्र.१५२)

iii. कायद्याच्या राज्यात (Rule of Law) फक्त घटनात्मक नैतिकता (Constitutional morality) पाळली जाते, सामाजिक नैतिकतेच्या नावाने घटनात्मक नैतिकतेचा, पवित्र सदाचरणाच्या नावे बळी दिला जाता कामा नये. सामाजिक नैतिकतेच्या बुरख्याआडून कोणा एकाही व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे (fundamental rights) उल्लंघन केले जाता कामा नये, कारण समाजात आढळणाऱ्या विविधतेचा स्वीकार हाच मुळात घटनात्मक नैतिकतेचा पाया आहे. (पान.क्र.१५९)

iv. लैंगिकतेच्या शास्त्राचा तर्क आहे, की एक व्यक्ती कोणाकडे लैंगिकदृष्ट्या आकर्षित होते ही बाब ती व्यक्ती नियंत्रित करू शकत नाही. एखाद्यावर त्याच्या लैंगिक कलामुळे केलेला कोणत्याही प्रकारचा भेदभाव म्हणजे त्या व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या (freedom of expression) घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन करणे होईल. (पान.क्र.१६०)

v. भा.दं.सं. कलम ३७७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर दोन व्यक्तींमध्ये अशी कोणतीही लैंगिक कृती झाली ज्यास दोघांपैकी कोणत्याही एकाची संमती नसेल तर सदरच्या कलमांतर्गत संबंधित व्यक्ती दंडास पात्र राहील. (पान.क्र.१६६)

**न्यायमूर्ती. आर.एफ.नरीमन**

i. २०१७ च्या कायद्यातील (The Mental Health Act-2017) मानसिक आजारांची सध्याची व्याख्या स्पष्ट करते, की समलैंगिकतेला मानसिक आजार मानला जात नाही. आपल्या कायद्यानी हा मोठा पल्ला गाठला आहे आणि संसदेने या कायद्यास मान्यता दिली आहे. (पान.क्र.२३४)

ii. आम्हांला असेही वाटते, की भारतीय संघराज्याने सदरच्या निकालास मोठी प्रसिद्धी मिळावी, या करिता सार्वजनिक प्रसारमाध्यमांमध्ये, जसे की दूरदर्शन, आकाशवाणी, मुद्रित आणि दृश्य प्रसार माध्यमांमध्ये वेळोवेळी निकालास प्रसारित करावे व अशा व्यक्तींबाबत समाजात असणारा कलंक दूर करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घ्यावेत. निकालपत्रात नोंदवलेल्या निरीक्षणाच्या आधारे वरील सर्व सरकारी अधिकारी, विशेषत: पोलीस अधिकारी आणि संघराज्य शासनाच्या इतर अधिकाऱ्यांसमवेत वेळोवेळी अशा व्यक्तींच्या झालेल्या दुर्दशेबाबात संवेदनशील आणि जागरूकतापर प्रशिक्षण देण्यात यावे. (पान.क्र.२६२)

**न्यायमूर्ती– डी. वाय. चंद्रचूड**

i. LGBT समुदायातील सदस्यांना त्यांच्या पूर्ण लैंगिककलाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारणे म्हणजे त्यांना संविधानाने बहाल केलेल्या नागरिकत्वाच्या हक्कांपासून वंचित ठेवणे होय. लैंगिककल अभिव्यक्त करण्याचा अधिकार नाकारणे म्हणजे गोपनीयतेचा मूलभूत अधिकार (Right To Privacy) नाकारणे होय. कलम ३७७ गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते, जो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. मानवी अधिकारांना संरक्षण देण्याची जबाबदारी घटनेने न्यायपालिकेला बहाल केली आहे. (पान.क्र.३३६)

ii. पूर्वीच्याकाळी व परिस्थितीत 'जे नैतिकतेचे भूत' फोफावत होते त्याला गाडण्यासाठी, समलिंगी संभोग, गुन्ह्याच्या यादीतून काढून टाकणे गरजेचे आहे पण गुन्ह्याच्या यादीतून काढून टाकण्याची प्रक्रिया हे 'पहिले पाऊल' आहे. भारतीय संविधान हे आपल्या त्यात असणाऱ्या संवैधानिक मूल्यांवर ठेवलेला विश्वास आहे. सर्व जगाची सभ्यता व कारूण्याकडे होत असलेल्या वाटचालीत भारताला मागे पडून चालणार नाही. (पान.क्र.४०७)

**न्यायमूर्ती– इंदू मल्होत्रा**

i. कलम ३७७ प्रथमदर्शनी जरी तटस्थ असले, तरीसुद्धा या कलमाचा वापर प्रामुख्याने LGBT समुदायावर शत्रुतापूर्ण, त्यांच्या लैंगिककलाच्या आधारे त्यांना सतत असुरक्षित करण्यास व कायद्याची भीती दाखवण्यास केला गेला आहे. (पान.क्र.४९०)

ii. कलम ३७७ ने 'निसर्गव्यवस्थेच्या विरुद्ध लैंगिक संबंधा'चे गुन्हेगारीकरण केले असल्याने LGBT व्यक्तीस प्रच्छन्न जीवन जगण्यास भाग पाडते. याचा परिणाम म्हणून आरोग्याशी निगडित असणाऱ्या सुविधांचा अवलंब करत असताना पूर्वग्रहांमुळे वंचित राहतात ज्यामुळे LGBT व्यक्तींचे गंभीर नुकसान झाले होते, परिणामी या समुदायाच्या सदस्यांमध्ये नैराश्य आणि आत्महत्येची प्रवृत्ती दिसून येते. (पान.क्र.४७९)

iii. अनेक शतकं या समाजातील सदस्यांवर व त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेली नाचक्की आणि बहिष्काराचे निराकरण करण्यास विलंब झाल्याने इतिहासाने त्यांची माफी मागितली पाहिजे. या समाजातील सदस्यांना आपले संपूर्ण आयुष्य छळाच्या भीतीने आणि सुडाच्या भावनेने जगण्यास भाग पाडण्यात आलेले आहे, समलिंगी लैंगिकता ही मानवी लैंगिकतेच्या श्रेणीचा एक भाग असून ती एक संपूर्ण नैसर्गिक अवस्था आहे हे ओळखण्यासाठी बहुसंख्य लोकांचे असलेले अज्ञान यांस कारणीभूत आहे. (पान.क्र.४९१)

# भा.द.स. ३७७ केसचा प्रवास

**लेखक– बिंदुमाधव खिरे (समपथिक ट्रस्ट, रजि.नं. इ३६६२, पुणे)**

I

१९९४

दिल्ली उच्च न्यायालय (HC)

WP (C) **क्र. १७८४/१९९४**

{एड्‌स भेदभावविरोधी आंदोलन विरुद्ध भारत सरकार व इतर}

भा.दं.सं कलम ३७७ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी जनहित याचिका

↓

जनहित याचिकेचा कोणताही पाठपुरावा नाही.

↓

⊗

---

२००१

दिल्ली उच्च न्यायालय (HC)

WP (C) **क्र. ७४५५/२००१**

{नाझ फाउंडेशन विरुद्ध दिल्ली केंद्रशासित प्रदेश व इतर}

भा.दं.सं कलम ३७७ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी याचिका दाखल

↓

दिल्ली उच्च न्यायालय (HC)

**२००४** WP (C) **क्र. ७४५५/२००१**

वैधतेच्या तपासणीचे कारण नसल्याने जनहित याचिका फेटाळली गेली.

(No Locus Standi)

केवळ शैक्षणिक आव्हानांचे परीक्षण करण्याकरिता कायद्याच्या

घटनात्मकतेला आव्हान दिले जाऊ शकत नाही. (न्या. बदर दुर्रेझ अहमद)

↓

२००५

सर्वोच्च न्यायालय (SC)

**विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. ७२१७–७२१८** (SLP(C))

उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी विशेष दावा याचिका

सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली

↓

II

३ फेब्रुवारी २००६

सर्वोच्च न्यायालय (SC)

**सिव्हील अपील क्र. ९५२/२००६**

खटला दिल्ली उच्च न्यायालयाकडे पुन्हा पाठवण्यात आला. संबंधित प्रकरण कलमाच्या

घटनात्मक वैधतेशी संबंधित असल्यामुळे त्यावर विचार होणे गरजेचे आहे.

(मुख्य न्या. साबरवाल, न्या. सी.के. ठक्कर, न्या.आर.व्ही.रविंद्रन, न्या. लोकेश्वर सिंग पंता)

↓

४ सप्टेंबर, २००३
(C/WP/ **७४५५/२००१**)
राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था यांनी कलम ३७७ च्या विरोधात न्यायालयात आपले प्रतिज्ञापत्र सादर केले.

दिल्ली
उच्च न्यायालय (HC)

१७ जुलै, २००६
(C/WP/ **७४५५/२००१**)
गृहमंत्रालय, भारत सरकार ने कलम ३७७ च्या समर्थनार्थ न्यायालयात आपले प्रतिज्ञापत्र सादर केले.

सुनावणी

२ जून, २००९
दिल्ली उच्च न्यायालय (HC)
WP(C) **क्र. ७४५५/२००१**
मुख्य. न्या.अजित प्रकाश शाह व न्या.एस.मुरलीधर
**निकाल** : भा.दं.सं. कलम ३७७ हे राज्यघटनेच्या कलम १४, १९ व २१ चे उल्लंघन करते.

२००९
सर्वोच्च न्यायालय (SC)
**विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. १५४३६/२००९** (SLP)
सुरेशकुमार कौशल आणि इतर १५ जणांकडून सर्वोच्च न्यायालयात दिल्ली उच्च न्यायालयाच्या या निकलाविरोधात याचिका दाखल करण्यात आली.

समलिंगी स्त्री/पुरुष यांच्या पालकांकडून कलम ३७७ च्या विरोधात न्यायालयात आपली हस्तक्षेप याचिका दाखल

सर्वोच्च न्यायालय (SC)

मानसोपचारतज्ज्ञांकडून कलम ३७७ च्या विरोधात न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल

सुनावणी फेब्रुवारी/मार्च २०१२

११ डिसेंबर, २०१३
WP(C) **क्र. १०९७२/२०१३**
(न्या. सिंघवी व न्या. मुखोपाध्याय)
**निकाल :** सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल ठरवला.

२०१४
**पुनर्विचार याचिका क्र. १९८/२०१४** २८ जानेवारी २०१४ रोजी फेटाळली गेली,
**सुधार याचिका** दाखल. **क्र. ८८–१०२/२०१४**

२२ एप्रिल, २०१४
**सुधार याचिका क्र. ८८–१०२**
सुधार याचिका स्वीकारण्यात आली

याचिकेवर कोणतीही सुनावणी झाली नाही.

III

२०१२
सर्वोच्च न्यायालय (SC)
WP(C) **क्र. ४००/२०१२**
{NALSA विरुध्द भारत सरकार}
तृतीयपंथी व्यक्तींना कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी NALSA ची जनहित याचिका दाखल

↓

१५ एप्रिल, २०१४
{NALSA विरुध्द भारत सरकार}
WP(C) **क्र. ४००/२०१४**
(न्या.के.एस.राधाकृष्णन आणि न्या.ए.के. सिक्री)
**निकाल** : तृतीयपंथी व्यक्तींना कायदेशीर मान्यता आणि त्यांना स्वओळख करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला, पण भा.दं.सं. ३७७ बद्दल कोणतीही भूमिका घेतली नाही.

---

२०१२
सर्वोच्च न्यायालय (SC)
WP(C) **क्र. ४९४/२०१२**
नि.न्या. पुत्तास्वामी यांच्याकडून आधारकार्डच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी याचिका दाखल

↓

IV

२०१७
सर्वोच्च न्यायालय (SC)
९ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी
खाजगी आयुष्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नाही असा भारत सरकारचा दावा

↓

२४ ऑगस्ट २०१७
**निकाल (सर्वानुमते)** : खाजगी आयुष्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. (न्या. चंद्रचूड : लैंगिकताही याचा अविभाज्य घटक आहे आणि कुमार कौशलच्या केसचा दिलेला निर्णय चुकीचा आहे)

→ आधारकार्डाची जनहित याचिका पुढे चालू राहिली.....

---

V

२३ एप्रिल २०१६
सर्वोच्च न्यायालय (SC)
WP(C) **क्र. ७६/२०१६**
कलम ३७७-खाजगी आयुष्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते म्हणून {**नवतेज जोहर आणि इतर**} यांनी राज्यघटनेच्या **कलम ३२** अंतर्गत रिट दाखल केली.

↓

२०१६ ते २०१८
सर्वोच्च न्यायालय (SC)
**पाच न्यायाधीशांचे घटनापीठ स्थापन**
भा.दं.सं कलम ३७७ खाजगी आयुष्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते म्हणून राज्यघटनेच्या **कलम ३२** अंतर्गत इतर रिट दाखल.

**अक्काई पद्‌मसाली** WP(Crl) **क्र. ७६/२०१६**
**केशव सुरी** WP(Crl) **क्र .८८/२०१८**
**अशोक राव कवी** WP(Crl) **क्र. १०१/२०१८**
**आरिफ जाफर** WP(Crl) **क्र. १००/२०१८**
**प्रव्रीत्ती** WP(Crl) **क्र. १२१/२०१८**

२०१८
**घटनापीठासमोर**
१० जुलै २०१८ रोजी सुनावणीस सुरूवात

भारतीय मानसोपचार परिषदेने भा.दं.सं.कलम ३७७ काढून टाकण्यासाठी जबाब नोंदवला.

सर्वोच्च न्यायालय (SC)

कौशल व इतर यांनी सुधार याचिका आणि रिट याचिका यांची एकत्र सुनावणीची मागणी केली. ती न्यायालयाने फेटाळून लावली.

६ सप्टेंबर २०१८
सर्वोच्च न्यायालय (SC)
WP(Crl) **क्र. ७६/२०१६**
सरन्या. दीपक मिश्रा, न्या. ए. एम. खानविलकर, न्या. डॉ. धनंजय चंद्रचूड, न्या. रोहिंटन नरीमन व न्या. इंदू मल्होत्रा

**निकाल (सर्वानुमते)** : पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने भा.दं.सं.कलम ३७७ हे दोन प्रौढ व्यक्तींमधील संमतीने झालेल्या समलिंगी संबंधांना गुन्हा ठरवते आणि राज्यघटनेच्या कलम १४, १५, १९ व २१ चे उल्लंघन करते व म्हणून ते घटनाबाह्य आहे असा एकमताने निकाल दिला.

---

VI

फेब्रुवारी २०१९
नाझ फौंडेशनने आपली याचिका मागे घेतली.

# !!! हार्दिक शुभेच्छा !!!



**श्री. भानुप्रताप बर्गेसाहेब**
**(सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे)**

माननीय श्री. भानुप्रताप बर्गे २५ मे १९८५ साली पोलीसदलात भरती झाले. ते ३४ वर्षं पोलीसदलात कार्यरत होते व ३१ जुलै २०१९ रोजी सेवानिवृत्त झाले.

एक सच्चा देशप्रेमी, अतिरेक्यांचा कर्दनकाळ, कर्तव्यदक्ष, सर्व जाती-धर्म व पंथांना सामावून घेणारे अशी त्यांची ख्याती होती.

'लोखंडवाला शूटआउट'मध्ये (ज्यामध्ये कुख्यात गुंड माया डोळसचा खात्मा झाला) बर्गे साहेबांचा सहभाग होता. खलिस्तानी अतिरेक्यांविरोधात त्यांनी मोहिमा राबवल्या व अनेक अतिरेक्यांना त्यांनी कंठस्नान घातले.

आत्तापर्यंत ४३० पुरस्कारांनी साहेबांना सन्मानित करण्यात आले आहे.

साहेबांनी काही वर्षं पुण्यात सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहिलं. या काळात त्यांची माझी भेट झाली व तेव्हापासून LGBTI संदर्भातल्या केसेसबद्दल मी त्यांच्याकडे मार्गदर्शन घेत आलो आहे. साहेब हा विषय अत्यंत संवेदनशीलतेने हाताळत आले व त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला.

नंतर साहेबांची बदली फरासखाना पोलीस ठाणेप्रमुख म्हणून झाली (समपथिक ट्रस्टचे ऑफिस या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते.) २०१३ ला समपथिक ट्रस्टने आयोजित केलेल्या LGBTI अभिमान पदयात्रेत (LGBTI Pride Walk) साहेबांनी स्वतः बेलबाग चौकात येऊन पदयात्रेतील सहभागींना गुलाबाची फुलं दिली. भारतातील ही पहिली घटना आहे, की एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी अभिमान पदयात्रेला गुलाबाची फुले देऊन LGBTI समाजाला आधार दिला.



उजवीकडून श्री. भानुप्रताप बर्गेसाहेब व श्री.बिंदुमाधव खिरे. (LGBTI अभिमान पदयात्रा २०१३)

दिवाळीत साहेबांच्या पुढाकाराने पुण्याच्या बुधवारपेठेच्या लाल बत्ती इलाक्यात (हाही इलाका फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहे) शरीरविक्री करणाऱ्या स्त्रियांसाठी फराळाचे आयोजन, रांगोळी व फटाक्यांची व्यवस्था केली. या लालबत्ती इलाक्यात अशी संवेदनशीलता आधी कोणीही दाखवली नव्हती. त्या दिवशी संध्याकाळी रस्त्यात ताई रांगोळी काढत होत्या, फटाके वाजवत होत्या. मारुतीच्या देवळाजवळ फराळ वाटला जात होता. मलाही बोलावणे होते. मी आणि संती (एक तृतीयपंथी) या उत्सवाला उपस्थित होतो.

कालांतराने साहेब पुण्याच्या आतंकवादी विरोधी पथकाचे (ATS) प्रमुख झाले. त्यांना बढती मिळून ते सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) झाले. त्यानंतर त्यांची बदली पोलीस कमिशनर ऑफिस गुन्हे शाखा युनिट-II मध्ये झाली. ३१ जुलै २०१९ रोजी ते सेवानिवृत्त झाले.

गेल्या अनेक वर्षांत साहेबांची जी मदत मिळाली व जो आत्मविश्वास त्यांनी आमच्यात निर्माण केला त्याबद्दल मी, बिंदुमाधव खिरे व माझी संस्था त्यांचे मनापासून आभारी आहोत.

साहेबांच्या पुढील वाटचालीस आमच्या मनापासून शुभेच्छा!

**बिंदुमाधव खिरे**
अध्यक्ष, समपथिक ट्रस्ट, पुणे
संचालक, बिंदु क्वियर राईट्स फाउंडेशन, पुणे

# एका ट्रान्समॅनची मुलाखत



त्रिदेव

**टिपणी** – त्रिदेव हे टोपणनाव आहे.
**ईमेल** - mx.tridev@yahoo.com

### १. तुझ्या बद्दल आणि तुझ्या बालपणाविषयी थोडं सांगशील?

माझं नाव त्रिदेव गौडा. मी २९ वर्षाचा आहे, आणि एक ट्रान्समॅन आहे. माझं शिक्षण मराठी माध्यमातून झालं. इयत्ता तिसरी–चौथी मध्ये असताना आपण मुलगा आहोत की मुलगी? आपण स्वतःला आगं तुगं करायचं की अरे–तुरे याच्यावरती खूप वेळ विचार करत. मी स्वतःला नेहमी मी उठतो, 'मी बसतो, मी लिहितो' असा पुरुषार्थी प्रयोग करायचो म्हणून आमच्या मॅडम शाळा सुटली की माझ्याकडून फळ्यावर मी करते, 'मी उठते, मी बसते' असं लिहून घेत असत. मी आईकडे मुलांसारखे कपडे हवेत म्हणून हट्ट करायचो.

मी लहानपणी कधीही मुलींचे खेळ खेळलो नाही. मला फक्त मुलांचे खेळ आवडायचे. गोटया, विटी–दांडू, क्रिकेट इत्यादी. माझा छंद बघून मला माझ्या मैत्रिणींनी एकदा बॅट भेट म्हणून दिली होती ती भेट आजही ही खूप महत्त्वाची वाटते. मी मुलांच्या रांगेत उभा राहण्यासाठी धडपड करायचो.

मला मुलांसारखं वागायला न मिळाल्यामुळे माझं अभ्यासामध्ये दुर्लक्ष व्हायचं आणि याचा त्रास व्हायचा. लहानपणी लपाछपी खेळत असताना माझ्यापेक्षा वयाने खूप मोठा असलेला एक मुलगा त्याचं गुप्तांग माझ्या हातात देण्याचा प्रयत्न करायचा आणि 'ही बघ तलवार' किंवा 'तुला तलवार बघायची आहे?' असं बोलायचा. त्याने माझ्यासोबत अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मी कधीच त्या मुलाकडे गेलो नाही.

कालांतराने लक्षात आलं कि जेव्हा मी मुलींच्या लाईनमध्ये उभा असायचो तेव्हा मला त्या मुलींना स्पर्श करायला आवडतयं, त्यांत जर एखादी मुलगी पुरुषी बांध्याची असेल तर मला ती जास्तच आवडायची.

२०१२ साली कॉलेजमध्ये असताना एका मुलाला मी खूप आवडायचो. तो मला त्याची गर्लफ्रेन्ड समजायचा, मी म्हटलं 'चला आपल्यावर कुणीतरी प्रेम करतंय.' त्याच्याबद्दल माझ्या घरी सांगितलं. माझ्या घरच्यांनी त्याला पाहण्यासाठी घरीसुद्धा बोलावलं होतं. पण जसजसा काळ गेला, त्याचा स्पर्श, बोलणं मला नको वाटायला लागलं. तो मला मुलींसारखं रहा/वाग म्हणायचा. ते मला पटायचं नाही आणि शेवटी एके दिवशी आमचा ब्रेकप झाला. सध्या मी एका कंपनीमध्ये सीनियर एक्झिक्युटिव म्हणून काम करतो.

### २. तुझ्याबद्दल घरी कधी सांगितलंस? तेव्हा त्यांची कशी प्रतिक्रिया होती?

पाचवी–सहावीत असताना मला मासिक पाळी सुरू झाली तेव्हाच मी घरी सांगितलं की मला ही

मासिक पाळी नको आणि तीच पहिली पायरी होती आउट होण्याची, स्वतःला एक मुलगा म्हणून सांगण्याची. घरच्यांना ते लवकर कळालं नाही. घरचे एवढे सुशिक्षित नव्हते. माझ्या शरीरामध्ये बदल व्हायला लागले. माझी छाती वाढायला लागली. मला स्तन नको होते म्हणून मी ओढणीने त्यांना घट्ट बांधून वरुन टीशर्ट घालायचो, मात्र याचा उपयोग झाला नाही. शेवटी मी कंटाळून आईला म्हणायचो, मला हे स्तन नकोत, मी मुलगी नाहीये, मुलगा आहे. मला उभं राहून पुरुषाप्रमाणे लघवी करता येते का? याचं नेहमी कुतूहल असायचं. त्यासाठी खूप वेगवेगळे मी प्रयोग करत असत. मासिक पाळीमुळे त्रास व्हायचा, मी रडायचो व आई माझी समजूत काढायची.

माझ्या घरचे एकदा मला एका डॉक्टरकडे घेऊन गेले. त्यांनी मला झोपेच्या गोळ्या दिल्या पण त्यानी काही फरक पडला नाही. खूप महिन्यानंतर डॉक्टरने मला मानसोपचारतज्ज्ञाकडे जाण्याचा सल्ला दिला पण त्यावेळी कोणतेही मानसोपचारतज्ज्ञ माझ्या ओळखीचे नव्हते. कोणाकडे जायचं? हा प्रश्न पडला. एका मानसोपचारतज्ञाकडे गेलो तर त्याने माझ्यात दोष आहे, मी पुरुष नसून बाई आहे असं सांगितलं. याचा मला खूप त्रास झाला.

**३. तू कधी रिलेशन मध्ये होता का?**

माझी आजपर्यंत दोन रिलेशन होती. दोन्ही ही पुरुषाचे अवयव काढून टाकलेल्या तृतीयपंथी स्त्रीया होत्या. मला असे तृतीयपंथी आवडतात. माझी पहिल्या गर्लफ्रेंडची ओळख एका दुकानामध्ये, जेव्हा ती 'मंगती' (पैसे मागायला) करायला आली तेव्हा, झाली होती. सुरुवातीला मला तृतीयपंथी व्यक्तींची खूप भीती वाटायची कारण त्याचं बोलणं आणि पेहराव खूप भडक असातात. त्यांची भाषा, त्यांचं वागणं खूप विचित्र वाटायचं. जसा मी त्यांच्या जवळ जायला लागलो तशी माझ्या मनातली भीती नाहीशी व्हायला लागली.

माझी पहिली गलफ्रेंड मला न सांगता कुठेतरी निघून गेली तेव्हा तिला शोधण्यासाठी मी एका दुसऱ्या तृतीयपंथीकडे गेलो जी देवरूसपण करायची. नंतर आमच्या दोघांचं उठणं बसणं वाढायला लागलं आणि दोघांमध्ये प्रेम झालं. आम्ही दोन वर्ष रिलेशनशिपमध्ये होतो. माझं भावनिकदृष्ट्या ती शोषण करायची, तीने मला मारहाण केली, माझ्याकडून पैसे उकळले, पण मी मात्र तिच्यावर खरं प्रेम करायचो. पुढे आमची भांडणं झाली आणि आम्ही वेगळे झालो.

**४. तूझ्या कामाच्या ठिकाणी तुझ्याबद्दल माहिती आहे का?**

हो कामाच्या ठिकाणी माझ्या बद्दल माहिती आहे. काही अंशी मला माझ्या सहकाऱ्यांनी स्वीकारलेलं आहे. पण माझे मॅनेजर मला म्हणाले जोपर्यंत तू पूर्णपणे पुरुष होत नाहीस तो पर्यंत मी तुला मुलीच्याच नावाने आवाज देणार. त्यांच्या मनात तृतीयपंथी स्त्री आणि पुरुषांना घेऊन खूप सारे प्रश्न असतात, त्याची उत्तरे मी माझ्या परीने देण्याचा प्रयत्न करतो. कामाच्या ठिकाणी मला कोणताही त्रास होत नाही.

**५. तुझा लिंग बदलाचा प्रवास कसा चालू आहे?**

वयाच्या २७ व्या वर्षी मी जेव्हा पहिल्यांदा एका तृतीयपंथी स्त्री सोबत रिलेशनशिपमध्ये गेलो आणि

तिच्यासोबत जेव्हा मी शरीर संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला प्रकर्षाने जाणवलं कि माझ्याकडे पुरुषाचे अवयव नाहीत, तेव्हा मला खूपच वाईट वाटलं आणि मी ठरवलं की मला आता पुरुषाचे अवयव बसवून घ्यायचे. त्याचा प्रवास सुरू केला. ऑपरेशन साठी मी पैसे जमा करत आहे. लिंगबदल शस्त्रक्रीयेचा अर्धा खर्च घरचे करणार आहेत.

सध्या मी हार्मोन्स रिप्लेसमेंट थेरपी घेत आहे, हळूहळू माझ्या शरीरावर पुरुषांसारखे बदल दिसून यायला लागले आहेत याचा मला खूप आनंद वाटतो. डॉ. अरविंद पंचनदिकर आणि डॉ. कौस्तुभ जोग यांच्या मदतीने हे सर्व काही शक्य होत आहे. या दोन्ही डॉक्टरांची ओळख मला समपथिक ट्रस्टचे अध्यक्ष बिंदुमाधव खिरे यांनी करून दिली होती. बिंदुमाधव खिरे यांची मदत आणि ओळख माझ्या आयुष्याला एक वेगळंच वळण देऊन गेली. या संस्थेतून मला माझ्यासाखे अनेक मित्र मिळाले त्यांच्यासोबत मी मन मोकळेपणाने वावरू शकतो, आनंदाने राहू शकतो. ओंकार, अभिलाष, उमेश आणि अनिल या मित्रांचा मी आभारी आहे, त्यांनी मला मानसिक आधार दिला.

मला, २०१८ मध्ये पिंपरी-चिंचवड शहराची पहिली समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी आणि द्विलिंगी अभिमान पदयात्रा खूप महत्वाची वाटते कारण तिथे मी ट्रान्समॅन म्हणून पहिल्यांदा अभिमानाने समाजासमोर घोषणा देत आणि स्वतःचं अस्तित्व दाखवत चाललो होतो.

**६. तुझ्या समाजाकडून काही अपेक्षा आहेत का ?**

समाजामध्ये आजही तृतीयपंथी पुरुष सहजासहजी दिसून येत नाहीत त्याचमुळे समाजामध्ये तृतीयपंथी पुरुषांच्या बाबतीत खूप सारे गैरसमज आहेत. जेव्हा माझ्यासारखे अनेक तृतीयपंथी पुरुष समाजासमोर उघडपणे आपलं अस्तित्व दाखवतील तेव्हाच हळूहळू समाजाला आमच्या अडचणी व समस्या काय आहेत याची जाणीव होईल. समाज बदलतो आहे ही चांगली गोष्ट आहे आणि येणाऱ्या काळात समाज खुलेपणाने तृतीयपंथी पुरुषांना आणि LGBTI समाजाला स्वीकारेल व आमच्या समाजावर होणारा अन्याय, भेदभाव थांबेल, नोकरीच्या ठिकाणी सन्मानपूर्वक वागणूक मिळेल अशी अपेक्षा आहे.

# Feeling...




**Talk to us on-**
1800-843-4353 (toll free)
9922001122
(Daily from 12 pm- 8 pm)

**Email us your concerns on-**
distressmailsconnecting@gmail.com

**Walk in-**
12 pm to 5 pm (Monday-Saturday)

**Address-**
Connecting NGO
2nd Floor Atur Chambers, Above Coffee House
(Opp SGS Mall), Moledina Road
Pune -411001
Contact- 02041200845

connecting NGO
Help Save A Life

# सजातीय ध्रुव



संदेश कुडतरकर

संदेश कुडतरकर एका आय. टी. कंपनीत टीम लीड म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे लेख पुरुष स्पंदन, स्त्री-उवाच, अक्षरनामा, वेब पोर्टल, तसेच लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स या दैनिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

**ईमेल -** msgsandesa@gmail.com

**प्रणय**

त्या सात दिवसांत तुला एकदाही मला फोन करावासा वाटला नाही. याचा अर्थ तुला माझ्यात रस नाही, हे मी स्वत: समजून घेतलं पाहिजे, असं तुझं म्हणणं. पण हा अर्थ समजून घेण्याएवढी आपली मैत्रीही झाली नव्हती रे अजून. तुझ्या बहिणीचं लग्न महिन्यावर येऊन ठेपलं आहे. ऑफिसच्या कामात तू नेहमी बिझी असतोस. तुला तुझ्या इतर मित्रांनाही वेळ द्यायचा असतो. आठवड्यातल्या सात दिवसांपैकी दोन दिवस तुझा सतारीचा क्लास असतो किंवा तुला माझ्यात रसच नाही. या एवढ्या शक्यतांमधून मी तुझ्या फोन न करण्याचा एकच अर्थ काढावा आणि तेही एक पचवायला कठीण असलेलं कटू सत्य असताना?

कोणत्या प्रश्नाच्या उत्तराला ग्रे शेड्स असू शकतात आणि कोणत्या प्रश्नाचं उत्तर 'हो' किंवा 'नाही', ते तुला समजत असेल, असं मला वाटत नाही. कारण 'तुझं माझ्यावर प्रेम आहे का? किंवा मी तुला आवडतो का?' या प्रश्नाचं तू 'हो सुद्धा नाही आणि नाही सुद्धा नाही' असं चमत्कारिक उत्तर दिलंस. आशा-निराशेच्या हिंदोळ्यांवर माझं मन काही काळ झुललं. मला ओढ होती आभाळाचीच. पण तू पुन्हा माझे पाय जमिनीवर आणलेस.

पहिल्याच भेटीत तू मला आवडलास आणि काही दिवसांतच मी तुला प्रपोजसुद्धा करून टाकलं. पुढे काहीतरी होण्याची शक्यता आहे आणि मी वाट पाहायला हरकत नाही, असे संकेत तू दिलेस. फोनवर आपला रोमान्स सुरू झाला. त्या फोनवरच्या गप्पांमध्येच मला कळलं, की आपण पहिल्यांदा भेटलो तेव्हा ऑटोमध्ये मी तुला इतकं खेटून बसलो असतानाही तू मला विरोध केला नाहीस, कारण तुलाही ते हवंच होतं. दुसऱ्या भेटीत आपण पार्कमध्ये गप्पा मारत बसलो. गप्पा कसल्या? खरंतर काय बोलायचं हे दोघांनाही कळत नसावं. तेव्हा तू स्वत:हून काहीच करत नाहीस, हे पाहून मीच तुझ्या खांद्यावर हात ठेवला. तू तुझ्या उजव्या हाताचं मनगट माझ्या पोटावर घासत असल्याचं मला जाणवलं. नंतर विचारल्यावर 'मी तेवढंच करू शकत होतो तिथल्या गर्दीत आणि प्रकाशात', असं तू सांगितलंस.

आपली तिसरी भेट झाली त्या वेळी तुझा एक मित्र तुझ्यासह आला होता. मला अर्थातच ते आवडलं नव्हतं. पण नापसंती दाखविण्याचा हक्क मिळण्याएवढंही आपल्यात काही नव्हतं. त्यावेळी तुला लिहिलेली तीन प्रेमपत्रं तुझ्या हातात सोपवून मी मोकळा झालो होतो. 'द बॉल वॉज इन युअर कोर्ट नाऊ.' पण तुला उत्तर द्यायचं नव्हतं कदाचित. त्या दिवशी आपण चौथ्यांदा भेटलो, कदाचित शेवटचं. थिएटरमधल्या अंधारात मी तुझा हात हातात घेतला आणि माझी बोटं तुझ्या बोटांमध्ये गुंफून बसलो. तू

प्रतिकार केला नाहीस आणि प्रतिसादही दिला नाहीस. रोमान्स करताना मला स्वत:ला पुढाकार घ्यायला आवडत नाही. मला कुणीतरी माझ्यावर सत्ता गाजवायला हवीय, असे अनेक सूचक बॉम्ब टाकून मी आधीच मोकळा झालो होतो. विस्फोटाची वाट पहात होतो पण काहीच झालं नाही.

त्यानंतर मात्र मी ठरवलं, की तुला स्वत:हून फोन किंवा मेसेज करायचा नाही. पण सात दिवस उलटून गेल्यावरही तुझं काहीच उत्तर आलं नाही. तू काही विचारलंही नाहीस आणि आता अचानक हे निर्णायक उत्तर तुझं. मला वाईट वाटण्याची काहीच गरज नाही. तुझा पाय आधीच कुठेतरी गुंतण्यास उत्सुक आहे आणि म्हणून तू मला कसलीच कमिटमेंट देऊ शकत नाहीस, तरीही पाहू, असं तू म्हणाला होतास. ‘love hurts’ असंही म्हणाला होतास. तू खूप शांत आहेस, असं मी म्हटल्यावर ‘शांत माणसं बोलू लागली, की समोरच्या व्यक्तीला ती उर्मट वाटतात’, असंही म्हणाला होतास. तुझ्या हातातली सगळी पानं मी पाहिली, असंच वाटत राहिलं आता.

अलीकडे मला वेगळीच शंका येऊ लागलीय. हुकुमाचा एक्का कदाचित तू हातातच लपवून ठेवला आहेस. इथे दुर्दैवाने सगळा खेळच उलटा आहे रे. ते पान मला कळलं, तर तूच हरशील, याचं भय वाटत असेल तुला. कदाचित तू अगदी माझ्यासारखाच आहेस. कुणीतरी पुढाकार घेण्याची वाट पाहणारा, माझ्यासारखाच शांत, माझ्यासारखाच हळवा. फक्त ते सत्य स्वीकारण्याची तुझ्या मनाची तयारी दिसत नाही. ‘डार्लिंग, वी सीम टु बी परफेक्ट मिस मॅच फॉर इच अदर’. तू सतार वाजवतोस, संगीत मलाही आवडतं, पण शास्त्रीय संगीत हा माझा प्रांत नाही बाबा. तू माझा जन्माचा सोबतीच झाला पाहिजेस, अशी कुठलीही इच्छा मी तुझ्यावर कधीच लादली नसती. पण मित्र म्हणून सगळं मोकळेपणाने माझ्यापाशी बोलावंसं नाही वाटलं का तुला? तुझ्या आनंदातच माझा आनंद नेहमी सामावला होता, एवढंच समजून घेशील का? प्लीज.... तुझ्या स्वरांशी वेव्हलेन्थ जुळणारा जोडीदार तुला मिळो, एवढंच माझं मागणं आहे देवाकडे.

*

**प्रशांत**

माझ्याकडून काय उत्तर अपेक्षित आहे तुला? तू माणूस म्हणून खूप चांगला आहेस. तुला अपेक्षित असलेला होकार जर मी दिला असता, तर तुझ्या आशा पल्लवित झाल्या असत्या. केवळ एका भेटीनंतर तू मला प्रपोज केलंस. किती अनपेक्षितपणे! अगदी योग्यपणे साधलेली अयोग्य वेळ! हातात मिळालेलं प्लेन डेअरी मिल्क आपण खायला सुरुवात करत नाही, तोवर कुणीतरी समोर फ्रुट अण्ड नट फेकल्यासारखं आणि बिकट प्रसंग असा, की दोन्हीपैकी कुठलंच चॉकलेट आधी चाखून पाहिलेलं नाही आणि निवड मात्र एकाचीच करावी लागणार. काय करावं माणसाने अशा वेळी? मला जे योग्य वाटलं ते मी केलं. मी दोन्ही उघडून आधी चाचपडून पाहायचं ठरवलं. त्या चाचपडून पाहण्यालाच तू होकार समजल्यासारखा वागू लागलास, ही माझी चूक नव्हे.

तुझं फ्लर्ट करणं मला आवडत नव्हतं, असंही नाही. पण निव्वळ चार भेटींमध्ये तू स्वप्नांचे एवढे इमले रचू लागलास, की मला श्वास घेणं कठीण होऊन बसलं. असंकुचितपणे वागून नातं संपविण्याशिवाय

कुठलाच मार्ग माझ्यापुढे तू ठेवला नाहीस. तुझ्याबरोबर चित्रपट पाहणं, फिरणं मलाही आवडत होतं. पण त्यापुढे काही होऊ शकतं का, हे मला पाहायचं होतं आणि वेळ अशी होती, की तुझा माझ्या आयुष्यात प्रवेश होण्यापूर्वीच आणखी कुणाबद्दल तरी मला आशा वाटत होती आणि माझ्याबद्दल कुणा तिसऱ्याच व्यक्तीला.

तुझं पहिलं प्रेमपत्र मला आवडलंही होतं. पण दुसऱ्या पत्रातून मला कळलं, की तू आयुष्याचा सोबती म्हणून माझा विचार करत आहेस. गिव्ह मी अ ब्रेक, डिअर. माझं दोन-तीन वर्षांपासून कुणाशी तरी असलेलं नातं आताच तुटलंय. त्या धक्क्यातून आता कुठे सावरू पाहतोय मी. प्रेमावरचा विश्वासच उडालाय माझा. असं असताना इतक्या लवकर मी तुला कमिटमेंट कशी देऊ? दोन-तीन वर्षांपूर्वी त्यानेही अशीच वचनं दिली होती मला. 'मी आयुष्यभर फक्त तुझाच राहीन,' अशी कमिटमेंट दिली होती. माझ्यावरच्या त्याच्या त्या प्रेमाचं आयुष्य तीनच वर्षं होतं, हे कुठं माहीत होतं मला?

तुला कुठल्याही प्रकारे दुखविण्याचा माझा हेतू नव्हता. कदाचित माझ्या नकाराचं कारण तुला कळलंही असेल आपसूक. तसं असेल तर बरंच आहे. आपण पहिल्यांदा भेटलो होतो, तेव्हा ऑटोमध्ये बसलो असताना तू माझ्या अगदी जवळ होतास, पण सुरुवात तू करावीस, असं मला वाटत होतं. माझ्या ओठांवर तू ओठ टेकवण्याची मी वाट पाहत होतो. दुसऱ्या भेटीत मी सूचकपणे तुला एकांतात घेऊन गेलो. माझ्या खांद्यावर तू हात ठेवलास, पण पुढे काहीच केलं नाहीस. तुझ्या पोटावरची वाढलेली चरबी मनगटाला जाणवली, तेव्हा विरस झाला माझा खरंतर. तिसऱ्या भेटीत तुझ्याशी एकांत टाळण्यासाठी म्हणून मी मित्राबरोबर गप्पांमध्ये गुंतवलं तुला आणि चौथ्या भेटीत तू हात हातात घेतलास, तेव्हा चैतन्याची एकही लहर माझ्या देहात सळसळली नाही. एव्हाना मला कळून चुकलं होतं, की आपल्यांत काहीच होऊ शकत नाही. आक्रमक होण्याचा आपण दोघांनीही प्रयत्न करून पाहिला. पण आपणा दोघांनाही चांगला अभिनयही करता येत नाही, एवढंच त्यातून सिद्ध झालं. चुंबकाच्या सजातीय ध्रुवांमध्ये नेहमी प्रतिकर्षण होतं. कितीही जवळ यायचं ठरवलं तरी आपणा दोघांनाही ते शक्य नाही आणि त्याहून दुर्दैवाची गोष्ट म्हणजे माझ्या शांत स्वभावामागे तरीही लपून राहिलेला माझा इगो. मीही तुझ्यासारखाच शांत आहे, मी कधीच आक्रमक होऊ शकत नाही, या गोष्टीचा तुझ्यापुढे स्वीकार करणं म्हणजे माझा इगो दुखावून तुझी सहानुभूती विकत घेणं. तुझी मैत्री परवडली असती, पण सहानुभूती आयुष्यभर छळत राहिली असती. तू छान लिहितोस, पण साहित्य हा माझा प्रांत नाही. तुझ्या प्रेमपत्रांची कदर करणारा जोडीदार तुला मिळो, एवढीच माझी इच्छा आहे. माझं दु:ख तुझ्याशी मला का शेअर करावंसं वाटलं नाही, एवढंच समजून घेशील? प्लीज.....

# तृतीय प्रकृती लैंगिकता व पौराणिक पात्रे

सागर बर्वे यांचे फार्मसीमध्ये पदव्युत्तर शिक्षण झाले आहे आणि ते सध्या टाटा कन्सलटन्सी सर्विसेसमध्ये काम करतात. ते स्वतः समलिंगी असून कंपनीमध्ये LGBT जनजागृतीसाठी मदत करतात. त्याच बरोबर त्यांना ज्योतिष, वेद आणि आयुर्वेदशास्त्र यांमध्ये रस आहे.

**ईमेल -** sagardineshbarve@gmail.com



**सागर बर्वे**

आपल्या वैदिक/सनातन संस्कृतीमध्ये हजारो वर्षांपासून चालत असलेल्या 'तृतीय प्रकृती' किंवा तिसऱ्या प्रकारच्या लैंगिकतेचे अनेक उल्लेख आहेत. महाभारत, रामायण, तंत्र, स्मृती, पुराणे, सूत्र इत्यादींमध्ये सध्या आपण म्हणत असलेल्या LGBT लैंगिकतेचे अनेक दाखले आढळतात. त्यातील काही आज आपण बघूयात.

### (१) अर्धनारीनटेश्वर

या देवामध्ये उजवा भाग पुरुष (शिव) असून डावा भाग (शक्ती) स्त्री आहे. परम पुरुष व प्रकृतीचे मिलन असून व्दैत (Duality) व अद्वैत (Non-Duality) चे पण प्रतीक आहे. पराशक्ती देवीने शिवास निर्मिले तेव्हा शिव अर्धनारी रूपात होते, मग आपल्या अर्ध्या भागास विलग करून पार्वती बनली असा उल्लेख आहे. तमिळनाडूमधील 'तीरुचनगौड' येथे अर्धनारी रूपात शंकराची पूजा केली जाते. शिवपुराण व लिंगपुराणात या रूपाचे उल्लेख आहेत.

### (२) वैकुंठ-कमलजा

या रूपात विष्णू व लक्ष्मी यांचा अनुक्रमे उजवा हात व डावा भाग असून, या दोन भागांचे शरीर बनले आहे. या रूपाचाही अर्थ अर्धनारीनटेश्वराप्रमाणेच समजावा. या रूपांचा उल्लेख जास्त मिळत नसला, तरी या रूपातील मंदीरे नेपाळ व कश्मीरमध्ये सापडतात.

### (३) हरिहर

या अवतारामध्ये डाव्या अंगी विष्णू असून उजवे अंग शिवाचे आहे, असा उल्लेख सापडतो. कर्नाटकातील 'बदामी' येथे विजयनगर साम्राज्यामध्ये हरिहराची मूर्तिपूजा चाले.

### (४) मोहिनी

'श्रीमद्‌भागवत्' मध्ये व अन्य पुराणांमध्ये आधारित कथेनुसार श्रीविष्णुनेच 'मोहिनी' अवतार घेतला. हे स्त्रीरूप इतके आकर्षक होते की, 'समुद्रमंथनातून' निघालेला 'अमृतकलश' जेव्हा असुरांच्या हाती लागला तेव्हा अमृत कलशावर व 'मोहिनी'वर सर्व असूर भाळले. पुढे मोहिनीने चतुरपणे फक्त देवांना 'अमृत' मिळेल अशी योजना केली. पण रूप बदलून राहू-केतू त्या पंक्तीस येऊन बसले. त्यांनी अमृतपान करताच

चंद्र-सूर्याने त्यांचे कपट ओळखून देवांना सांगताच 'मोहिनीने' त्या राहू-केतूच्या शरीराचा 'सुदर्शन' चक्राने शिरच्छेद केला. तेव्हा धडाचा झाला 'केतू' व शिराचा झाला 'राहू'. तोवर अमृतप्राशन झाल्याने हे दोघे अमर झाले. पुढे याच मोहिनीच्या सौंदर्यास भुलून 'भस्मासुराने' स्वतःच्या डोक्यावर हात ठेवत क्रीडेत रममाण मोहिनीची नक्कल केली. त्याच क्षणी तो असुर 'भस्म' झाला. कालांतराने स्वतः शंकरही मोहिनी रूपावर भाळून तिच्या मागे पळू लागले. तेव्हा बरेच अंतर दोघे पळाल्यावर त्यांची भेट झाली व सहवास झाला. त्यातूनच 'अय्यप्पास्वामी' पुत्र झाला. पुत्र झाल्यावर 'मोहिनी' आपल्या मूळ 'विष्णूरूपात' येऊन विष्णू व शंकर आपापल्या धामात परतले.

**(५) शिखंडी/शिखंडीनी**

महाभारत काळात 'पांचाल' देशाचा राजा 'द्रुपद' याला बऱ्याच वर्षांनी एक औरस संतती प्राप्त झाली. ती कन्या असून तिचे नाव 'शिखंडीनी' ठेवले. लग्नाचे वय होताच तिच्यासाठी योग्य वधूची निवड करण्याचे योजले; कारण लहानपणापासूनच तिला एका 'मुलाप्रमाणे' राणीने वाढविले होते. लग्न झाले. पहिल्या रात्री जेव्हा जोडीदारास हे कळाले, की 'शिखंडी' मुलगी आहे, तो महाल सोडून तत्क्षणी गेला. शिखंडणीस खूप दुखः झाले व ती हिमालयात तपश्चर्येस गेली. तिला शंकर प्रसन्न होतेच. तिच्या पूर्वजन्माच्या स्मृती जागृत झाल्या व आपण पूर्वजन्मीची 'अंबा' राजपुत्री असून 'भीष्मां'नी माझे अपहरण केले व माझा प्रियकर शाल्व देशाचा राजकुमार त्यापासूनही मला विलग केले; त्यामुळे माझा पुनर्जन्म भीष्मांना मारण्यासाठी झाला आहे, हे तिला आठवले. हिमालयीन जंगलात तिची 'स्थुन्कर्ण' यक्षाशी भेट झाली. यक्षाने आपले पुरुष अवयव तिच्यावर प्रत्यारोपित करून स्वतः स्त्री बनला व अशा तऱ्हेने 'शिखंडीनि'ची 'शिखंडी' बनला. 'शिखंडी' हा रूढ अर्थाने पुरुष नाही याची भीष्मांना कल्पना होती. प्रतिज्ञेनुसार व युद्ध नियमानुसार ते स्त्रीवर शस्त्र चालवित नसत. त्यामुळे शिखंडीस समोर उभे करून अर्जुनाने भीष्मांवर बाण चालवले व त्यांचे प्राण घेतले. 'शिखंडी' म्हणजे 'अंबाची' प्रतिज्ञा पूर्ण झाली. युद्धानंतर शिखंडीने वनात जाऊन यक्षास त्याचे पुरुषी अवयव परत देऊन टाकले.

**(६) बृहनडा**

महाभारतात पांडवांचे अज्ञातवासाचे तेरावे वर्ष चालू असता अर्जुन हा 'बृहनडा' या नर्तकी रूपात महालात राहत असे व राजपुत्री 'उत्तरा' हीस नृत्य शिकवित असे. पूर्वी इंद्राच्या अमरावतीस असताना उर्वशीने अर्जुनास नृत्य व संगीत शिकवले होते, परंतु तिने शेवटी अर्जुनाशी संभोग करण्याची इच्छा व्यक्त केली. उर्वशी नृत्यशिक्षिका, गुरूच्या स्थानी असल्याने अर्जुनाने संभोग करण्यास नकार दिला, तेव्हा उर्वशीने शाप दिला, की एक वर्ष तू नपुंसक होऊन राहशील. अज्ञातवासात राहताना 'मत्स्य' राज्यात 'विराट' नगरीत अर्जुनाने 'बृहनडा' बनून तो शाप पूर्ण केला.

**(७) बुध-इला**

गुरू ग्रहाची (बृहस्पती) पत्नी तारा हिच्यावर 'चंद्रदेवाने' जबरदस्ती केल्याने झालेला पुत्र हा 'बुध' होता. तारेने त्यास शाप दिला, की हा स्त्रीशी संभोग करू शकणार नाही. इकडे पार्वतीच्या शापामुळे राजा 'ईल' एक मास स्त्रीरूपात, तर एक मास पुरुषरूपात रहात असे. एकदा तो स्त्रीरूपात 'इला' रुपात असता कुमार

बुधाने त्यास पाहिले व त्यांच्यात संभोग झाला व त्यांना 'पुरूरवा' नावाचा पुत्र झाला. त्याच्या कुळात पुढे कौरव-पांडव-भीष्म इत्यादी झाले. पुत्राच्या जन्मानंतर 'इलाने' शंकर-पार्वतीची तपश्चर्या करून पुन्हा कायमस्वरूपी पुरुष देह प्राप्त करून घेतला.

## (८) इरावण-श्रीकृष्ण

अर्जुन - नागकन्या उलुपी यांचा मुलगा 'इरावण'. काहीजण यास 'अरावण'ही म्हणतात. कुरूक्षेत्र युद्धावेळी तो बळी जाण्यास तयार झाला, पण मरण्यापूर्वी त्याने विवाह करण्याची इच्छा प्रकट केली, आता थोड्याच अवधीत मरणाऱ्या कुमार वीराशी कोण लग्न करणार? तेव्हा श्रीकृष्णाने स्वतः स्त्रीरूपात येऊन त्याची इच्छा पूर्ण केली. या संदर्भात तमिळनाडूत 'कुवागम' येथे जत्रा भरते व अनेक तृतीयपंथी इरावणशी लग्न करून अठरा दिवसांनंतर त्याच्या मृत्यूचा शोक व संस्कार करतात.

## (९) अग्नि

अग्निदेवाच्या लैंगिकतेबद्दल अनेक उल्लेख आहेत. एका उल्लेखात शिवपार्वती संभोगावेळी शिवदेवाचे (शंकराचे) वीर्य अग्निने गिळले व त्यापासून कार्तिकेयाची निर्मिती झाली.

## (१०) किन्नर व किन्नरी

इंद्राच्या दरबारात यक्ष, गंधर्व, विद्याधर यांसह अनेक सुंदर दिसणारे किन्नर/किन्नरी आहेत. यांना प्राप्त करून घ्यावयाच्या अनेक सिद्धी आहेत. किन्नरी साधना हा 'रावणसंहितेत' एक तांत्रिक प्रयोग पण आहे.

## (११) इतर

गोरक्षनाथांचे स्त्रीराज्यात प्रवेशावेळी 'नवनाथ भक्तिसार' पोथीनुसार गोरक्षनाथ महासिद्धांनी हुबेहूब स्त्रीचा वेश परिधान करून सुरेख ढोलकी वाजवली. ज्यामुळे सर्वांनी तोंडात बोटे घातली असा उल्लेख आहे. रेणुका/यल्लमा-सौंदत्ती, कर्नाटक; बहुचरामाता-गुजरात; येडेश्वरी-येरमाळा, सोलापूर महाराष्ट्र येथे अनेक तृतीयपंथी देवीची ओटी भरायला जातात.

'श्रीमद्देवीभागवत' मधील पहिल्या अध्यायानुसार जेव्हा ललिता त्रीपुरसुंदरी देवीने ब्रम्हा, विष्णू व महेश यांना तिच्या नगरात आणले, तेव्हा ते तिघे तत्काळ स्त्रीरूपात रूपांतरित झाले. देवीने त्यांस त्यांचे कार्य समजावल्यावर जेव्हा ते नगरीच्या बाहेर आले, तेव्हा ते पुन्हा ब्रम्हा ,विष्णू व महेश रूपात होते. याचप्रमाणे कलियुगाच्या शेवटी भगवान कल्की यांची होणारी भार्या, सिंहलद्विपात राहणारी (श्रीलंकेत) पद्मावती देवी हिच्याशी जे जे राजे बलपूर्वक विवाह करण्याचा प्रयत्न करतील, ते सर्व तत्क्षणी स्त्री-रूपास प्राप्त होतील, असा उल्लेख आहे.

## (१२) भगीरथ

सूर्यवंशी कुळातील राजा दिलीप निःसंतान स्वर्गवासी झाल्यावर त्याच्या दोन्ही राण्यांना शंकराने 'एकत्र' येण्यास सांगितले, एका रात्री तसे करताच त्यातील एकीस गर्भ राहिला, तो पुढे 'भगीरथ' या पुत्राच्या रूपाने नावारूपास आला. भग म्हणजे दोन योनींतून जन्म झाल्याने त्यास 'भगीरथ' हे नाव सार्थक पडले.

ज्याने पुढे गंगा पृथ्वीवर आणली.

इ.स.पूर्व ६०० पर्यंत हिमाचल प्रदेश, उत्तराखंडाच्या व तिबेटच्या बाजूस 'किंपुरुष' नावाचे साम्राज्य होते जिथले पुरुष गायन, वादन, कला, नृत्य यांत कुशल होते (किं=काय पुरुष=पौरूषत्व)

इ.स. ५०० च्या सुमारास वात्स्यायनाने लिहिलेल्या 'कामसूत्रात' नवव्या अध्यायात समलैंगिकतेवर विस्तृत चर्चा आहे.

'खजुराहो' येथील शिल्पकलेत, 'दिलवाडा' येथील जैन शिल्पकलेतही LGBT व पर्यायी लैंगिकतेवर बरेच काही प्रकट करून भावनांना वाट दिली आहे.

इतका विस्तृत साठा व माहिती 'समलैंगिकता' व 'तृतीयपंथी लैंगिकते'वर आपल्याच पूर्वजांनी उपलब्ध करून ठेवली असतानाही, ते आपल्याला न समजणे, हा अडाणीपणा तर नाही ना?







**SERVICES AVAILABLE -**

- Promoting LGBTQ Rights
- Integrated HIV Testing and Treatment Center
- Mental Health Services
- Nutrition Counseling
- Street and Internet Outreach
- Crisis and Legal Support

CONNECT Connecting LGBTQ communities worldwide. | YA! (10TH ANNIVERSARY) YAARIYAN WE DON'T NEED TAGLINES | LIKHO | (10TH ANNIVERSARY) UMANG Love. Bond. Trust. | SANJEEVANI

Mumbai Address: 3rd Floor, Manthan Plaza, Nehru Road, Vakola, Santacruz (East), Mumbai 400 055, India
Phone: (+91 -22) 2667 3800 / 2665 0547 | Email: info@humsafar.org | Website: www. humsafar.org

# श्रद्धांजली



**बिनयवांगा वायनयना (१८-०१-१९७१ ते २१-०५-२०१९)**

आफ्रिकन लेखक व LGBTI ॲक्टिविस्ट बिनयवांगा वायनयना यांचे २१ मे २०१९ ला हृदयाच्या झटक्याने दु:खद निधन झाले. ते ४८ वर्षांचे होते.

त्यांनी २००५ साली लिहिलेल्या 'How to Write About Africa' (ग्रांटा) या विडंबनात्मक निबंधाने जगाचे लक्ष वेधून घेतले. त्यांना २००२ साली आफ्रिकन लिखाणासाठी 'केने' पारितोषिक बहाल करण्यात आले.

त्यांनी क्वानी (इंग्रजी अर्थ: So What?) या मासिकाची सुरूवात केली. त्यांचे लिखाण 'द इस्ट आफ्रिकन', 'नॅशनल जिओग्राफिक', 'द संडे टाइम्स' (साऊथ आफ्रिका), 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'चिमुरेंगा' व 'द गार्डियन' (यु.के.) मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

२०१४ साली केनिया व नायजेरिया देशांतील समलिंगीद्वेष्ट्या कायद्यांचा निषेध करत त्यांनी ते स्वतः समलिंगी असल्याचे जाहीर केले. २०१४ साली 'टाइम' मासिकाच्या जगातील १०० अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वांच्या यादीत त्यांच्या नावाची नोंद झाली.

जागतिक एड्स दिनी (१ डिसेंबरला) त्यांनी ट्विटरवरून जाहीर केले, की ते HIV+ आहेत. त्यांच्या लेखनाचे दोन नमुने खाली देत आहोत.

१. (विडंबनात्मक लेख) **आफ्रिकेबद्दल कसे लिहावे ?** ('How To Write About Africa'...)
कधीही सुव्यवस्थित आफ्रिकन व्यक्तीचा फोटो पुस्तकाच्या मुखपृष्ठावर किंवा आत छापू नये. अपवाद, एखाद्या आफ्रिकन व्यक्तीने नोबेल पारितोषिक मिळवले असेल तरच तो छापावा. AK-47, ठळकपणे दिसणाऱ्या बरगड्या, उघडी स्तनं यांचा वापर करावा. जर एखाद्या आफ्रिकन माणसाचा फोटो (पुस्तकात/मासिकात) घालायचा असेल तर 'मसई' किंवा 'झुलू' किंवा 'डोगोन' जमातीचे कपडे घातलेला असू देत.
( https://granta.com/How-to-Write-About-Africa/)

२. **मी समलिंगी आहे, आई** ( I am a Homosexual , Mum).
..... नाही, आई. मला तुझ्यावर विश्वास नव्हता आणि मी ? मी जोराने श्वास आत ओढला, माझ्या बेंबीपाशी घट्ट बोळा करून रोखून धरला आणि हळूवार, सलगपणे माझ्या मुखातून सोडला. त्याचा ध्वनी स्पष्ट. श्वास स्वच्छ. खांद्यावरून तिच्या कानात. "मी समलिंगी आहे, आई."
(https://www.theguardian.com/commentisfree/2014/jan/21/i-am-a-homosexual-mum-binyavangawainaina-memoir)

# बॉलिवूड आणि समलैंगिकता



ओंकार जोशी

ओमकार जोशी समलिंगी आहेत. LGBTI समाजाशी निगडित आरोग्यविषयक प्रकल्पांमध्ये त्यांनी गेली सात वर्षे काम केले आहे.
२०१९ मध्ये पुणे LGBTI अभिमान पदयात्रा आयोजन समितीचे ते सदस्य होते.
**ईमेल -** omkar_joshi143@yahoo.com

चित्रपट हे समाजमनाचा आरसा असतात. समाजात घडतं ते जसच्या तसं प्रतिबिंब पडद्यावर उमटवण्याचा प्रयत्न चित्रपटांमधून केला जातो. चित्रपटांचा समाजावर खूप प्रभाव असतो, चित्रपटांमधले संवाद असोत, गाणी असोत, फॅशनचा ट्रेंड, चित्रपटांमधले कलाकार, चित्रपटाची पटकथा अशासारख्या असंख्य गोष्टी असतात ज्यांचा प्रभाव प्रेक्षकांच्या मन:पटलावरून वर्षानुवर्षं अनेक दशकं जात नाही. चित्रपट जगण्याची परिभाषा सांगतात. चित्रपट अभिव्यक्त होण्याचे एक माध्यम आहे, आपलं रोजचं जगणं चित्रपटांमधून मांडलं जातं. समाजव्यवस्था, कुटुंबपद्धती, चालीरिती, समाजात घडणाऱ्या घटना यांचा प्रभाव चित्रपटांवर दिसून येतो. समलैंगिकता हा देखील समाजाचा असाच एक पैलू वर्षानुवर्षं दुर्लक्षित राहिलेला, अल्पसंख्यांक म्हणून, माणूसपणाची किनार न लाभलेला दुर्लक्षित घटक. या घटकाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी चित्रपटांची भूमिका महत्त्वाची ठरते.

**समलैंगिकतेवरील चित्रपटांसाठी कारणीभूत घटक**

समलैंगिकतेवर वेगळे चित्रपट कशासाठी हवेत? असा प्रश्न समाजातल्या काही घटकांकडून नेहमीच उपस्थित केला जातो. तर समलैंगिक समाजाप्रती होणाऱ्या भेदभावाला वाचा फोडण्यासाठी, मुख्य प्रवाहातील जनतेचा समलैंगिक समाजाप्रती दृष्टिकोन बदलण्यासाठी (सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्यासाठी) या विषयाप्रती त्यांची संवेदनशीलता वाढावी म्हणून, माणसाकडे माणूस म्हणून पहावे म्हणून, तसेच समलैंगिक समाजाची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर जीवनशैली कशी असते? तसेच वरील उल्लेख केलेल्या पातळ्यांवर कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते, हे मुख्य प्रवाहाबरोबरच लैंगिक अल्पसंख्यांक समाजाच्या इतर सदस्यांनादेखील समजावे आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मुख्य प्रवाहातल्या चित्रपटांमधून समलैंगिक समाजाचं जे चुकीचं चित्रण झालं आहे त्याला प्रत्युत्तर म्हणूनदेखील समलैंगिकतेवर अशा चित्रपटांची निर्मिती होणं (अस्तित्व असणं), याला महत्त्व आहे.

**'समलिंगी' पात्रांचा विनोदनिर्मितीसाठी वापर**

मुख्य प्रवाहातल्या चित्रपटांमधून 'गे' अथवा 'तृतीयपंथी' पात्रांचा वापर हा केवळ विनोदनिर्मितीसाठीच केला जाई. एक माणूस म्हणून समलैंगिक समाजाला शरीर, मन, भावना व सामाजिक स्थान आहे हा विचारच कोणाच्याही लक्षात येत नव्हता. पुरुष नटाने स्त्रीचे कपडे परिधान करून केलेले अंगविक्षेप, फुटकळ विनोद, समलैंगिक व्यक्तींच्या आयुष्याबद्दल, जीवनशैलीबद्दल उडवलेली खिल्ली, समलैंगिक अथवा तृतीयपंथी पात्रांवरचे विनोद करत असताना, चित्रपटांचे व्यावसायिकीकरण करण्याच्या नादात, चित्रपटात मसाला भरण्यासाठी आपण समाजातल्या एका अल्पसंख्यांक/दुर्लक्षित घटकाच्या भावनांची थट्टा करतोय, प्रेक्षकांसमोर चुकीचा संदेश पाठवतोय हे त्या चित्रपटाच्या लेखक–

दिग्दर्शक निर्मात्याच्या मनीही नसावे?

**निर्माता–दिग्दर्शकांना जाणवणाऱ्या समस्या**

एल.जी.बी.टी वर आधारित चित्रपट प्रदर्शित करण्याआधी व केल्यानंतर निर्माता–दिग्दर्शकांना बराच संघर्ष करावा लागतो. बऱ्याच समस्यांना तोंड द्यावं लागतं, चित्रपटाचा मूळ गाभा/मूळ श्वास असलेल्या दृश्यांवरच सेन्सॉर बोर्डाकडून कात्री लावली जाते. तर कधी सामाजिक स्वास्थ्य जपण्याच्या तथाकथित संकल्पनेपायी संपूर्ण चित्रपट प्रदर्शित करण्यास परवानगी नाकारली जाते (उदाहरणार्थ 'गुलाबी आईना').

परवानगी मिळाली तर वितरणाचा प्रश्न असतो, समलैंगिकतेवर आधारित चित्रपट असल्यामुळे वितरक अशा चित्रपटांच्या वितरणास तयार होत नाहीत. कमी वितरण झाल्यामुळे असे चित्रपट कमी लोकांपर्यंत पोहोचतात. ज्यांच्यापर्यंत पोहोचतात ते एल.जी.बी.टी. समाजाचे सदस्य असतात. मुख्य प्रवाहातल्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाहीत. परिणामी मुख्य प्रवाहात समलैंगिकतेबद्दल असणारे गैरसमज जसेच्या तसे राहतात. चुकीच्या धार्मिक संकल्पना, अफवा व गैरसमज यामुळे प्रेक्षक अशा चित्रपटांकडे वळत नाहीत. मुख्य प्रवाहातल्या चित्रपटांमधले समलैंगिक समाजावरचे विनोद/प्रसंगाचा आस्वाद प्रेक्षक घेतो, परंतु त्याच व्यक्तींच्या मूलभूत हक्कांबाबत पूर्णपणे उदासीनता दिसून येते. संवेदनशील विषयाच्या चित्रपटांकडे पाहण्याची सजगता भारतीय प्रेक्षकांमध्ये कधी येणार आहे?

समलैंगिकतेवर आधारित चित्रपट प्रदर्शित झाले तरीही अशा चित्रपटांना अनैसर्गिक, अश्लिल अशी लेबल लावून विविध धार्मिक संघटना, राजकीय पक्ष यांच्याकडून विरोध केला जातो (उदा. 'फायर'). जनतेच्या भावना भडकावल्या जातात. अशा हिंसक गोष्टींचा परिणाम सामान्य प्रेक्षकांच्या मनावर होतो व आधीपासूनच असलेल्या गैरसमजुतींना खतपाणी मिळते.

समलैंगिकतेवर आधारित चित्रपट सर्व जनतेसमोर पोहोचावेत, दृष्टिकोन बदलायला हवा यासाठी, दिग्दर्शक श्रीधर रंगायन मुंबईमध्ये गेल्या दहा वर्षांपासून 'कशिष' मुंबई आंतरराष्ट्रीय क्वियर चित्रपट महोत्सव आयोजित करतात आणि पुण्यामध्ये एल.जी.बी.टी समाजासाठी काम करणारे समलिंगी कार्यकर्ते समपथिक ट्रस्टचे अध्यक्ष बिंदुमाधव खिरे, हे 'अद्वैत' पुणे आंतरराष्ट्रीय क्वियर 'फिल्म महोत्सव' आयोजित करतात.

**एल.जी.बी.टी. वरील चित्रपट**

एल.जी.बी.टी. समाजावर असंख्य लघुपट, वेब सेरीज, साहित्य, नाटक, टीव्ही शोज वेगवेगळ्या प्रादेशिक भाषेत आले आहेत. तसेच भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये देखील चित्रपट आहेत. या सर्व गोष्टीचे महत्त्व आहेच पण लेखाच्या अनुषंगाने आपण फक्त बॉलिवूडमधील समलैंगिकतेवर आधारित काही चित्रपटांचा आढावा घेऊयात.

**सडक (१९९१)**: दिग्दर्शक महेश भट यांचा प्रदर्शित झालेला 'सडक' चित्रपट. यात तृतीयपंथी व्यक्तीला नकारात्मक पद्धतीने सादर करण्यात आले होते. महेश भट यांसारख्या सृजनशील दिग्दर्शकाने जिथे तृतीयपंथातील नकारात्मक छटा दाखवली तिथेच पुढे जाऊन १९९७ ला प्रदर्शित झालेल्या त्यांच्याच 'तमन्ना' या चित्रपटामध्ये तृतीयपंथीयांमधील मातृत्वाचा पैलू जनतेसमोर आणला. 'सडक'मध्ये मुलींना बळजबरीने वेश्या व्यवसायात आणू पाहणाऱ्या तृतीयपंथीला खलनायक केले आहे, तर याउलट 'तमन्ना' चित्रपटात एका रस्त्यावर फेकून दिलेल्या मुलीला सांभाळण्यापासून ते तिच्या सुखासाठी जीवाचं रान करणाऱ्या तृतीयपंथीयाची कथा दाखवण्यात आली होती. त्यांच्याकडे तुच्छतेने, हेटाळणी करण्याच्या आणि ठराविक साच्यात अडकवण्याऱ्या समाजाला तृतीयपंथीयातला मातृत्वाचा झरादेखील पाहता आला.

**दायरा (१९९१):** अमोल पालेकर दिग्दर्शित 'दायरा' मध्ये स्त्रीच्या वेशात वावरणारा पुरुष आणि पुरुषाच्या वेषात वावरणारी एक बलात्कारित स्त्री, यांची कथा सांगण्यात आली आहे. हे दोघेही समाजात सुरक्षित राहण्यासाठी ही जीवनशैली स्वीकारतात. समाजात असणारे स्टीरिओटाइप्स मोडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून झालेला दिसून येतो.

**फायर (१९९६):** साली प्रदर्शित झालेल्या दिग्दर्शिका दीपा मेहतांच्या 'फायर' ने समाजाची झोप उडवली. तृतीयपंथी अस्तित्वात असतात हे समाजाला आधीपासूनच माहीत होते, पण दोन स्त्रियांमध्ये लैंगिक संबंध ही गोष्ट बहुतांश समाजाला अपरिचित होती. नंदिता दास, शबाना आझमी अशी तगडी स्टारकास्ट आणि सशक्त अभिनय, सशक्त कथा/आशय यामुळे तसेच प्रदर्शित होण्याआधीच धार्मिक संघटना, राजकीय पक्षांच्या विरोधामुळे हा चित्रपट अधिकच प्रसिद्धीच्या झोतात आला. बरीचशी टीकेची झोड उठवली गेली. समीक्षकांनी या चित्रपटाचं कौतुकही केलं. भारतात प्रदर्शित होणाऱ्या समलैंगिकतेवरच्या इतर चित्रपटांची परिभाषा बदलण्याच काम 'फायर' ने केलं.

**दरमिया (१९९७):** या चित्रपटात एका इंटरसेक्स अर्थात द्विलिंगी व्यक्तीची समाजात जगण्यासाठीची धडपड, व्यथा मांडण्यात आली आहे. एका खानदानी घराण्यात जन्माला येऊनदेखील आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याच्या वाट्याला फक्त उपेक्षाच येते. पारंपरिक गोष्टींच्या मागे न धावता प्रत्येकाने स्वतःमधला विशेष गुण ओळखावा, असाच संदेश या चित्रपटातून मिळतो.

**बॉम्बे बॉईज (१९९८):** या चित्रपटामध्ये मेट्रोसिटीमध्ये एकट्या जगणाऱ्या व्यक्तीला येणारे प्रश्न, यांवर भाष्य करण्यात आलंय. या चित्रपटात समलैंगिकतेला स्पर्श करण्यात आला आहे.

**देहम (२००१):** एका चित्रपटाचा मला विशेषत्वाने उल्लेख करायचा आहे तो चित्रपट म्हणजे २००१ साली प्रदर्शित झालेला 'देहम'. हा चित्रपट २०२२ साली घडणारी एक कथा सांगतो. या चित्रपटाची कथा जरी आपल्या मूळ विषयाला धरून नसली तरी दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी २००१ साली एल.जी.बी.टी. समाज २०२२ साली कसा वावरत असेल याचं आशादायी चित्रण एका छोट्याश्या प्रसंगाद्वारे यात केलं आहे. तसेच स्वतःच्या शरीरावर फक्त आणि फक्त स्वतःचाच हक्क असतो ही महत्त्वाची बाब या चित्रपटात त्यांनी अधोरेखित केली आहे.

**मँगो सुफले (२००२):** हा विनोदी अंगाने जाणारा चित्रपट समलैंगिकतेवर थेट भाष्य करतो.

**गर्लफ्रेंड (२००४):** हा चित्रपट प्रेमाच्या त्रिकोणाची गोष्ट सांगतो. यात लेस्बियन व्यक्तिरेखा अत्यंत स्टीरिओटाईप व वाईट पद्धतीने मांडली आहे.

**माय ब्रदर निखील (२००५):** स्वतःची लैंगिकता समाजासमोर उघडपणे स्वीकारलेले दिग्दर्शक 'ओनीर' यांचा २००५ साली प्रदर्शित झालेला 'माय ब्रदर निखील' हा चित्रपट अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. एका एच.आय.व्ही. संक्रमित व्यक्तीच्या आयुष्यात वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक पातळीवर कोणकोणते प्रश्न राहू शकतात, जी व्यक्ती स्वतः आतून तुटलेली असते, भेदभावाला सामोरी जात असते त्या व्यक्तीला जगण्यासाठी आधाराची, प्रेमाची गरज असते असं हा चित्रपट अधोरेखित करतो. त्याचबरोबर एच.आय.व्ही./एड्ससारख्या आजाराबद्दल ही जनजागृती करतो.

**शबनम मौसी (२००५):** हा चित्रपट 'शबनम' या तृतीयपंथीयाच्या आयुष्यावर प्रदर्शित झालेला चित्रपट. तृतीयपंथी समाजासाठी हा चित्रपट प्रेरणादायी आहे. 'शबनम मौसी' या मध्यप्रदेशच्या सोहागपूर विभागातून १९९८ ते २००३ या काळात विधानसभा सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. 'शबनम मौसी' यांनी मध्यप्रदेशात तृतीयपंथीयांसाठी हिताची कामे केलेली आहेत. त्यांच्या या कामामुळे तृतीयपंथीयांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली आहे. त्यांचे काम प्रकाशझोतात आणणाऱ्या योगेश

भारद्वाज याचं कौतुक कराव तेवढं कमीच आहे.

**पेज थ्री (२००५)**: हा चित्रपट उच्च राहणीमान, पार्टी कल्चर, फिल्म इंडस्ट्रीवर भाष्य करणारा चित्रपट. यातही समलैंगिकतेला स्पर्श करण्यात आला आहे.

**गुलाबी आईना (२००६)**: स्वतःची लैंगिकता उघड स्वीकारणारे दिग्दर्शक श्रीधर रंगायन यांचा 'गुलाबी आईना' हा चित्रपट सेन्सार बोर्डाच्या आडमुठेपणामुळे खूप काळ अडकून पडला. नंतर अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये हा चित्रपट दाखवला गेला.

**'लाईफ इन मेट्रो' आणि 'हनिमून ट्रॅव्हल्स प्रायव्हेट लिमिटेड' (२००७)**: या चित्रपटांमध्ये अनुक्रमे समलैंगिक जीवनशैली आणि पुरुषप्रधान लग्नसंस्थेला बळी पडलेली, कुटुंबियांच्या दबावाखाली लग्न करणारी समलिंगी व्यक्ती दाखवण्यात आली आहे.

**युवर्स इमोशनली (२००७)**: चित्रपटात समलैंगिक व्यक्तींच्या आयुष्यात असलेल्या समस्या व प्रेमाच्या तरल भावना, तसेच त्या अनुषंगाने 'गे' जीवनशैली चित्रित करण्यात आल्या आहेत.

**६८ पेजेस (२००७)**: हा चित्रपट पाच एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह व्यक्तींच्या आयुष्यात असणाऱ्या वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या समस्यांवर भाष्य करतो.

**दोस्ताना (२००८)**: 'दोस्ताना' चित्रपट बऱ्याच समलिंगी व्यक्तींना आवडला. आजच्या काळचा चित्रपट म्हणून याची गणती झाली. चित्रपटातल्या जीवनशैलीची, भाषेची, राहणीमानाची अनेकांना भुरळ पडली. या चित्रपटानेदेखील समलैंगिकतेवर आधारित एक व्यावसायिक चित्रपट म्हणून बरीच प्रसिद्धी मिळवली. या चित्रपटामुळेसुद्धा समलैंगिकतेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली.

**फॅशन (२००८)**: या चित्रपटामुळे समलैंगिक व्यक्तीच फॅशन विश्वाबरोबर, फिल्म इंडस्ट्रीबरोबर असलेलं नातं समाजासमोर आलं. छुप्या किंवा उघडपणे समलैंगिक व्यक्ती समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वीपणे काम करतात, असा विश्वास या चित्रपटाने दिला. त्याचबरोबर समलैंगिक व्यक्तींचे वैयक्तिक पातळीवरचे नातेसंबंध, येणाऱ्या समस्या यांवर हा चित्रपट भाष्य करतो. चित्रपटाचा मूळ विषय जरी वेगळा असला तरीही समलैंगिक व्यक्तींच फॅशन विश्व आणि बॉलिवूडवर असलेलं वर्चस्व या चित्रपटाने अधोरेखित केलं आहे. दिग्दर्शक मधुर भांडारकर यांनी चित्रपट लिहिला आणि दिग्दर्शित केला आहे.

**स्ट्रेट (२००९)**: 'विनय पाठक' यांची प्रमुख भूमिका असलेला 'स्ट्रेट' हा चित्रपट विनोदी पद्धतीने लैंगिकतेच्या बाबतीत गोंधळून गेलेल्या व्यक्तीच प्रतिनिधित्व करतो. समलैंगिक असणं चूक नाही, तुम्ही जसे आहात तसे स्वत:ला स्वीकारा या नोटवर सुखदरित्या या चित्रपटाचा शेवट होतो.

**पंख (२०१०)**: हा चित्रपट लिंगभावबद्दल गोंधळून गेलेल्या एका विवश तरूणाची कथा सांगतो. एका भिन्नलिंगी तरूणावर स्त्री भूमिका करण्याची सक्ती करण्यात आलेली असते, त्यातून आलेलं नैराश्य या चित्रपटात दाखवण्यात आले आहे.

**डनो व्हाय (२०१०)**: कोणताही चित्रपट निर्माण करण्यामागे खूप मोठी मेहनत असते, खूप प्रयत्न असतात पण त्या चित्रपटांच्या कथेमधून जर काही बोध होत नसेल किंवा त्या चित्रपटाला काही आशयच नसेल तर केलेल्या चित्रपटावर पाणी पडते, असंच काहीसं झालंय 'डनो व्हाय' चित्रपटाचं. कोणतीही ठोस भूमिका हा चित्रपट घेत नाही. दोन समलैंगिक व्यक्तींच्या आयुष्यात होणाऱ्या घडामोडी, त्यांचं कुटुंबाबरोबर असलेले नातं, एकमेकांबरोबर घालवलेले काही क्षण, त्यांना असणाऱ्या मर्यादा अशा तुटक प्रसंगांमधून हा चित्रपट पुढे सरकतो. काही प्रसिद्धी आणि ज्येष्ठ कलाकारांच्या अभिनयामुळे हा चित्रपट तरला गेला आहे असेच म्हणावे लागेल. बाकी या चित्रपटात लता मंगेशकर यांनी गायलेलं गाणं व शान आणि श्रेया घोषाल यांच एक डूएट मात्र छान जमून आलंय हीच काय ती एक जमेची बाजू. या चित्रपटाचा

२०१५ साली सिक्वेल आला होता, त्यात एका पाकिस्तानी आणि भारतीय समलैंगिक मुलाच्या आयुष्यावर हा चित्रपट भाष्य करतो. समलैंगिक मुलांवर भारतीय पारंपरिक मानसिकतेचा असलेला दबाव, व्दिधा मन:स्थिती यात दाखविण्यात आली आहे. पठडीतली कथा आणि कृत्रिम अभिनयामुळे चित्रपट फारसा मनात ठसत नाही.

**आय एम (२०११)**: ओनीर यांचा 'आय एम' हा चित्रपट चार वेगवेगळ्या कथांचा मिलाफ आहे. यातील 'अभिमन्यू' ही कथा बाललैंगिक शोषणावर भाष्य करते. बाललैंगिक शोषणामुळे एका मुलाला कोणत्या प्रकारच्या मानसिक अवस्थेतून जावे लागते, त्याच्या संपूर्ण आयुष्यावर या गोष्टीचा झालेला परिणाम, त्याला झालेला त्रास, आयुष्य बदलून गेल्याची भावना, नैराश्य हे सगळ या चित्रपटात व्यवस्थितपणे टिपण्यात आलं आहे. अनेक समलैंगिक व्यक्तींनासुद्धा त्यांच्या नैसर्गिक वागण्यामुळे, पण समाजाच्या चौकटीत न बसल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या शोषणाला बळी पाडले जाते. त्यांना वेगवेगळी 'लेबलं' लावली जातात. या सगळ्यांचा खोल परिणाम होतो व अशा व्यक्तींचं आयुष्य नकारात्मकदृष्ट्या बदलवून टाकतो, ही कथा त्यासाठी अतिशय महत्त्वाची वाटते.

या चित्रपटातली दुसरी एक कथा 'ओमर'. या कथेमध्ये एका समलैंगिक व्यक्तीला ब्लॅकमेल करण्यात येते. पैसे उकळण्यासाठी लोक समलैंगिक व्यक्तींच्या भावनांचा कसा गैरवापर करू शकतात याचंच चित्रण या चित्रपटात आहे. तसेच समलैंगिक व्यक्ती त्यांच्या वेगळ्या लैंगिक कलामुळे कशा 'असुरक्षित' आहेत हेही या चित्रपटामधून उद्धृत होते.

**बॉम्बे टॉकीज (२०१३)**: चार कथा एकत्र असलेल्या या चित्रपटातल्या 'अजीब दास्ता है ये' या कथेमध्ये, स्वतःची लैंगिकता लपवून दुटप्पी आयुष्य जगणाऱ्या एका 'गे' व्यक्तीची कथा सांगण्यात आली आहे. त्याचं लग्न झालं आहे, त्याची घुसमट छान पद्धतीने चित्रित करण्यात आली आहे. करण जोहर यांनी ही कथा दिग्दर्शित केली होती. 'शीला कि जवानी' या चित्रपटातल्या दुसऱ्या कथेमध्ये एका बारा वर्षांच्या, नुकताच ज्याला स्वतःच्या लैंगिकतेची जाणीव हळूहळू होते आहे, त्याला त्याची लैंगिकता अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळत नाहीये, पालकांच्या आकांक्षांपायी त्याचा जीव गुदमरतोय. पौगंडावस्थेत पदार्पण करतानाची घुसमट, गोंधळ, तणाव झोया अख्तर या दिग्दर्शिकेने छानपणे टिपले आहे. प्रत्येकाला आपापल्या नैसर्गिक लिंगभावाप्रमाणे जगता यायला हवे ही गोष्ट येथे अधोरेखित होते.

**मार्गारिटा विथ अ स्ट्रो (२०१४)**: साली हा चित्रपट प्रदर्शित झाला. सोनाली बोसने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. 'सेरेब्रल पाल्सी' आजाराने पीडित असलेली 'लैला' 'खालून' नावाच्या अंध मुलीवर प्रेम करते. तिच्या लैंगिकतेच्या बाबतीत गोंधळून गेली आहे. रिलेशनशिपमधला रोमान्स, लैंगिकतेबाबत गोंधळ आणि दिव्यांगांचे सेक्स-लाईफ, त्यांचे प्रश्न यांवर हा चित्रपट भाष्य करतो.

**देड इश्किया (२०१४)**: या चित्रपटात समलिंगी नातं सुचवलं गेलं आहे.

**अँग्री इंडियन गॉडेसेस (२०१५)**: साली आलेला लेस्बियन जोडप्यांचं प्रेम, त्यासाठी त्या दोघींना करावा लागणारा संघर्ष, जवळच्या व्यक्तींसाठी करावी लागणारी मनधरणी, तसेच समाजातल्या काही वैगुण्यांवर नेमकेपणाने बोट ठेवतो.

**LOVE (२०१५)**: 'गे' रिलेशनशिपमधले प्रश्न यात हाताळण्यात आले आहेत. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला **'टाईम आऊट'** भारतीय कुटुंबातील समलैंगिक व्यक्तींची अस्वीकृतीवर भाष्य करतो.

**अलीगड (२०१६)**: साली प्रदर्शित झालेला हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित आहे. हंसल मेहता या चित्रपट दिग्दर्शकाचं यासाठी विशेष कौतुक करावं लागेल. त्यांनी अतिशय मुद्देसूदपणे या चित्रपटाची मांडणी केली आहे. चित्रपटातला कोणताही प्रसंग कंटाळवाणा वाटत नाही. सामाजिक

संवेदनशील विषयावर आधारित असलेला हा चित्रपट कलात्मक श्रेणीत मोडतो. चित्रपटांमधून प्रेक्षकांना नेमकं काय दाखवायचं याचं भान या दिग्दर्शकाला आहे. चित्रपट सत्यघटनेवर आधारित असल्यामुळे चित्रपटातील घटना हृदयाला जाऊन भिडते. कसलेल्या अभिनेत्याचा संयत अभिनय, चित्रपटाची पटकथा आणि सर्वच दृष्ट्या हा चित्रपट एका वेगळ्या, विशिष्ट उंचीवर जाऊन पोचला आहे. सत्य घटनेचा संबंध भारतीय दंडविधान संहिता कलम ३७७ शी निगडित असल्यामुळे चित्रपटाचे महत्त्व अजूनच वाढते. हा चित्रपट ज्या काळात प्रदर्शित झाला तेव्हा आय.पी.सी. कलम ३७७ गुन्हेगारीच्या कक्षातून मुक्त झालेले नव्हते, त्यामुळे चित्रपट पाहताना प्राध्यापक श्रीनिवास सिरस यांच्याबद्दल मनात एक हळवा कोपरा तयार होतो. या चित्रपटाने इथेच बाजी मारली आहे.

प्राध्यापक सिरस अलीगढ विद्यापीठात मराठी शिकवायचे. समलैंगिक संबंध ठेवल्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. अनेक प्रकारचा सामाजिक संघर्ष त्यांना करावा लागला. तरीदेखील अन्याया विरुद्ध ते लढले. निकाल त्यांच्या बाजूने लागला, पण हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ते राहत होते तिथे त्यांचा मृतदेह आढळून आला. ही आत्महत्या की खून? असे प्रश्न रेंगाळत राहतात. या चित्रपटाचं वेगळेपण म्हणजे हा चित्रपट प्रेक्षकांना समलैंगिकतेबद्दल सहानुभूतीने नव्हे तर मेंदूने विचार करण्यास भाग पाडतो.

**कपूर अँड सन्स (२०१६):** हा चित्रपट समलैंगिकतेला पुसटसा स्पर्श करतो.

**शब (२०१७):** हा चित्रपट समलैंगिक व्यक्तींच्या आयुष्यात असलेला एकटेपणा, सामाजिक चालीरीतींमुळे होणारा त्रास आणि इतर समस्यांवर दृष्टिक्षेप टाकतो.

**इव्हिनिंग शाडोज (२०१८):** साली श्रीधर रंगायन दिग्दर्शित हा चित्रपट आई आणि मुलाचे सुंदर नातं सांगतो. पारंपरिक भारतीय कुटुंबाचा समलैंगिकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या या चित्रपटातून दाखवण्यात आल्या आहेत. भारतीय पालकांनी त्यांच्या लैंगिक वेगळेपण असणाऱ्या मुलांना सकारात्मक दृष्टिकोनातून स्वीकारावे, असा संदेश हा चित्रपट देऊन जातो. एक हलका-फुलका तरीही उच्च निर्मितीमूल्य असलेला हा चित्रपट एल.जी.बी.टी. समाजाने आपल्या पालकांबरोबर बसून पहावा असाच आहे.

**एक लडकी को देखा तो ऐसा लगा (२०१९):** दोन लेस्बियन स्त्रियांच्या प्रेमावरचा हा बॉलिवूडचा पहिलाच व्यावसायिक चित्रपट, तसेच आय.पी.सी. कलम ३७७ ला गुन्हेगारीच्या कक्षेतून मुक्त केल्यानंतरचा पहिलाच चित्रपट. बॉलिवूड गाजवलेले बिग स्टार, उच्च निर्मितीमूल्यं असलेला हा चित्रपट. या चित्रपटाचा स्क्रीन-प्ले गजल ढालीवाल या ट्रान्सवुमनने लिहिलेला आहे. हे आणखी एक वैशिष्ट्य.

चित्रपटाची कथा पठडीतली असून एकदा पाहण्यासारखा आहे. हा चित्रपट पुरुषप्रधान संस्कृतीत संगोपन झालेली एक मुलगी वडिलांच्या प्रेमात मोठी झाली आहे. तिचं ज्या मुलीवर प्रेम असतं, ते मिळवण्यासाठी, समाजमान्य होण्यासाठी तिला जो संघर्ष करावा लागला याचंच चित्रण या चित्रपटात आहे.

नवीन येणाऱ्या चित्रपटांची सर्वांनाच खूप उत्सुकता असते. एक नवीन चित्रपट येऊ घातलाय, नाव असणार आहे 'शुभमंगल ज्यादा सावधान'. सध्याचा स्टार आयुषमान खुराणा यात एका समलैंगिक व्यक्तीची भूमिका करणार असून चित्रपटाची कथा अर्थातच गुलदस्त्यात आहे. या चित्रपटाचा ट्रेलर युवा वर्गामध्ये आत्तापासूनच लोकप्रिय झाला आहे.

**जबाबदारी**

प्रदर्शित न झालेल्या चित्रपटांचे पुनरूज्जीवन करणं, प्रदर्शित झालेल्या चित्रपटांच जतन करणं, संवर्धन करणं आणि पुढच्या पिढीसाठी उपलब्ध करून देणं, तसेच समलैंगिकतेवरच्या चित्रपटांसाठी लेखन करण्यासाठी प्रोत्साहन देणं ही एल.जी.बी.टी. समाजाची जबाबदारी आहे.

**एल.जी.बी.टी. अधिकारांचे पुरस्कर्ते**

आय.पी.सी. कलम ३७७ गुन्हेगारी कक्षेतून मुक्त होण्याआधीपासून ज्या कलाकारांनी समलिंगी समाजाला पाठिंबा दिला, त्या कलाकारांचं कौतुक करावसं वाटतं. सारं जग समलैंगिकतेच्या विरोधात असतानासुद्धा पैसा, प्रसिद्धी, ग्लॅमर यांचा विचार न करता उदारमतवादी भूमिका घेणारे हे कलाकार यांचा विशेषत्वाने उल्लेख केल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही.

आमीर खानने त्याच्या 'सत्यमेव जयते' या टी.व्ही. शोद्वारे समलैंगिकतेवर सर्वंकष असा कार्यक्रम प्रसारित केला आणि पाठिंबा दिला.

सेलेना जेटली तिच्या एका भाषणात म्हणते, 'जो बदल झालेला पाहायला आपल्याला आवडतं, त्या गोष्टी बदलण्यासाठी कामदेखील मलाच करावं लागेल. सर्वांना समानतेचा अधिकार संविधानाने दिलेला आहे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे देखील भारतीय नागरिक म्हणून माझं कर्तव्य आहे आणि म्हणूनच माझा एल.जी.बी.टी. समाजांच्या हक्क मिळवण्याच्या लढ्याप्रती पाठिंबा आहे.' तसेच ऋतिक रोशन, जॉन अ‍ॅब्रॅहम, मधुर भांडारकर, वरूण धवन, स्वरा भास्कर, जुही चावला, सोनम कपूर यांसारखे अनेक कलाकार आहेत ज्यांनी उघडपणे एल.जी.बी.टी. या समाजाला पाठिंबा दर्शविला आहे. त्यांच्या अशा पाठिंब्यामुळे एल.जी.बी.टी. समाजाचा आत्मविश्वास वाढण्यास नक्कीच मदत झाली आहे. त्याचबरोबर स्वतःची लैंगिकता उघडपणे समाजासमोर स्वीकारून काम करणारे कलाकार बॉबी डार्लिंग आणि दिग्दर्शक करण जोहर यांचाही आवर्जून उल्लेख करत आहे.

**अपेक्षा**

भविष्यात येणाऱ्या चित्रपटांमध्ये समलैंगिक विवाह, कायद्याची भूमिका, लैंगिक शिक्षणाची गरज, आरोग्य क्षेत्र तसेच समलैंगिक समाजाला त्यांच्या सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक पातळीवर व दैनंदिन आयुष्य जगताना भेडसावणाऱ्या समस्या यांच्याकडे लेखक, दिग्दर्शक, निर्मात्यांना लक्ष वळवावे लागेल.

ज्या दिवशी एल.जी.बी.टी. समाजातल्या प्रश्नांना, समस्यांना, जीवनशैलीला मुख्य प्रवाहातल्या व्यावसायिक चित्रपटांमध्ये चेहरा मिळेल आणि त्यांचा सहज वावर फिल्म इंडस्ट्रीमध्ये असेल, तो सुदिन लवकर येवो अशी अपेक्षा करूया.

# समलिंगी जोडपी

कोण म्हणतं की समलिंगी जोडप्यात प्रेम नसतं?
कोण म्हणतं समलिंगी जोडप्यांना नातं जपायची इच्छा नसते?
म्हणणारे अडाणी आहेत, कारण,
प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं !
खाली काही उदाहरणे दिली आहेत, जिथे भारतात समलिंगी विवाहाला
कायद्याची मान्यता नसतानाही...
काहींनी धार्मिक विवाह केला, तर काहींनी विदेशी जाऊन लग्न केलं,
तर काहीजण लग्न न करताही अनेक वर्षं सुखाने संसार करत आहेत !
या व अश्या सर्वांचं हार्दिक अभिनंदन !
अशा जोडप्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे !

टिपणी : या लेखातील मजकूर व फोटो हे फक्त या मासिकासाठी (छापील व e आवृत्ती) दिलेले आहेत. यांचा वापर इतरत्र करण्यास (उदा. ऑनलाइन, सोशल मिडिया, प्रिंट मिडिया) परवानगी नाही. ज्यांना त्यातील मजकूर/फोटो इतरत्र वापरायचे आहेत त्यांनी त्या त्या जोडप्याशी संपर्क साधून रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यांचे इ-मेल आयडी खाली दिले आहेत.

Note : The material and photos used in this article are only for this magazine's publication (hard copy and e-version). They cannot be used for publicity in either print or online or social media. Those who need to use this material/photos kindly approach the respective couples for their permission. This is mandatory. Their email ids are listed at the end of each story.

**हृषीकेश आणि विन्ह** Email : hrishi@hotmail.com

मी, हृषीकेश साठवणे आणि विन्ह याने दिनांक ३० डिसेंबर २०१७ रोजी माझ्या गावी, यवतमाळ (महाराष्ट्र, इंडिया) इथं पारंपरिक भारतीय पद्धतीनं लग्न केलं. माझ्या आईवडिलांनी यात सक्रिय सहभाग घेतला आणि काही नातेवाईक, शाळा-कॉलेजातले मित्रमैत्रिणी, शिक्षक, काही हितचिंतक आणि क्वियर समाजातले माझे मित्र असे मिळून शंभराच्या वर लोक आमच्या लग्नाला आले होते. परदेशात २०१८ साली कॅलिफोर्निया या शहरात लग्न केलं.

विन्ह (Vinh) मूळचा व्हिएतनामचा आहे. तो लहान असताना त्याचं कुटुंब कॅलिफोर्नियात स्टॉकटन इथं स्थायिक झालं. आमची भेट okcupid.com या डेटिंग साईटवर २०१६ मध्ये झाली. आम्ही डेटिंग करत असतानाच भारतात पारंपरिक पद्धतीने लग्न करायचं असं ठरलं आणि त्यानुसार माझ्या मूळ गावी यवतमाळमध्ये आमचं भारतीय पद्धतीने लग्न झालं.

**नितीन आणि थॉमस** Email : thomas.n.nitin@gmail.com

मी, नितीन कराणी, मूळचा मुंबईचा व माझा जोडीदार थॉमस जोसेफ मूळचा चेन्नईचा. तो मुंबईला ११ वर्षांपूर्वी आला. सध्या तो कामासाठी बेंगळूरूला असतो. मी आणि थॉमसनी जूनमध्ये अमेरिकेची वारी केली आणि २ जुलै २०१९ रोजी न्यूयॉर्क शहरात कायदेशीर लग्न केलं. टेक्सासमध्ये स्थायिक असलेला माझा भाचा साक्षिदार म्हणून उपस्थित होता. त्याची बायको आणि त्याच्या दोन मुलीही या सोहळ्याला आल्या होत्या. थॉमसच्या बाजूनी त्याची मामेबहिण व तिचा नवरा या लग्नासाठी खास टोरोंटोहून आले होते व त्याचा मामेभाऊ सॅन फ्रँसिस्कोहून आला होता.

योगायोग म्हणजे वीस वर्षांपूर्वी याच दिवशी भारतातील पहिली 'अभिमान पदयात्रा' (फ्रेंडशिप वॉक) कोलकत्त्यात पार पडली होती, ज्यात मी सहभागी होतो. दुसरा योगायोग असा, की २ जुलै २००९ साली दिल्ली उच्च न्यायालयाने प्रौढांमधील संमतीने झालेला समलैंगिक संबंध हा गुन्हा नाही, असा ऐतिहासिक निकाल दिला होता.

मी समपथिक ट्रस्ट (पुणे) चा स्थापनेपासून(२००२) या संस्थेचा विश्वस्त राहिलेलो आहे.

**समीर आणि अमित** Email : sdsamudra@hotmail.com

मी, समीर समुद्र पुण्याचा आणि अमित गोखले कल्याणचा. आम्ही अमेरिकेत २००४ साली 'गे बॉम्बे' या डेटिंग साईटवरून एकमेकांना भेटलो. अमित क्लीव्हलंडमध्ये शिकत होता आणि मी कोलंबसमध्ये नोकरी करत होतो.

आम्ही दोघांनी सात वर्षे एकत्र काढल्यानंतर, १८ सप्टेंबर, २०१० रोजी आम्ही भारतीय विवाहपद्धतीने अमेरिकेत लग्न केले. अमेरिकेत समलिंगी विवाहाला मान्यता मिळाल्यानंतर १५ जून, २०१४ मध्ये कायदेशीररित्या पुन्हा एकदा विवाह केला.

दोन्ही लग्नाच्या वेळी घरचे उपस्थित नव्हते कारण त्यावेळी आमच्या नात्याबद्दल घरचे तयार नव्हते पण आज परिस्थिती बदलली आहे. आम्ही दोघं सध्या पुण्यात स्थायिक झालो आहोत.

**मृणाल आणि प्रशांथ** Email : mtalukdar81@gmail.com

मी, मृणाल तालुकदार पुण्यात राहत होतो आणि प्रशांथ तालुकदार बेंगळूरूमध्ये.

प्रशांथ आणि मी इतरांसारखेच एका डेटिंग साईटच्या माध्यमातून ०२ एप्रिल, २००८ मध्ये भेटलो. बेंगळूरूमध्ये ११ वर्षे आम्ही सहजिवनात (समलिंगी लिव्ह इन रिलेशनशिप) रहात होतो.

०२ एप्रिल २०१९ रोजी केप टाऊन (दक्षिण आफ्रिका) या देशात आम्ही कायदेशीररित्या विवाहबद्ध झालो. सध्या आम्ही दोघेही पुण्यात राहत आहोत. आमचा धार्मिक विधींवर विश्वास नसल्याने विधियुक्त विवाह करण्याचा आमचा कोणताही मानस नाही.

आता आम्ही कायदेशीर विवाहित जोडपे असलो तरीही भारतात समलिंगी विवाहाला कायद्याची मान्यता नाही. आशा आहे की तो दिवस लवकरच येईल.

**शिबू आणि जो** Email : Not provided

मी शिबू थॉमस, मूळचा डोंबिवलीचा (मुंबई). आणि जो झकारिया मूळचा भांडुपचा (मुंबई). २००४ मध्ये 'गे बॉम्बे' ने आयोजित केलेल्या पार्टीमध्ये आम्हा दोघांची पहिली भेट झाली.

आम्ही गेली १४ वर्षे सहजिवनात (समलिंगी लिव्ह-इन रिलेशनशिप) रहात आहोत. लग्न करण्याचं पाऊल उचलणं आम्हाला महत्त्वाचं वाटलं म्हणून आम्ही ७ एप्रिल २०१६ रोजी न्यूयॉर्क शहरात कायदेशीर लग्न केलं. जो नी त्याच्या चुलत बहिणीला सांगितलं व ती साक्षिदार म्हणून आमच्या लग्नाला उपस्थित होती.

**टिनेश आणि अभिषेक** Email : abhi.ec.mmm@gmail.com

मी, टिनेश चोपडे जळगावचा आणि अभिषेक शर्मा दिल्लीचा. पण आता दोघेही मुंबईमध्ये राहतो. आमची दोघांची भेट २१ जानेवारी २०११ साली ऑनलाईन 'गे डेटिंग' साईटच्या माध्यमातून झाली व गेली ९ वर्षे आम्ही सहजिवनात (समलिंगी लिव्ह-इन रिलेशनशिप) रहात आहोत.

या क्षणी आम्हाला नक्की सांगता येत नाही, की आम्ही लग्न करू शकणार की नाही, कारण आम्हांला जाणीव आहे, की भारतामध्ये समलिंगी विवाहाला अजूनतरी मान्यता नाहीये. पण तो दिवस नक्की येवो ही इच्छा नक्की आहे कारण विवाह हा अजून एक पुरावा आहे, की आमचे प्रेम इतर भिन्नलिंगी जोडप्यांसारखेच वैध आहे. आमच्या मते लग्न करणे म्हणजे आयुष्यभर एखाद्यावर अवलंबून राहणे, एखाद्याने आपल्यावर अवलंबून राहण्यास सक्षम असणे आणि आपल्याबरोबर अशी व्यक्ती आहे ज्याच्यावर आपण पूर्ण विश्वास ठेवू शकतो अशी खात्री असणे.

मी समपथिक ट्रस्ट (पुणे)चा विश्वस्त आहे व बिंदु क्विअर राईटस् फाउंडेशनचा डायरेक्टर आहे.

# समलिंगी जोडपी



भारतीय पारंपारिक पद्धतीने विवाह



डावीकडून-हृषीकेश आणि विन्ह




डावीकडून- नितीन आणि थॉमस




नवविवाहित जोडपं



डावीकडून- समीर आणि अमित



कायदेशीर विवाह करतेवेळी अमित आणि समीर

Note : The material and photos used in this article are only for this magazine's publication (hard copy and e-version). They cannot be used for publicity in either print or online or social media. Those who need to use this material/photos kindly approach the respective couples for their permission. This is mandatory.


# समलिंगी जोडपी



येस! मॅरेज लायसन्स मिळाले!



मृणाल आणि प्रशांथ




नवविवाहित दाम्पत्य



डावीकडून शिबू आणि जो



हार्दिक शुभेच्छा !




डावीकडून टिनेश आणि अभिषेक

Note : The material and photos used in this article are only for this magazine's publication (hard copy and e-version). They cannot be used for publicity in either print or online or social media. Those who need to use this material/photos kindly approach the respective couples for their permission. This is mandatory.

# यवतमाळ, महाराष्ट्र येथील पहिल्या भारतीय समलिंगी विवाहाची कथा



**सौरभ बोन्द्रे**


सौरभ बोन्द्रे हे पेशाने शिक्षक आहेत. हा लेख ऋषिकेश साठवणे यांनी इंग्रजीमध्ये लिहिला आहे. या मूळ इंग्रजी लेखातील काही भाग सौरभ बोन्द्रे यांनी मराठीत भाषांतरित केला आहे.

**ईमेल -** saurabhusbondre@gmail.com


**टिपणी :** ऋषिकेश व विन्ह यांच्या विवाहाचे फोटो या दिवाळी अंकात 'समलिंगी जोडपी' या सदरात दिले आहेत.

विन्ह आणि मी, दिनांक ३० डिसेंबर २०१७ ला माझ्या गावी, यवतमाळ इथं पारंपरिक भारतीय पद्धतीनं लग्न केलं. माझ्या आईवडिलांनी यात सक्रिय सहभाग घेतला आणि काही नातेवाईक, शाळा-कॉलेजातले मित्रमैत्रिणी, शिक्षक, काही हितचिंतक आणि क्वियर समाजातले माझे काही मित्र असे मिळून शंभरच्या वर लोक आमच्या लग्नाला आले होते.

मी यवतमाळमध्ये जन्मलो आणि बारावीपर्यंतचं शिक्षण इथं पूर्ण केलं. त्यानंतर IIT Entrance साठी अगदी थोडा काळ मी चेन्नईत होतो आणि त्याच्या पुढच्या वर्षीच मला IIT मुंबई मध्ये प्रवेश मिळाला. तिथं मी B.Tech. (Engg. Physics) पूर्ण केलं आणि मला अमेरिकेत 'आयोवा स्टेट युनिव्हरसिटी' इथं इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये MS करायची उत्तम संधी मिळाली. MS करून मी बॉइज, आयडॅहो इथं एक वर्ष राहिलो आणी त्यानंतर २००० साली कॅलिफोर्नियामध्ये स्थायिक झालो.

विन्ह मूळचा विएतनामचा आहे आणि तो लहान असताना त्याचं कुटुंब कॅलिफोर्नियात स्टॉकटन इथं स्थायिक झालं. इथेच कॉलेज पूर्ण करून तो शैक्षणिक क्षेत्रात काम करू लागला. काही वर्षं त्यानं मध्य-आशिया आणि चायनामध्ये लहान मुलांना शिकवलं आणि मग अमेरिकेला परत आल्यावर स्टॉकटन मध्ये लहान मुलांना शिकवू लागला.

आमची भेट झाली ती okcupid.com वर, ऑक्टोबर २०१६ मध्ये. मला माझ्या जोडीदाराकडून भरपूर अपेक्षा होत्या. माझ्या या आधी, १० वर्षं आणि मग पुन्हा ३ वर्षं, अशा दोन relationships झालेल्या होत्या. त्यामुळे आपल्याला आपल्या जोडीदाराकडून काय अपेक्षित आहे याचा मला बऱ्यापैकी अंदाज होता. त्याच्या रूपाखेरीज मला त्याच्याबद्दलची आवडलेली गोष्ट म्हणजे त्याच्या कुटुंबाला आणि नातेवाइकांना तो गे असल्याचं माहीत होतं आणि त्यांचा त्याला पूर्ण पाठिंबा होता. तो घरी आणि त्याच्या कामाच्या ठिकाणी त्याच्या लैंगिकतेच्या बाबतीत मोकळा आणि comfortable होता. तसंच, आम्हांला दोघांनाही एकनिष्ठ रहायचं होतं, मुलं हवी होती आणि मुख्य म्हणजे तो अमेरिकेत असूनही आपल्या आईवडिलांसोबत राहात होता, त्यामुळे माझ्याही आईवडिलांसोबत राहताना त्याला अवघड वाटणार नव्हतं. अमेरिकेतही समाज गे कुटुंबांचा सहजपणे स्वीकार करत नाही; हे निभावून न्यायला आपल्याला खरंच धाडसी आणि कणखर असावं लागतं. त्यामुळे, समाजात विन्हच्या open असण्याने मला एक

प्रकारची खात्री वाटली, की संसार आणि मुलं ही गोष्ट आम्हांला जमेल.

आम्हांला दोघांनाही सासूसासऱ्यांशी बोलताना भाषेची अडचण आहेच, पण त्याचा फार त्रास नाही. अमेरिकेत २० वर्षं घालवल्यामुळे माझ्याकडे भारतीय आणि अमेरिकन संस्कृतीची सरमिसळ आहे. त्याच्याही घरी व्हिएतनामी-चीनी आणि अमेरिकन संस्कृतीची अशीच सरमिसळ आहे, त्यामुळे या गोष्टी सहज जमल्या. काही सांस्कृतिक फरक आहेत, पण यांहूनही मोठ्या अडचणी मी या आधी हाताळलेल्या होत्या. Okcupid वर काही काळ ईमेलने संवाद साधल्यानंतर आम्ही प्रत्यक्ष भेटायचं ठरवलं.

काही काळ डेटिंग झाल्यावर आम्ही engaged झालो. एंगेजमेंट झाल्यावर मी आमची भारत-भेट आणि लग्नाबद्दल बोलायला सुरू केलं. विन्ह साडेतीन वर्षांपूर्वी भारतात येऊन गेला होता. त्याचा विसा ५ वर्षांचा असल्यामुळे विसाची अडचण आली नाही. आम्ही डेटिंग करत असतानाच त्यानं भारतात लग्न करायचं मान्य केलं होतं, त्यामुळे मला त्याला यासाठी खास समजवावं वगैरे लागलं नाही. खरी अडचण सर्वांनी यवतमाळात लग्नाकरता तयार होण्याची होती. दोन्हीकडचे आईवडील सुरूवातीला यासाठी तयार नव्हते. पण हळूहळू मी आधी आईचं मन वळवलं आणि मग तिनं बाबांनाही तयार केलं. सगळ्यांची संमती झाल्यावर तिकिटं बुक केली.

लग्नासाठी फेसबुकवर दोन इव्हेंटस् केले. एक माझ्या गे मित्रांसाठी आणि दुसरा बाकीच्या मंडळींसाठी. थोड्याफार फरकाने अगदी एकसारखे इव्हेंटस्. माझ्या यवतमाळच्या मित्रांशी बोलल्यावर लक्षात आलं, की ख्रिसमसच्या अलीकडचा एखादा विकएन्ड बरा पडेल म्हणजे सगळ्यांना सुट्ट्या मिळतील. ३० डिसेंबरच्या शनिवारी, दुपारी ३ वाजताची वेळ ठरवली. यामुळे लांबच्या लोकांची सोय झाली, कारण ते शुक्रवारी गाड्या पकडून शनिवारी सकाळी यवतमाळला आले आणि लग्न झाल्यावर निवांतपणे रविवारी सकाळी निघून आपापल्या गावी सोमवारी कामावर जाऊ शकले. ज्यांना आपापल्या गावी ३१ डिसेंबर वगैरे साजरा करायचा होता त्यांनाही शनिवारी रात्री निघून रविवारी आपल्या घरी जाता आलं. लग्नाचं स्थळ मात्र मी मुद्दामच कळवलं नव्हतं. तारीख मात्र लवकर ठरवल्यानं सगळ्यांना त्यांच्या सुट्ट्या आणि Trips नीट करता आल्या.

मला येणाऱ्या प्रत्येकाला एक छोटासा अहेर करायचा होता. विन्हची इच्छा होती, की तो eco-freindly बनलेला असावा आणि त्यात प्लास्टिकचा वापर असू नये. मी अमेरिकेतल्या Costco आणि इतर ठिकाणांहून या अहेरात देण्यासाठी काही मिठाया घेतल्या. आईने आणि मी या अहेराच्या पॅकिंगचे वेगवेगळे पर्याय शोधले आणि शेवटी एक तागाचे, म्हणजे Jute चे छोटेसे पाऊच आम्ही फायनल केले. मुंबईत सेल्स ऑफिस असलेली एक कोलकात्याची कंपनी आहे, त्यांनी आम्हाला आमचे कस्टम डिझाइन असलेले पाउच बनवून द्यायची तयारी दाखवली. माझ्या बहिणीला फोटोशॉप येतं त्यामुळे तिनं पटकन काही डिझाइन्स दाखवली. आम्ही एक Rainbow stripes असलेला ♥ चा आकार निवडला आणि त्याच्या बाजूला Hrishi ♥ Vinh ही अक्षरं लिहिली. अमेरिकेतली मिठाई आणि यवतमाळचे लोकप्रिय गोड तिखटमिठाचे पदार्थ एकत्र करून हे पाउच बनवलं.

आई-बाबा साधारण एक महिना आधी यवतमाळला जाऊन तयारी करणार होते आणि विन्ह आणि मी लग्नाच्या दहा दिवस अगोदर जाणार होतो. लग्नाची ऐनवेळची तयारी, नातेवाईक, शाळेतले मित्र,

शिक्षक आणि इतर मंडळींची निमंत्रणं मला करायची होती. अमेरिकेतून लागणारं सामान, मुंबईतून करायची खरेदी आणी शेवटी यवतमाळातून घ्यायचं सामान याची मी एक यादी केली. अमेरिकेत विकत घेतलेली सर्वांत महत्त्वाची वस्तू म्हणजे Gay Couple Cake Topper. त्याखेरीज, भारतात चांगली Desert Wine मिळेल याची खात्री नव्हती, म्हणून तीही अमेरिकेतच घेतली.

मुंबईतील मुख्य खरेदी म्हणजे लग्नाचे dress. विन्हला Natural fiber चा आणि कसलीही चमकी नसलेला ड्रेस हवा होता. आम्ही खूप सारी दुकानं पालथी घातली, पण हवं तसं कापड किंवा डिझाइन किंवा हवी ती साइज मिळालीच नाही. शेवटी टी.व्ही. मालिका आणि चित्रपटांचे costume बनवणारा मंगेश आमच्या मदतीला धावून आला. त्यानं silk, cotton आणि linen वगैरेची खरेदी करून योग्य तसा ड्रेस अगदी वेळेत शिवून दिला. त्यात १००% नैसर्गिक धागा (Natural fiber) वापरलेला होता आणि कशिदासुद्धा Natural fiber चाच होता. शिवाय स्वतंत्र बनवून घेतल्यामुळे तो अगदी मापात आला. फक्त या dress चा खर्च मजबूत झाला. आमच्या लग्नात बहुधा सगळ्यांत जास्त खर्च या ड्रेसवरच झाला.

साधारण १९९७ मध्ये मी घरच्यांना माझ्या लैंगिकतेबद्दल सांगितलं, तेव्हांच जवळच्या नातेवाइकांनाही सांगितलं. त्यानंतर facebook च्या कृपेने लांबच्याही नातेवाइकांना सांगितलं. बहुतेक नातेवाइकांनी आईबाबांजवळ काळजी व्यक्त केली, पण मी किती ठाम आहे ते फेसबुकवर कळल्यावर हळूहळू त्यांनी स्वीकार केला. त्यांनी माझ्या आधीच्या दोन relationships बनताना आणि तुटतानाही पाहिल्या होत्या. माझी विन्हसोबतची एंगेजमेंटही त्यांनी fb वर पहिली होती. विन्ह मुंबईत माझ्या काही भावंडांना भेटला आणि आम्ही एका भावाकडे राहिलो देखील. त्या सगळ्यांनी त्याला आपलंसं केलं. त्यानंतर मग नातेवाइकांच्या भेटींची एक लांबलचक मालिकाच सुरू झाली. मुंबई-पुणे-नाशिक-औरंगाबाद आणि शेवटी यवतमाळ. प्रत्येकानी त्यांच्या कुटुंबात विन्हचं स्वागत आपापल्या पद्धतीने केलं. त्याचसोबत, बिंदुमाधव, अमित, समीर अशा काही मित्रांशीही भेट झाली. औरंगाबादेत आम्ही सोन्याच्या अंगठ्या घेतल्या. अर्थातच, भारतीय आणि चीनी-विएतनामी थीमच्या अंगठ्या करूनच घ्याव्या लागल्या. अंगठ्यांवर यिन-यांगची चिन्ह घालायला सांगितली. या सगळ्यात आम्ही काही ठिकाणी फिरायलाही गेलो. अजिंठा-वेरूळ-देवगिरी ही त्यांतली महत्त्वाची ठिकाणं. विन्ह बौद्ध असल्याने त्याला बौद्ध गुंफा खूपच आवडल्या.

यवतमाळला आल्यावर आमचे कुटुंब, विन्ह आणि मी, 'माहूरचा दत्त' या आमच्या वडिलोपार्जित देवळात दर्शन घेऊन आलो. तसेच जांभोऱ्यातील महानुभाव आश्रमाचेही दर्शन घेऊन आलो. विन्ह व मी, आमच्या शाळेतल्या मित्रांना भेटलो आणि त्यांतले जे जे supportive होते त्यांना निमंत्रणं केली. नातेवाइकांपैकीही काहीजण सोडल्यास, बाकी सगळे supportive होते. काहींना वाटलं की मी घराण्याचं नाव खराब करतोय, तर काहींना वाटलं, की लग्नात काहीतरी वाईट घडेल. आईबाबा आणि आम्ही काही ओळखीच्या लोकांना भेटून, त्यांचा जरासा अंदाज घेतला आणि निमंत्रणं केली. काही मित्रांना लग्नाच्या सकाळी निमंत्रित केलं. माझ्या शाळेतल्या शिक्षकांनाही निमंत्रित केलं. त्यांपैकी फक्त एकच जण लग्नाला आले नाहीत. अनेक शिक्षक निवृत्त होऊन स्थलांतरित झालेत, नाहीतर आणखी शिक्षक आले असते.

सोहळा संपेपर्यंत माझ्या आईवडिलांना काहीतरी अनिष्ट घडण्याची धास्ती वाटत राहिली. माझा एक

शाळकरी मित्र सरकारी कंत्राटदार आहे आणि त्याच्या खूप ओळखी आहेत. त्यानं 'अजिबात काळजी करू नका आणि काही झालंच तर मी आहेच' असं आश्वासन आधीच आईला दिलं होतं.

माझ्या आईनं लग्नात काही कार्यक्रम करण्यासाठी अनेक ओळखीच्या व्यक्तींना विचारलं, पण बहुतेकांनी किमान सांगताना तरी 'इतक्या ऐन वेळेला कसं काय जमणार' असं सांगितलं. तसंच, लग्नाचे विधी करण्यासाठीही ओळखीचे पुरोहित गाठले पण कुणीही तयार झालं नाही. शेवटी हे विधी आईने स्वतः करायचे ठरवले. तसंच, ज्या डान्स स्कूलमध्ये मी आणि विन्ह डान्स शिकत होतो, त्यांना बिदागी देऊन कार्यक्रम करण्याची विनंती केल्यावर तेही तयार झाले.

मेंदीचा कार्यक्रम ही एक निराळीच गंमत झाली. लग्नाची मेंदी काढणाऱ्या एका कलाकराचा पत्ता मिळाला, पण तो प्रचंडच बिझी होता. सांगितल्या दिवशी तर तो आलाच नाही, दुसऱ्या दिवशी आला, तोही बराच उशिरा. फक्त चारच जण मेंदी काढून घेणार होते, त्यामुळे बहुधा त्याच्या दृष्टीनं हे काम क्षुल्लक होतं. माझी मेंदी झाल्यावर, मी त्याला माझ्या हातावर विन्हचं नाव लिहायला सांगितलं. हे नाव मुलीचं का मुलाचं हे काही त्याला कळलं नाही. मग विन्ह खोलीतून बाहेर आला. त्याच्या हातावर माझं नाव घालायला सांगितल्यावर त्या पोराला सगळा उलगडा झाला. मग गालातल्या गालात हसत त्यानं आमच्या आणि आईच्या हातावर मेंदी काढली.

लग्नाच्या दिवशी मी लवकर उठलो. मुंबई, दिल्ली, मध्यप्रदेशातून अनेक मित्र आले. त्यांना receive करून हॉटेलवर सोडून १० वाजेपर्यंत हळदीच्या कार्यक्रमाला यायला सांगितलं. घरी येऊन एक वेगळ्याच डिशच्या तयारीला लागलो – विएतनामी स्प्रिंगरोल ! अमेरिकेतून काही जिन्नस, औरंगाबादेतून तोफू आणि उरलेले जिन्नस यवतमाळातून – असे झक्कास व्हिएअतनामी स्प्रिंगरोल झाले. हळदीची सुरूवात पूजेने झाली. मग औक्षण झालं. औक्षण पाच बायकांनी करायचं, पण तिथं तीनच होत्या. मग आईने माझ्या दोन गे मित्रांना औक्षण करायची विन्हंती केली, तर त्यांनी अगदी आनंदाने ते केलं. विन्हचा हात हातात घेतल्यावर माझ्या मनात आलं, की यवतमाळात लग्न करायचं माझं स्वप्न साकार होतंय. मग सगळ्यांनी आम्हांला हळद लावली. मग आणखी एक पूजा आणि मोठ्यांना नमस्कार झाले.

हळदीनंतर जेवण झालं आणि आम्ही कार्यालयावर जायला तयार झालो. बाहेरगावाहून आलेले पाहुणे कार्यालयालाच लागून असलेल्या हॉटेलातच होते. गावातल्या मित्र-नातेवाइकांना तिथला पत्ता दिला होता. सगळ्यांना दुपारी ३ च्या ठोक्याला हजर व्हायला सांगितलं होतं. आम्ही दुपारी २ वाजता पोहोचलो. Stage Decoration आणि Table arrangement उत्तम होती. प्रोजेक्टर लावलेला नव्हता, तो हॉटेलवाल्याकडून लावून घेतला. तयारीची खोलीही साफ करून घेतली. तीन वाजले तरी कुणा मंडळींचा पत्ता नव्हता. मग सगळ्यांना वॉट्सॲप करू लागलो. हॉटेलातल्या मंडळींना समक्ष जाऊन बोलावलं. ३.३० ला मंडळी यायला सुरूवात झाली. येणाऱ्यांना अहेर द्यायचं काम एका मित्रावर सोपवलं. बाहेरगावची मंडळी आधी आणि त्यानंतर शाळेतले मित्र आले. मग बाकी मंडळी. मग शाळेतले शिक्षक आले. एक काका तर आधी एकटेच आले आणि सर्व काही आलबेल असल्याची खात्री झाल्यावर कुटुंबातल्या बाकीच्या मंडळींना यायला टेक्स्ट पाठवला. मी आणि विन्हने स्टेजवर सगळ्यांसोबत फोटो काढले. रोख रकमेखेरीज अहेर आणू नका असं सगळ्यांना सांगितलं होतं पण काहीजणांनी छोटे अहेर

आणलेच होते. एका मित्राने बेकरीतून केक आणला. तो मात्र आमच्या अपेक्षेपेक्षाही सुंदर झाला होता.

लग्नाची छोटीशी पूजा सुरू झाली. मग मला आणि विन्हला नारळविडा, पुष्पगुच्छ आणि हार दिले. माझा मित्र समीर आणि त्याचा नवरा अमित यांनी आंतरपाट धरला. यूट्यूबवर मंगलाष्टका सुरू झाल्या आणि सगळ्यांनी आमच्यावर अक्षता उधळल्या. हार घालून झाले, अंगठ्या घालून झाल्या, पुष्पगुच्छ आणि नारळविडे एकमेकांना देऊन झाले. मग माझ्या आणि समीरच्या आईने आम्हांला टिळा लावून ओवाळलं.

विधी संपताच सगळ्यांनी जल्लोष केला. आम्हां दोघांसोबत फोटो काढण्याची स्पर्धाच लागली. डान्स स्कूलच्या ग्रुपने 'देवा श्रीगणेशा'वर नाच केला. मग केक कापायचा कार्यक्रम झाला. त्याबरोबर बच्चे कंपनी केक खायला धावत आली.

दुसरा डान्स 'मल्हारी' गाण्यावर झाला. मग आई स्टेजवर आली आणि माइकवर बोलली. साठवणे कुटुंबाची यवतमाळशी नाळ कशी जोडलेली आहे हे तिने सांगितलं. या सोहळ्याला उपस्थित राहिल्याने आमचा आनंद कसा वाढलेला आहे हेही तिने सांगितलं. मला जरासं भरून आलं, पण या प्रसंगी आनंदाने नाचूनच व्यक्त व्हायचं असा विचार करून मी आणि विन्हने 'मैंने प्यार किया' मधल्या 'आते जाते हँसते गाते' या गाण्यावर नाच केला. या गाण्याची चाल ज्या मूळ गाण्यावरून घेतली होती ते इंग्लिश गाणं विन्हला माहीत होतंच.

नाच झाल्यावर सगळ्यांनी उखाण्याचा आग्रह केला. मी माझ्या एका भावाकडून उखाणा घेतला होता –

'कपावर कप, त्यावर होती बशी...आणि विन्हला सोडून बाकी सगळ्या म्हशी!'

विन्हने मात्र आमच्या खऱ्या आयुष्यावर एक रचना केली होती –

"Tis was that rainy day a meeting between two strangers,
and thus now today a union between two lovers"

अर्थ थोड्यांनाच कळला, पण टाळ्या सगळ्यांनी वाजवल्या.

मग रात्रीचे जेवण, ग्रुप फोटो, शूटिंग वगैरे झालं. कोणतीही गडबड न होता सोहळा अगदी मनासारखा पार पडला. अगदी या क्षणापर्यंत बाबांना धास्ती होती, पण आमच्या काही 'जेलस' नातेवाइकांनी गुंड-बिंड काही पाठवले नाही व सगळं व्यवस्थित पार पडल्याने बाबांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# कविता



**सुरेश खोले**

सुरेश खोले एकाच वेळी अनेक विचारधारा / चळवळी / श्रद्धांशी नाते बदलत बदलत अनुभव घेत असतो. गेल्या दोन दशकांमध्ये यांनी ज्योतिष, व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ता, भाषांतरकार असा प्रवास केला आहे.

**ईमेल -** sureshkhole.com@gmail.com

### नवीन मार्ग

बैसलो वृक्ष सान्निध्यी, विद्येचिया माहेरी,
स्वजीवनी मन मम, सचिंत आहे.
जाहलो कृतनिश्चयी, आपुलेचिया ठायी,
स्वगतासी मम, साक्षीभावे पाहे.
पातले किती अनेक, ध्येयमार्गासी शूल,
निर्दालीन ते मीच, होऊनी चक्रपाणी.
द्रव हे हृदय, करूनी आज दृढ,
माझे हेच रूढ, देतो हीच वाणी.
समांतरीचे जिवन, होते ते व्दीमार्गी,
अंती मी एकच, आज आक्रमित आहे.
--- सुरेश खोले

*

### संवाद, मी आणि अस्तित्व

प्रत्येक नवा संवाद नवी आशा देऊन जातो,
प्रत्येक नवा माणूस नवी पालवी देऊन जातो,
माझ्या वाळवंटी होत चाललेल्या आयुष्यात,
मृगजळ दाखवून पुन्हा निघून जातो,
इथे दूर दूरपर्यंत फक्त वाळूच दिसते मला,
इथे दूर दूरपर्यंत उन्हाच्या झळया,

दिसलाच तर दिसतो वाळूतून डोकावणारा
अस्थिपंजरांचा खच,
सर्वदूर पसरलेल्या शक्यतांच्या वाटा,
सर्वदूर दिसणारी आमंत्रक नवनवीन मृगजळे,
नवीनतेची ही भूक, मलाही अस्थिपंजर करते की काय?

पण भीती कुणाला आहे?
जिथे मुळातच कुठे जायचेच नाहीये,
कशातच मन रमत नाहीये,
तिथे नुकसान तरी काय होणार?

वास्तव आणि आभासही लोप पावला आहे,
आता उरला आहे तो फक्त
खेळ पटावरचा, रंगमंचावरचा नि
मला वाटणाऱ्या वास्तवातला,
--- सुरेश खोले

*

**पाणी**

प्रवासी मम जीवनाचा मी एकटाची, स्व चिंतनी रत मी आनंदी पावलो
ती होती सारीताच जन्मत: पापहारिणी, नौक विहारी क्षणभरी आत्ममग्न जाहलो,
जल हे अपार पाहुनिया याची डोळा, न जाणो नेहमीच जागतो भाव भोळा,
समिन्दराच्या किनारी वा सरितेच्या, मन विशाल करविते व्यापकता तयाची,
विसरुनी दु:ख अंतरीचे मनीच्या, सहजता क्षणीच साधतो योगियांची

---- सुरेश खोले

**तुझ्या इच्छे खातर**

हो पाहिजे आहेस तू मला

जर आलास तुझ्या इच्छेने

घेईन मी मिठीत तुला,

जर विसावलास तुझ्या इच्छेने

देईन रे साथ आमरण, जर चाललास मजसंगे

गेलास माझ्या आयुष्यातून तरीही चालेल रे

पण निदान जाताना एकदाच सांगून जा,

शेवटी तुझ्या इच्छेखातरच खेळलो

हा प्रेमाचा सगळा खेळ...

--- सुरेश खोले


wishing you a very
Happy Diwali!
FROM
SCREEN LANGUAGE STUDIOS
A Film Production Company, Pune
SERVICES
FEATURE FILMS, SHORT FILMS, DOCUMENTARY FILMS, CORPORATE FILMS, ADS- TELEVISION, INTERNET & RADIO, 5.1 SURROUND SOUND DESIGN & MIX STUDIO, FOLEY & VOICE DUBBING FACILITY, VIDEO EDITING, COLOUR GRADING AND COLOUR CORRECTION, EQUIPMENT RENTALS, FILM MAKING WORKSHOPS, FILM FESTIVAL CONSULTANTS, ETC
www.slstudios.in | slstudios.pune@gmail.com
9607412318 | 7350188518 | 9767213510

# गोष्टी सांगेन लैंगिकतेच्या चार

लेखक अनुज घाणेकर हे मानवशास्त्रज्ञ असून शहरी आरोग्य, पर्यावरण, बालहक्क आणि लिंग – लैंगिकता भेद या विषयांवर सामाजिक काम व लेखन करतात.
**ईमेल -** anujghanekar2@gmail.com



**अनुज घाणेकर**

''हे कपडे, ही फॅशन म्हणजे पाश्चात्त्य संस्कृती हो नुसती''

''आपल्या वेळेला कुठे होतं असले दिवस साजरे करणं – सगळं तिकडचं 'फ्याड'.''

''मुलींनी मुलांना असं मिठ्या मारणं वगैरे तिकडे युरोप अमेरिकेत चालत असेल हो, आपल्याकडे नाही.''

आपली सगळी जीवनशैली, संस्कृती ही पाश्चिमात्य कशी होत चालली आहे असा सूर आळवणारा भारतीय वर्ग आपल्याला दिसतो. गंमत म्हणजे त्याच पाश्चिमात्य देशांमधून आलेलं खाणंपिणं, कपडे इत्यादी हा वर्ग एका बाजूने वापरत असतो आणि दुसऱ्या बाजूने त्यांच्या नावाने खडेही फोडत असतो.

पाश्चिमात्य संस्कृतीवर ठपका ठेवण्याची ही प्रवृत्ती नकळतच आपली लैंगिकता एक समाज म्हणून आपण कशाप्रकारे बघतो आणि स्वीकारतो यांमध्ये हमखास दिसून येते. समलैंगिकता हा विषय जेव्हा चर्चिला जातो तेव्हा हे सगळं कसं पाश्चिमात्य फ्याड आहे, हे मत हिरिरीनं मांडलं जातं ते याच प्रवृत्तीमधून. ''आपल्याकडे 'असलं' काही नाही'', ''आपण कसे एक समाज म्हणून 'चांगले' आहोत''– असा छुपा वाद या मतामध्ये असतो. तो नकळतच समलैंगिक असण्याच्या अनुभवाला 'एक आजार' किंवा 'एखादी नको असलेली गोष्ट' म्हणून सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

आपल्या प्राचीन संस्कृतीतील विविध लैंगिकतेच्या अनुभवांचे दाखले कदाचित एक समाज म्हणून आपल्या विचारकक्षा रूंदावू शकतात.

'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' असं म्हणून कृष्णाने अर्जुनासाठी युद्धाचे चित्र बदलले. तसेच लैंगिकतेच्या चार गोष्टी वाचून आपल्या विचारांचं चित्र विस्तारण्याचा प्रयत्न करूया.

(या गोष्टींचा आवाका या लेखापुरता भारतीय हिंदू धर्मातील काही गोष्टींच्या पुरता मर्यादित ठेवला आहे)

**रामाची वाट बघणारे ना 'पुरुष ना स्त्रिया'**

वनवासाला निघालेल्या रामाला थांबवण्यासाठी सगळी अयोध्या शरयू नदीच्या काठी पोहोचली. रामाचा विरह सहन होणार नाही, म्हणून सारेच रडत होते. वनवास झाल्यावर आपण परत येऊन राज्य करू याची हमी रामाने सर्वांना दिली आणि समजावले. अयोध्येतील सर्व पुरुषांना आणि सर्व स्त्रियांना त्याने परत जाण्याचे आवाहन केले. चौदा वर्षं लोटली, वनवास संपला. राम शरयूतीरी परतला आणि त्याने पाहिले, की काही अयोध्यावासी तिथेच तिष्ठत रामाची वाट पाहत आहेत. रामाच्या लक्षात आले की त्याने सर्व

पुरुषांना-स्त्रियांना तर जायला सांगितले पण जे स्वत:ला ना पुरुष मानतात, ना स्त्री त्यांचे काय? रामाला आपली चूक उमगली आणि त्याने सर्वांची माफी मागितली आणि आदराने तो सर्वांना आपल्यासोबत अयोध्येस घेऊन गेला.

**विष्णूचे मोहिनी रूप**

'अठरा दिवसांच्या कुरूक्षेत्र युद्धामध्ये पांडवांचा विजय व्हावा' याकरता स्वत:चा बळी देऊन त्याग करण्याचे धैर्य अर्जुन आणि नागकन्या उलुपिचा पुत्र - अरावणाने दाखवले. प्रसन्न होऊन विष्णूने त्याला तीन वर मागण्यास सांगितले. अविवाहित अरावणाने दुसऱ्या दिवशी होणाऱ्या मृत्यूपूर्वी एक रात्र का होईना, पण आपले लग्न व्हावे आणि स्त्रीसुख मिळावे, अशी इच्छा प्रकट केली. परंतु दुसऱ्या दिवशी मृत्यू होणाऱ्या अरावणाशी कुणी मुलगी लग्न करण्यास तयार होईना. तेव्हा विष्णूने स्वत:च मोहिनी अवतार घेतला आणि एका रात्रीसाठी आरावानासोबत विवाह केला.

समुद्रमंथन झाल्यावर राक्षसांना भुलवून अमृत हस्तगत करण्यासाठी, आपल्या नृत्याने भुलवून भस्मासुराचा चतुराईने वध करण्यासाठी किंवा शंकरासोबत वृंदावनात रासलीला करण्यासाठीसुद्धा विष्णूने मोहिनी अवतार घेतल्याच्या कथा आहेत. एकंदरच पुरुषाने स्त्री-वेश घेतल्याच्या असंख्य कथा रामायण-महाभारत-वेद-पुराणांमध्ये आढळतात.

**रेणुकेस आळवणाऱ्या जोगत्यांची कथा**

पत्नी रेणुकेच्या मनात दुसऱ्या पुरुषाचा विचार आला, या गोष्टीवरून तिचा शिरच्छेद करण्याचा हुकूम जमदग्नी ऋषींनी आपल्या शंभर मुलांना दिला. सर्व मुलांनी हा हुकूम नाकारल्यावर सर्वांत धाकटा मुलगा, परशुरामाला त्यांनी आज्ञा केली, की त्याने आईचा शिरच्छेद तर करावाच पण आपल्या इतर सर्व भावांचे लिंग कापायचे. परशुरामाने त्या आज्ञेचे पालन केले. लिंग नसलेले त्याचे इतर भाऊ 'जोगता' म्हणून स्त्री-वेशात वावरू लागले.

**रत्नावली आणि ब्राम्हणीमधलं नातं**

अनार्त देशाची राजकन्या रत्नावली आणि राजाच्या धर्मगुरूंची कन्या ब्राम्हणी यांच्यातलं नातं इतक्या घट्ट मैत्रीचं की लग्न झाल्यावरसुद्धा एकमेकींपासून विभक्त होण्यापेक्षा त्यांनी मृत्यू स्वीकारला असता. एकाच राजघराण्यात दोघींचं लग्न लावून दिलं जावं, असा निर्णय झाला. त्यानुसार दशार्ण राज्यात रत्नावली आणि ब्राम्हणीचं लग्न ठरलं. पण काही घटना घडल्यामुळे ते लग्न मोडलं. अखेरीस दोघी मैत्रिणींनी राज्य सोडलं आणि जवळच्याच जंगलात भारतयज्ञ ऋषींच्या मार्गदर्शनाखाली तपस्या सुरू केली. इतकंच नाही तर, जेव्हा शंकर ब्राम्हणीला प्रसन्न झाला तेव्हा जोपर्यंत तू रत्नावलीला प्रसन्न होत नाहीस तोपर्यंत मी वर मागणार नाही असे तिने निक्षून सांगितले.

**गोष्टींच्या पलीकडची गोष्ट**

धार्मिक साहित्यामधील म्हणजेच (वेद, पुराणे, रामायण, महाभारतामधील) महाकाव्य यांना धर्माच्या, श्रद्धेच्या आणि चमत्काराच्या चष्म्यातून जसं बघितलं जाऊ शकतं तसंच तत्कालीन संस्कृती समजून घेण्याच्या चष्म्यातूनसुद्धा बघितलं जाऊ शकतं.

कुठलीही कला, साहित्य हे त्या काळात लोकं कशी रहात होती, कसं आयुष्य जगत होती, त्यांचे

आपांपसातील नातेसंबंध कसे होते हे सांगतं. त्यातली कथात्मकता, रूपके वगळली तर तो समाजाचा आरसाच असतो. भारतातील विविध धर्मांच्या असंख्य कलासाहित्यातून समलैंगिक अनुभवांच्या गोष्टी खोऱ्याने अस्तित्वात आहेत. कांचीपुरम, कोणार्क, खजुराहो येथील शिल्पकला असो किंवा भारतात विविध ठिकाणी प्रचलित असलेलं मौखिक-लिखित साहित्य असो.

या कथा जागोजागी लिंग आणि लैंगिकता यांबद्दल असलेल्या प्रवाही मानसिकतेचंसुध्दा चित्रण करतात. ज्या देवांना आपण पुजतो, आळवतो त्यांच्याच आयुष्यकथेत लैंगिकतेचे वेगवेगळे रंग कसे अस्तित्वात होते हे दिसतं. पुरुष आणि स्त्री इतकीच ओळख आणि फक्त यांच्यातीलच संबंध प्रमाण मानणाऱ्या मानसिकतेला आपल्याच मातीमध्ये असलेलं हे वैविध्य जाणवायला तर हवंच.

तेव्हा -

- एकतर, आपल्याच साहित्याकडे, देवदेवतांकडे, कथांकडे भिन्नलिंगी चौकटी पलीकडील चष्म्यातून जरा पाहूया.
- पाश्चिमात्य संस्कृतीवर ठपका ठेवण्यापेक्षा अभिन्नलिंगी अनुभवाचं वैश्विक अस्तित्व लक्षात घेऊया.

  आणि
- कायदेशीर लढाईत आपण पुढे चाललोच आहोत, आता सनातनी मानसिकतेशी लढाई करून ती जिंकूया.

(**टीप** - या लेखात नोंदवल्या गेलेल्या कथांचे काही संदर्भ - शिखंडी (२०१४) या देवदत्त पट्टनाईक यांच्या पुस्तकातून घेण्यात आले आहेत)

*अशोक राव कवी हे भारतातील पहिले समलिंगी ॲक्टिविस्ट आहेत. ते 'हमसफर ट्रस्ट'चे अध्यक्ष आहेत. त्यांनी अनेक वर्षं पत्रकारितेत काम केले आहे.*

**ईमेल** - rowkavi@gmail.com



**अशोक राव कवी**

# महापालिकेमधले देवदूत

(लोकसत्ता चतुरंग ११-०८-२०१८)

एकीकडे सरकारने कलम ३७७ सारख्या कालबाह्य कायद्याचा धाक आम्हांला घातला असला, तरी समलिंगी व्यक्तींच्या आरोग्यविषयक प्रश्नांबाबत जाण असणारी जिज्ञासू माणसंही मुंबई महापालिकेत होती. फक्त समलिंगी (आणि तृतीयपंथी) व्यक्तींसाठी असणारं भारतातलं पहिलं क्लिनिक महापालिकेतील डॉक्टरांच्या मदतीनेच सुरू झालं. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेचे (नॅकोचे) महासंचालक प्रसाद राव यांच्या हस्ते सुरू झालं. पहिल्याच दिवशी आठ रुग्ण आल्याचं मी सांगताच त्यांना धक्काच बसला होता. 'इतके सारे समलिंगी पुरुष?' त्यांनी आश्चर्यानं विचारलं होतं. खरंतर समलिंगी पुरुषांनी खुलेपणानं आणि स्वत:हून आरोग्यविषयक साहाय्य मागायला येण्याची संपूर्ण भारतातली ही पहिलीच वेळ होती!

एक इंग्रजी म्हण आहे, 'कामाला सुरुवात केली की निम्मं झाल्यातच जमा असतं', पण ही म्हण खरी आहे का? कारण आमच्या 'हमसफर ट्रस्ट'च्या कामाचा श्रीगणेशा करतानाच मोठ्या अडचणी येत गेल्या. आमच्या 'बॉम्बे दोस्त' या नियतकालिकाच्या पहिल्याच अंकात आम्ही ॲड. श्रीकांत भट यांचा लेख प्रसिद्ध केलेला होता. ॲड. भट मुंबईमध्ये फौजदारी कायदा या विषयातले अत्यंत प्रतिष्ठित वकील होते. (ते शासकीय विधि महाविद्यालयात 'गुन्हेगारी कायदा' हा विषयदेखील शिकवत असत.) 'बॉम्बे दोस्त'मध्ये त्यांनी भारतीय दंडसंहितेतल्या कलम ३७७ वर लेख लिहिलेला होता.

या दंडसंहितेनुसार 'ज्या लैंगिक संबंधांमधून मुलं जन्माला येत नाहीत ते संबंध गुन्हेगारी स्वरूपाचे आहेत', असं ठरवण्यात आलं होतं. याचाच अर्थ स्त्री-पुरुष संबंधांखेरीजचे अन्य सारे शरीरसंबंध ब्रिटिशांनी गुन्हेगारी स्वरूपाचे ठरवले होते. मात्र अशा स्वरूपाचा कुठलाही कायदा आपल्या भारतीय पुराणांमध्ये किंवा मनुस्मृतीमध्येसुद्धा सापडत नाही किंवा त्याआधीच्या काही शतकांच्या इतिहासात अशी कुठंही असलेली दिसत नाही. खरी गोष्ट अशी आहे, की हा कायदा थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले या ब्रिटिश अधिकाऱ्यानं आणला. याला आधार होता तो बायबलमधल्या 'लेव्हिटिकस १:१'चा. मुळातला हा धार्मिक कायदा नंतर ब्रिटिश गुन्हेगारी कायद्यामध्ये समाविष्ट केला गेलेला होता. पुढं ब्रिटिश संसदेनं 'वुल्फेन्डेन' यांच्या अहवालानंतर तो रद्दही केला. वुल्फेन्डेन या अहवालामध्ये ब्रिटिश संसदेला जुन्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची गरज नमूद करण्यात आलेली होती. या जुनाट कायद्यांचा वापर करून ब्रिटिश समाजातल्या अत्यंत प्रतिष्ठित लोकांची (उदा. ऑस्कर वाइल्ड) छळवणूक आणि ब्लॅकमेलिंग

केलं जात असे. ब्रिटिश संसदेनं १९६४ मध्ये गुन्हेगारी कायद्यातला हा भाग काढून टाकला आणि त्यामध्ये 'खासगीपणानं दोन प्रौढ व्यक्तींनी परस्पर संमतीनं ठेवलेले लैंगिक संबंध' याबाबत सरकारची कोणतीही जबाबदारी नाही. पोलीस यावर कोणतंही नियंत्रण ठेवू शकणार नाहीत, असंही यात म्हटलं होतं. खासगीपणाचा भंग होत असल्यानं असा कायदा त्यामुळं रद्द केला पाहिजे, अशी ब्रिटनमध्ये मागणी होत होती. अशा प्रकारे ब्रिटनमधल्या 'एलजीबीटी' समुदायानं या प्राचीन कायद्याला हटवून अखेर ब्रिटनला खरोखरच्या निधर्मी समाजाच्या दिशेनं नेलं. मात्र इथं भारतात आपण अजूनही ब्रिटिशांनी आणलेला 'कलम ३७७' लागू करत आहोत. खुद्द ब्रिटिशांनीच हा जुना कायदा कधीच मोडीत काढलेला आहे.

हा कायदा 'एलजीबीटी' समुदायासोबत काम करताना मोठा अडसर ठरू शकेल, अशी धोक्याची सूचना ॲड. श्रीकांत भटांनी आम्हाला दिलेली होती. त्यामुळं 'बॉम्बे दोस्त'ला पुढाकार घेऊन या कायद्याबद्दल जागरूकता निर्माण करावी लागली. आमच्या मार्गात कुठले अडथळे येणार आहेत, तेही त्यातून स्पष्ट झालं. खरंतर डॉ. जयराज ठाणेकर या मोठ्या मनाच्या मुंबई महापालिकेतील अधिकाऱ्यानं आम्हाला म्हटलं होतं, ''अरे, तुम्ही महापालिकेच्या जागेत काम करत राहा. तुम्ही चांगलं काम करत आहात. तुम्हांला कोण हात लावतं आहे मी बघतो.''

डॉ. अलका कारंडे यांनी कामाठीपुऱ्यामध्ये कार्यरत असणाऱ्या 'आशा' प्रकल्पाच्या प्रमोद निगुडकर यांनादेखील आम्हाला मदत करायला सांगितलेलं होतं. प्रमोद निगुडकरांनी मला वेगवेगळे शासकीय अहवाल कशा प्रकारे लिहावेत, हे शिकवलं. आम्हाला पोलिसांनी टाकलेल्या धाडींचा आणि छळाचा त्रास होऊ नये, अशी डॉ. अलका कारंडे यांची इच्छा होती. मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाला पाठवण्याचे हे अहवाल तयार करायला अत्यंत कठीण आणि किचकट असले, तरीही अखेर आम्ही हे अहवाल लिहिण्याचं कौशल्य प्राप्त करून घेतलंच. मध्येच कधीकधी डॉ. ठाणेकर गमतीशीरपणे वागत असत. ते अगदी भोळेभाबडे प्रश्नसुद्धा विचारत ''मला अगदी खरंखरं सांगा. तुम्हाला खरंच सुंदर स्त्रियांमध्ये रस वाटत नाही का? आम्ही म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊन तुझी तपासणी करू का? आम्ही तुझं सगळं ठीकठाक करुन देऊ.'' मी त्यांच्या या आपुलकीमुळं भारावून जात असे. त्यांनी आपल्या पत्नीकडेही या गोष्टीचा उल्लेख केला होता. त्यांच्या पत्नी श्रीमती ठाणेकर नाट्य क्षेत्रातल्या होत्या आणि त्यांना 'अशा प्रकारचे' पुरुष असतात हे ठाऊक होतं. अशा अनेक गोष्टींमुळे डॉ. ठाणेकर लैंगिकता आणि लिंगभाव या गोष्टींबाबत संवेदनशील बनलेले असावेत. महापालिकेतला एक डॉक्टर लोकसंख्येत फारशा कुणाला ठाऊक नसणाऱ्या समुदायाबाबत नव्यानं शिकत होता आणि हे करताना तो या समुदायाच्या वैयक्तिक सन्मानाला कुठंही धक्का न लावण्याचा मनाचा मोठेपणाही दाखवत होता. डॉक्टरांना मी भेटायला गेल्यावर कधीकधी त्यांच्या पत्नी गमतीनं म्हणायच्या देखील, 'काय दुर्दैव आहे बायकांचं! इतके देखणे पुरुष आणि तुमच्यापैकी कुणाचाच एकाही स्त्रीला उपयोग नाही.' त्यावर मीही त्यांना गमतीनं म्हणायचो, 'तुमच्यापैकी एक जणसुद्धा आम्हा सगळ्यांना त्रास द्यायला पुरेशी आहे की.' त्या काळात उघडपणे आपण समलिंगी आहोत, हे मान्य करणारा एक पुरुष आणि मुंबई महानगरपालिकेमधील उच्च पदावर असणारा एक वैद्यकीय अधिकारी यांच्यात अशी मनमोकळी, खेळकर संवादांची देवाणघेवाण होत होती, हे सुद्धा अगदी अनोखंच होतं.

डॉ. ठाणेकर आणि डॉ. कारंडे हेच आमच्या कामावर देखरेख ठेवत होते असं नव्हे, तर

महानगरपालिकेचे अन्य डॉक्टर्सही 'हमसफर ट्रस्ट'च्या कार्यालयात येऊन आमचं काम कसं चाललं आहे हे पाहात असत. त्यांपैकी काही उल्लेखनीय अधिकाऱ्यांची नावं मी इथं देऊ इच्छितो. डॉ. अरुण बामणे हे अत्यंत हुशार आणि स्वभावानं शांत होते. त्यांचा क्षयरोग, पोलिओ आणि मलेरिया या आजारांवर कित्येक वर्षांचा अभ्यास होता.

समलिंगी पुरुषांचा व्यवहार नेमका कशा प्रकारे असतो, याचा त्यांना अभ्यास करायचा होता. याशिवाय काही स्त्री डॉक्टरही होत्या. आजही त्या मुंबई महापालिकेत काम करतात. त्यांपैकी मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात काम करणाऱ्या डॉ. पद्मजा केसकर आज इथल्या कार्यकारी आरोग्य अधिकारी आहेत. जेमतेम चारेक फूट उंचीची छोट्या चणीची ही स्त्री प्रत्यक्षात मात्र खमकी होती. अमेरिकन दूतावासातून आलेल्या एका उंचापुऱ्या, गोऱ्या अमेरिकन माणसाला झापताना मी त्यांना नीटच पाहिलं होतं. 'पुढच्या वेळी जेव्हा मला भेटायला याल, तेव्हा नीट तयारी करून या. सार्वजनिक आरोग्याविषयीच्या मी अगदी प्राथमिक गोष्टी तुम्हाला शिकवू शकत नाही. तुम्हाला द्यायला माझ्याकडे पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळही नाही. त्यामुळे तुम्हाला जे सांगायचं आहे, ते अगदी थोडक्यात सांगा.' हे ऐकून त्या आगाऊ अमेरिकन गोऱ्या माणसाचा चेहरा लालेलाल झाला. आम्हा भारतीयांना गोऱ्या लोकांचा बाऊ वाटून न घेता आत्मविश्वासानं उभं राहता येतं, हे पाहून मला खूपच आनंद झाला होता. आरोग्य विभागातल्याच डॉ. केसकर यांच्यासारख्या कार्यक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यानंच मुंबइच्या सतत वाढत असणाऱ्या झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन महत्प्रयासानं तिथल्या १०० टक्के मुलांना पोलिओ आणि अन्य जीवघेण्या आजारांवर मात करण्याच्या लसी दिलेल्या होत्या. असे चांगले अधिकारी नसते तर बजबजपुरी झालेल्या या भयंकर नागरी वस्तीत परमेश्वरसुद्धा आपल्याला वाचवू शकला असता का, याबद्दल शंकाच आहे.

मला प्रभावित करणाऱ्या आणखी काही डॉक्टर स्त्रियाही महापालिकेत होत्या. त्यांपैकी एक होत्या डॉ. लतिका शिवकर. मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीच्या (MDACS) च्या वडाळा इथल्या कार्यालयात त्या असत. मुंबईतल्या सर्वोत्तम मेडिकल कॉलेजेसमधल्या तज्ज्ञ डॉक्टरांना संसर्गजन्य लैंगिक आजारांबद्दल जे ठाऊक नसेल, ते सारं ज्ञान डॉ. शिवकर यांच्याकडे होतं. सार्वजनिक आरोग्य विभागात त्या कनिष्ठ पदावर काम करत असल्या, तरी या विषयात त्या एक अधिकारी व्यक्ती होत्या. त्यासोबतच 'क्षयरोग' या विषयावर अधिकारी असणाऱ्या दुसऱ्या डॉक्टर होत्या डॉ. बिन्नी क्षेत्रपाल. या दोन्ही डॉक्टर स्त्रियांनी समलिंगी व्यक्तींच्या आरोग्याबाबत अगदी अचूक प्रश्न विचारल्यानं मी खूपच प्रभावित झालो होतो. भारताच्या सार्वजनिक नोकरशाहीमध्ये, खास करून सार्वजनिक आरोग्य विभागात इतक्या कार्यक्षम स्त्रिया काम करतात, याची फारच थोड्या लोकांना जाणीव असेल. मला सतत जाणवणारी गोष्ट म्हणजे आपला देश बहुधा स्त्रियांमुळेच चालत असावा; कारण पुरुष नेहमी प्रत्येक बाबतीत राजकारण आणून त्यावर झगडत बसण्यात वेळ घालवत असतात.

एकीकडं कलम ३७७ची धास्ती असताना दुसरीकडं 'हमसफर ट्रस्ट'पुढची आव्हानं उग्र रूप धारण करू लागलेली होती. समलिंगी समुदाय विखुरलेला आणि अदृश्य होता म्हणून ही आव्हानं नव्हती, तर तो आजारांना अधिक प्रमाणात बळी पडू शकणारा होता. शिवाय तो आधीच व्याधींनी ग्रासलेला होता. आमच्या ट्रस्टनं केलेलं पहिलं काम म्हणजे मुंबई महापालिकेत या कामात मदत करू शकतील असे

अधिकारी शोधणे. वायव्य मुंबईच्या सायन हॉस्पिटलमधल्या त्वचा आणि कुष्ठरोग विभागाच्या प्रमुख डॉ. हेमांगी जयरंगानी अशा अधिकाऱ्यांपैकी एक होत्या. यापूर्वी डॉ.गीता भावेंनी मला आधी विचारलं होतं तसंच त्यांनीही मला आश्चर्यानं डोळे विस्फारून विचारलं होतं, ''मुंबईत खरोखरच समलिंगी पुरुष आहेत? मीदेखील त्यांपैकी एक आहे'' असं सांगितल्यावर त्या म्हणाल्या होत्या, ''खरं तर तू मानसिकदृष्ट्या ठीकठाक वाटतोस आणि आजारीही दिसत नाहीस. मग नेमकी अडचण तरी काय आहे?'' त्यावर आम्ही दोघंही मोठ्यानं हसलो आणि मग कामाबाबत आमचं बोलणं सुरू झालं. त्यांना या विषयात खरोखरच रस होता, इतकंच नव्हे तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात काहीतरी करावं असंही त्यांना वाटत होतं. ''मी तुमच्या केंद्रावर दोन एमबीबीएसचे विद्यार्थी-डॉक्टर्स पाठवते आणि तुम्ही त्यांना समलिंगी पुरुषांचे आरोग्यविषयक प्रश्न कसे हाताळायचे ते शिकवा'' असं त्यांनी सुचवलं. मी त्यांची ही ऑफर अगदी आनंदानं स्वीकारली. फक्त समलिंगी (आणि तृतीयपंथी) व्यक्तींसाठी असणारं भारतातलं हे पहिलं क्लिनिकच होतं.

हे क्लिनिक मुंबईतल्या वाकोल्याच्या मच्छीबाजाराशेजारी असणाऱ्या महापालिकेच्या एका इमारतीत सुरू झालं. तिथल्या दुसऱ्या मजल्यावरच्या एका मोठ्या बाथरूमचं रूपांतर आम्ही क्लिनिकमध्ये केलं होतं. २५ जुलै १९९९ रोजी त्याचं उद्घाटन त्या वेळी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेचे (नॅकोचे) महासंचालक आणि भारत सरकारचे आरोग्य उपसचिव प्रसाद राव यांच्या हस्ते झालं होतं. पहिल्याच दिवशी आठ रुग्ण आल्याचं मी सांगताच त्यांना धक्काच बसला होता. ''इतके सारे समलिंगी पुरुष? याहूनही जास्त रुग्ण असतील असं तुम्हाला वाटतं का?'' त्यांनी अगदी आश्चर्यानं विचारलं होतं. ते ऐकून मला खरंतर खूप वाईट वाटलं होतं. दिल्लीत आमचा स्वीकार व्हायला खूप वेळ लागला होता, पण मुंबईत नाही. समलिंगी पुरुषांनी खुलेपणानं आणि स्वतःहून आरोग्यविषयक साहाय्य मागायला येण्याची संपूर्ण भारतातील हा पहिलीच वेळ होती!

नंतर मात्र डॉ. कारंडेंनी मला सांगितलं, की खरंतर मुंबई महानगरपालिकेनं ही सेवा सुरू केल्यानं प्रसाद राव नावाचे केंद्र सरकारच्या आरोग्य विभागातले हे उच्चपदस्थ आयएएस अधिकारी खूपच प्रभावित झाले होते. 'आता कुणी काही बोलूच दे, मग बघतेच,' असं म्हणताना डॉ. कारंडेंच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित पसरलं होतं. डॉ. ठाणेकरांचाही चेहरा आनंदानं उजळलेला होता. अखेर त्या दिवशी आम्ही एक मोठाच अडथळा पार केलेला होता!

(लोकसत्ता चतुरंगच्या सौजन्याने) **अनुवादः सुश्रुत कुलकर्णी**

# नव्या वेशीच्या पल्याड

(लोकसत्ता ०६-१०-२०१८)

एकीकडे ६ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात 'कलम ३७७' वरच्या निकालपत्राचं वाचन होत असताना देशभर उत्साहाची नवी लाट पसरलेली होती. पण मला मात्र पराकोटीचा आनंद झालेला नव्हता. खरं तर उलट चिंतेच्या एका मोठ्या, काळ्या छायेनं मला ग्रासलं होतं. माझ्यासमोरचा प्याला केवळ आशावाद

आणि सद्भावनांनीच भरलेला नव्हता, तर त्याच्या आजूबाजूला काही गढूळ पाण्याचे लोटही वाहत होते. माझ्या या बोलण्याबद्दल तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, पण समलिंगी स्त्री-पुरुषांचं स्वातंत्र्य हा आपल्या समाजानं एका महत्त्वाच्या प्रश्नाला सामोरं जाण्याचा एक शेवटचा टप्पा आहे.

आता शहरं जसजशी अधिक समानतावादी होताहेत (आणि शिवाय लोकसंख्येनं दुथडी भरून वाहत आहेत), तसतशा धर्म, जात आणि वर्ग यांसारख्या गोष्टी विरघळून चाललेल्या आहेत. समजा एखाद्याने मुंबईतल्या गच्च भरलेल्या लोकल ट्रेन किंवा बसमध्ये अगदी ठरवून अस्पृश्यता पाळायची ठरवली तरी ते त्याला शक्य होईल का? अगदी रेस्टॉरंट किंवा खाण्याच्या अन्य ठिकाणी लोकांना आता बसायलाही जागा मिळत नाही. एका टेबलाभोवती उभं राहून अन्य चार-पाच लोकांसोबत ती जागा शेअर करावी लागते. मला काय म्हणायचं आहे ते तुम्हाला कळलं असावं.

इंडोनेशियामधल्या एलजीबीटीक्यू कार्यकर्त्यांनी स्थापन केलेल्या 'योगजकार्ता तत्त्वां'नुसार मानवाधिकारांसाठी लैंगिकता आणि यांवर आधारित नवीन संरचना तयार करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे याला 'सेक्शुअल ओरिएंटेशन अ‍ॅण्ड जेंडर आयडेंटिटि (SOGI)' फ्रेमवर्क या नावाने ओळखण्यात येतं. 'एसओजीआय'ला मानवी हक्कांच्या संरचनेशी संलग्न करण्यात आले आहे. हिचा उद्देश मानवाची नव्या प्रकारची ओळख बनवणं हा आहे. असा मानव, ज्याची स्वत:ची एक स्वतंत्र लैंगिक ओळख असेल आणि ती केवळ त्या व्यक्तीच्या स्वत:च्या निवडीवर अवलंबून असेल.

आपण याबद्दल जरा विस्तारानं पाहूया. याआधीच्या काळात एखाद्या व्यक्तीचा लिंगभाव त्याच्या किंवा तिच्या सामाजिक ओळखीमधून असे. म्हणजे तुम्ही स्त्री आहात की पुरुष हे तुम्हांला समाजाकडून 'शिकवलं' जात असे. आपल्या देशातल्या अनेक समाजांमध्ये केवळ स्त्री-पुरुष हे दोनच प्रकार नव्हते, तर भारतात नेहमीच 'तृतीयपंथी' लोक अस्तित्वात होते. आज 'डब्ल्यूएचओ'ने जवळजवळ २०हून अधिक वेगवेगळ्या लिंगप्रकारांना कायदेशीर व वैज्ञानिक अशा दोन्हीही पद्धतींनी वैध ठरवलेलं आहे. आता वेगवेगळ्या लिंगभावांसाठी एक स्वायत्तता तर मिळाली आहे. पण याची सुरुवात झाली ती जून १९६९मध्ये स्टोनवॉल, न्यूयॉर्क इथं. लिंगभेदाची भिंत कोसळून पडायला इथंच पहिल्यांदा सुरुवात झालेली होती.

जगातल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत जणू एक नवा ज्वालामुखीच उसळला होता. या नव्या जगाचा अर्थ म्हणजे वेगवेगळ्या प्रकारच्या मानवी वर्तनांची नवी कल्पना करणं हा होता. किन्सी यांच्या अहवालामुळे केवळ पुरुषांच्या लैंगिक जीवनाच्या एकरंगी भिंती कोसळून पडल्या, तर दुसऱ्या महायुद्धामुळं अनेक स्त्रियांनी कामाच्या क्षेत्रांमध्ये प्रवेश करून पूर्वीचे लिंगभेदावर असणारे तथाकथित अडथळे स्वत:च मोडून काढले. या दोन्हीही शक्तींनी लिंगभावनेला एक नवा आकार दिला. समलिंगी पुरुषांच्या मुक्ततेच्या चळवळीमुळे आणि पहिल्यांदाच न्यूयॉर्क इथल्या क्रॉस ड्रेसिंग करणाऱ्या पुरुषांनी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर या ओळखीसाठीच्या चळवळीला वेग आला. न्यूयॉर्क नावाच्या या भांडवलशाहीच्या खदखदत्या कढईसारख्या प्रगतिशील शहरात खुद्द लग्न आणि मुलं जन्माला घालणं या मूळ संकल्पनांच्या पायावरच हल्ला झाला.

असं असलं तरी मला भविष्यात एलजीबीटीक्यू चळवळीसाठी काळ मोठा कठीण दिसतो आहे. खुद्द मी स्वत: लग्नसंस्थेच्या विरोधात असलो, तरीसुद्धा ६ सप्टेंबरच्या 'कलम ३७७' वर सर्वोच्च न्यायालयाने

दिलेल्या निकालातला पहिला फायदा म्हणजे बहुधा समलिंगी व्यक्तींना लग्न करता येईल व अधिकृतपणे साहचर्यात राहता येईल. पण हे कायदेशीर करण्याचा इतका आग्रह का? थांबा, जरा विस्तारानंच सांगतो.

कायद्याच्या चौकटीत मान्य असलेलं लग्न केल्यामुळे सरकारकडून जोडीदारांना काही विशिष्ट हक्क आणि फायदेदेखील मिळतात, याकडे दुर्लक्ष करून आपल्याला चालणार नाही. लग्नातून मिळणाऱ्या अनेक भौतिक फायद्यांसाठीच तर लग्नाची संकल्पना उभी राहिली आहे. असं असलं तरी लग्नाचा सर्वांत महत्त्वाचा सामाजिक फायदा म्हणजे– त्यामुळं स्त्रिया आणि लहान मुलं यांकरिता सुरक्षित घर निर्माण होतं. सहसा पुरुषच गृहकर्जाची जबाबदारी अंगावर घेतात, ही गोष्ट भले काहींना हास्यास्पद वाटतही असेल; पण ज्या घरात त्यांना दोन वेळचं अन्न मिळतं त्या घरासाठी ते आयुष्याची चार दशकं कर्ज फेडण्यात घालवतात यात काही फारसं आश्चर्य नाही. याच घरात पत्नीला डोक्यावर छप्पर मिळतं आणि हवं तर ती मुलं जन्माला घालू शकते किंवा घरटं तयार झाल्यावर पुरुषाचा भार हलका करण्यासाठी स्वत:सुद्धा बाहेर जाऊन उत्पन्न मिळवू शकते.

लग्नाचं हे पारंपरिक बंधन कितीही पितृसत्ताक पद्धतीचं वाटत असलं, तरी ते उलटया बाजूनही पाहता येऊ शकतं. आज कितीतरी स्त्रिया आपल्या पतीपेक्षा अधिक उत्पन्न मिळवत आहेत. त्यांनी स्वत:च्या हिमतीवर घरं घेतलेली आहेत. त्या कुटुंबातली 'कमावणारी मुख्य व्यक्ती' आहेत. घराच्या हप्त्यांबरोबरच त्या अगदी कुटुंबासाठीच्या कारचे हप्तेदेखील भरत असतात. इथं माझा मुख्य मुद्दा असा आहे, की लग्नाच्या बंधनाला शासनाची मान्यता असल्यामुळं जोडीदाराला नोकरीच्या ठिकाणी संलग्न असणारे जे फायदे मिळतात, ते आपोआपच त्या व्यक्तीच्या जोडीदारालाही मिळू लागतात. याचाच अर्थ आरोग्य विमा, पेन्शन, गर्भधारणा, प्रसूतीनंतर असणारे फायदे यांसारख्या गोष्टी एका जोडीदाराकडून दुसऱ्या जोडीदाराला हस्तांतरित केल्या जाऊ शकतात. लहान मुलांची देखभाल करायची असेल किंवा घरी एखादं महत्त्वाच काम असेल, (तर कुटुंबातले बंध दृढ होण्यासाठी) पतीलाही त्याकरता रजा मिळू शकते. स्वानुभवातून सांगायचं झालं, तर मी एकटा आणि अविवाहित असल्यामुळं एका प्रसिद्ध रिसॉर्ट कंपनीनं मला सदस्यत्व नाकारलं होतं. माझा समलिंगी जोडीदार जरी माझी काळजी घेत असेल आणि अगदी माझा घरखर्चदेखील चालवत असेल, तरीसुद्धा त्याला माझा कायदेशीर जोडीदार म्हणून अधिकृत मान्यता मिळू शकत नाही.

आज भारतातल्या शहरी भागांत अशा प्रकारे कायद्यानं मान्यता दिलेला जोडीदार असण्याचा मुख्य फायदा म्हणजे – रुग्णालयामध्ये दाखल व्हावं लागतं तेव्हा मिळणारा स्वाक्षऱ्या करण्याचा अधिकार. दांपत्यामधल्या आजारी जोडीदारानं दुसऱ्याला आपलं 'अधिकारपत्र' दिलं, तर त्याच्या पत्नीला (किंवा पतीला) रुग्णालयामध्ये लागणाऱ्या शस्त्रक्रिया किंवा अन्य महत्त्वाच्या बाबींवर स्वाक्षऱ्या करण्याचा हक्क दिलेला आहे. या उलट समलिंगी जोडप्याबाबत मात्र अशा प्रकारे कुठलीच मान्यता दिली जात नाही. समलिंगी व्यक्तीच्या जोडीदाराचा मृत्यू झाल्यानंतर (ते नातेसंबंध चालू असूनही) त्याला अंत्यसंस्कारांसाठीसुद्धा उपस्थित राहणं शक्य न झालेलं पाहिलं आहे. अशा प्रकारे आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत शरीराच्या अंत्यसंस्काराआधी स्पर्श देखील करता न येणं हे अत्यंत भीतीदायक व दु:खदायक आहे.

समलिंगी जोडप्यांना मूल दत्तक घेणे, सरोगसीद्वारे मूल जन्माला घालणे यांचा हक्क तर नाहीच आणि

त्यांना साधं जोडीदार असल्याचं प्रमाणपत्रदेखील मिळू शकत नाही. हनाफी मुस्लीम सुन्नी शरिया कायद्याद्वारे मुस्लिमांकरता दत्तक घेण्याला मान्यता नाही. समजा एखाद्या मुस्लिम व्यक्तीनं त्याच्या गैर-मुस्लिम प्रेमीसाठी किंवा जोडीदारासाठी आपल्या मृत्युपत्रात काही संपत्ती ठेवली, तर त्या मृत्युपत्राला न्यायालयात आव्हान देण्यात येईल आणि बहुधा कायद्यानुसारही अशा वारसाला काहीच मिळणार नाही. हिंदू संयुक्त कुटुंबातील व्यक्तीच्या समलिंगी जोडीदारालादेखील नंतर वारसा हक्कानं काही मिळेल की नाही याबाबत मला शंकाच आहे. आजही प्रचलित प्रथेनुसार बहुसंख्य एकट्या पुरुषांना मुलगी दत्तक घेता येत नाही. जर एखाद्या समलिंगी पुरुषाला मूल दत्तक घ्यायचं असेल, तर त्याला ना मुलगा दत्तक दिला जाईल ना मुलगी (यामागचं कारण उघडच आहे). समलिंगी व्यक्तींना एचआयव्ही किंवा लैंगिक कृतींमधून संसर्ग होऊ शकणारे रोग लवकर होत असल्यामुळं त्यांना रक्तदान करण्याचीही परवानगी दिली जात नाही. अशा प्रकारे समलिंगी व्यक्तींना समाजाच्या मुख्य धारेतून वगळून त्यांच्यावर अन्याय केला जातो, वेगवेगळ्या प्रकारे त्यांना कलंकित ठरवलं जातं.

खरं तर लैंगिकता आणि लिंगभाव यांबद्दल शिकवणारं खरंखुरं लैंगिक शिक्षण आज समाजाला देण्याची गरज आहे. त्यामुळे या समाजावर असणारा कलंक आणि त्याच्याबाबत केला जाणारा भेदभाव कमी होईल. याला कायद्याची जोड मिळाली, तर एलजीबीटीक्यू व्यक्तींना समाजाच्या मुख्य धारेत सामील होणं सोपं होईल. 'कलम ३७७'वरच्या निकालपत्रासारख्या गोष्टींमुळं त्यांचं दैनंदिन जीवन सुसह्य होईल.

मी या लेखाचा शेवट खरंतर सकारात्मक पद्धतीनं केला पाहिजे. आज जे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रामुळं आनंदोत्सव साजरा करत आहेत, त्यांना कदाचित राजकीय नेत्यांच्या आघाडीवर असणारी प्रचंड शांतता लक्षात आली असेल. कोणीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. याचा अर्थ असा, की हे निकालपत्र केवळ एकट्या एलजीबीटीक्यू समुदायाच्या चळवळीचाच परिपाक आहे. अन्यथा या विरोधात पुन्हा कुणीतरी विरोधी अर्ज दाखल केला असता. एलजीबीटीक्यू समुदायातील व्यक्ती, एलजीबीटीक्यू पालकांची संस्था, अन्य कार्यकर्ते आणि भारतीय मानसोपचारतज्ज्ञांच्या संघटनेसारखे व्यावसायिक तज्ज्ञ या साऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे व पाठिंब्यामुळेच सर्वोच्च न्यायालयात 'कलम ३७७' ला आव्हान देता आलं होतं.

त्यामुळे या विजयाचं सारं श्रेय केवळ या समुदायाला आणि त्याच्या समर्थकांना आहे, कुठल्या राजकीय गटाला किंवा राजकीय पक्षाला ते मुळीच नाही. एलजीबीटीक्यू समुदाय पुढील राजकीय आव्हानांना सामोरं जायला किती तयार आहे हे दाखवून द्यायला ही बाब पुरेशी आहे.

(लोकसत्ता चतुरंगच्या सौजन्याने) **अनुवादः सुश्रुत कुलकर्णी**

# समलिंगी स्त्री – सिराची मुलाखत

**टिपणी** – सिरा हे टोपण नाव आहे.

**ईमेल** - ceera.sharma@gmail.com

**१. सिरा तुझ्या विषयी थोडं सांग.**

मी मुंबईची. सध्या मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वूमन स्टडीज् सेंटरच्या जेंडर एँड कल्चर डेव्हलपमेंटची विद्यार्थीनी आहे. मी नॉरडम (इंग्लंड) मधून ब्रॉडकास्टिंग एँड जर्नालीजम पदवी मिळवली आहे.

**२. तुझ्या लैंगिकतेच्या स्वीकाराचा प्रवास कसा होता?**

वयात येत असताना आपण काही तरी चुकीचं करतोय आणि आपण अपराधी आहोत अशी भावना मनात नेहमी असायची. या अपराधी भावनेपोटी कित्येक वेळा मी स्वतःला मुलांसोबत डेट करत होते ज्यात कधीही मानसिक सुख मिळाले नाही. उलट त्याचा अधिक त्रास होत होता (कदाचित स्वतःला न स्वीकारल्यामुळे).

**३. तू समलिंगी स्त्री (लेस्बिअन) आहेस हे तुला कधी कळालं? आणि तू स्वतःला कधी स्वीकारलंस?**

मी १७ वर्षांची असताना इंग्लंडला गेले आणि तिथे खऱ्या अर्थाने स्वतःची लैंगिकता शोधण्याचा किंवा आपण कोण आहोत याचं उत्तर शोधण्याचा प्रवास सुरु झाला. तिथे राहून स्वतःकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलण्यास मदत झाली. २१ व्या वर्षी भारतात आल्यानंतर जेव्हा मी मुलींना डेट करू लागले तेव्हा स्वतःला आणि भारतीय मुलींना समजून घेण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांचे प्रश्न, शंका, समस्या प्रकर्षाने दिसून येऊ लागल्या. पुण्यात काही महिन्यांपूर्वी एक पार्टीला गेले असताना एका मैत्रिणीने मी उभयलिंगी नसून एक समलिंगी स्त्री आहे हे समजावून सांगीतलं आणि तेव्हापासून मी स्वतःला समलिंगी स्त्री म्हणून स्वीकारलं. मनाची द्विधा मनःस्थिती गळून पडली. ज्यामुळे मी अधिक अत्माविश्वासाने व अधिक आनंदात जीवन जगत आहे.

**४. तुझ्या लैंगिकतेविषयी तुझ्या घरी किंवा आणखीन कोणाला माहिती आहे का?**

दोन वर्षांपूर्वी मला मुली आवडतात हे मी घरी सांगितलं. भारतीय आईवडिलांप्रमाणे लग्नानंतर सर्व काही ठीक होईल असा त्यांचा सध्यातरी समज आहे. त्यांच्या कडून अजूनतरी पूर्णपणे स्वीकार किंवा नकार नाही. अशा करते, की ते मला समजून घेतील.

मी सध्या माझ्या काही जवळच्या मित्र आणि मैत्रींना माझ्या लैंगिकतेबद्दल सांगितलं आहे आणि

त्यांनी ही खुलेपणाने मला स्वीकारले आहे. अशा मित्रमैत्रिणींमुळे आपला समजाकडे बघण्याचा दृष्टीकोन प्रगल्भ होतो.

### ५. समलिंगी नात्याविषयी तुला काय वाटते ?

मी एका मुलीसोबत गेली दीड वर्षे नात्यात आहे. आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे, विश्वास आहे. ती खूप समजूतदार आहे. जेव्हा कधी आमच्यात भांडण होते तेव्हा आम्ही संवादातून त्यावर मार्ग काढतो. नात्यात भांडण होणं हेच आमच्या नात्याच्या जिवंतपणाचं लक्षण आहे.

### ५. पुणे विद्यापीठात सपोर्ट ग्रुपची सुरुवात कशी आणि का झाली ?

पुणे विद्यापीठात शिकत असताना लक्षात आलं कि, इथे खूप सारे समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी विद्यार्थी आहेत. पण त्यांना एकत्र आणेल असा कोणताही गट उपलब्ध नाही आणि यातूनच उभी राहिली सपोर्ट ग्रुपची कल्पना. गेल्या एका महिन्यापासून आम्ही सारे कम्युनिटी फ्रेंड्स प्रत्येक शुक्रवारी एकत्र भेटतो. जिथे मजा-मस्ती बरोबर एकमेकांना मानसिक आधार देतो व या प्रयत्नातून आम्ही स्वतःची स्पेस मिळवण्याचा प्रयत्न करत आहोत.

# कोलाज

## ‘मूकनायक’

**पहिले मराठी समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी, द्विलिंगी साहित्य संमेलन**

**दिनांक** : २५ नोव्हेंबर,२०१८
**स्थळ** : ज्योत्स्ना भोळे सभागृह, पुणे.
**आयोजक** : समपथिक ट्रस्ट, पुणे.

(अभिमान ग्रुप (कोल्हापूर)च्या विशाल पिंजानीने लोगो तयार केला)



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज व र.धो.कर्वे यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात**
**फोटो** : डावीकडून परीक्षित शेटे, टिनेश चोपडे आणि सीमा भानू



**'होय मी स्त्री आहे'** या अनुवादित आत्मचरित्राचा काही भाग वाचताना अनुवादकर्त्या सीमा भानू (मूळ लेखिका : मनोबी बंडोपाध्याय)



प्रमोद काळे लिखित **'नच येती उत्तरे'** या नाटकातील काही भागाचे वाचन करताना चिन्मय संत व रितेश तिवारी




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विश्वास सहस्त्रबुद्धे यांनी केले व त्याचबरोबर बिंदुमाधव खिरे संकलित **'मनाचिये गुंती'**–(समलिंगी मुलामुलींच्या पालकांच्या आत्मकथा) या पुस्तकातील श्रीमती मीरा (नेहाची आई) यांच्या आत्मकथनाचे वाचन केले.



स्वलिखित कवितांचे वाचन करताना दिशा शेख



सुरेश खोले आणि पुष्कर एकबोटे यांनी मराठी विकिपीडियाची माहिती दिली.



परीक्षित शेटे याने **'जास्वंद'** (इंटरसेक्स विषयावरील एकपात्री नाटक – लेखक बिंदुमाधव खिरे) यातील एक प्रसंग सादर केला.



**'मी हिजडा, मी लक्ष्मी'** (लक्ष्मी त्रिपाठी यांचे चरित्र) या पुस्तकातील काही भागांचे वाचन करताना चरित्रकार वैशाली रोडे



ऋषिकेश साठवणे आणि त्याचा बॉयफ्रेंड विन्ह यांचा समलिंगी विवाह थाटामाटाने यवतमाळमध्ये २८ डिसेंबर, २०१७ ला पार पडला. ऋषिकेशने या विवाहाचे वृत्तांकन इंग्रजीमध्ये केले. त्यातील काही भागाचा मराठी अनुवाद सौरभ बोन्द्रे यांनी केला व त्याचे वाचन केले. हा भाग या दिवाळी अंकात छापला आहे



आपले विचार मांडून मनिषा गुप्ते यांनी कार्यक्रमाची सांगता केली



स्वलिखित कवितांचे वाचन करताना सारंग पुणेकर



प्रेक्षकांची रंगलेली **'चाय पे चर्चा'**



**स्वयंसेवक व काही मान्यवर**

**डावीकडून उभे** : अनिल उकरंडे, पुष्कर एकबोटे, सौरभ बोन्द्रे, सारंग पुणेकर, उमेश जाधव, उमेश कांबळे, बिंदुमाधव खिरे, ओंकार मोटेवार, टिनेश चोपडे, अभिषेक शर्मा, भाग्यश्री शिंदे, अमोल शिंदे, तेजश्री जाधव, राज जाधव.
**डावीकडून बसलेले** : ओंकार जोशी, जमीर कांबळे, परीक्षित शेटे, सुरेश खोले, प्रीतेश कांबळे

# माय लव फॉर साधना



दीपांकर बॅनर्जी

दीपांकर बॅनर्जी हे 'साधना' नावाच्या संस्थेसोबत गेली दोन वर्षं 'डान्स थेरपिस्ट' म्हणून काम करत आहेत. त्यांनी पुणे विद्यापीठातून एम.ए. भरतनाट्यम पूर्ण केले आहे व सध्या यु.डब्लू.सी. कथक त्रिवेणीमध्ये नृत्य शिकवतात.

**ईमेल** - banerjeed573@gmail.com

हो, मी समलिंगी आहे आणि मी वीस वर्षांचा आहे. आज जी कहाणी तुम्ही वाचणार आहात ती आहे स्वीकाराची (acceptance). फक्त आपल्या कुटुंबानी आपला स्वीकार करून चालत नाही, प्रथम आपण स्वतः, नंतर मग घरचे आणि मग या जगानी स्वीकार करणे आवश्यक असते.

मी नेहमीच तीन गोष्टींवर विश्वास ठेवतो की, १. तुम्ही स्वतःला जसे आहात तसे स्वीकारले पाहिजे. २. ज्यावेळेस तुमच्या घरचे तुमचा स्वीकार करतात, तेव्हा तुम्हाला जगाची पर्वा करण्याची गरज नसते. ३. जेव्हा तुम्ही जगाला तुमची कला/प्राविण्य दाखवून देता, तेव्हा जग तुम्हाला आपसूकच स्वीकारते.

आजही माझ्या आईची एक शिकवण मला नेहमी आठवते, की जग काय म्हणेल किंवा लोक काय म्हणतील यापेक्षा तुला काय वाटते ते कर, कारण तुझी आवड आहे ती उद्या जगाची आवड बनू शकते. आता चला, मुख्य गोष्टीकडे वळूया. माय लव फॉर साधना. साधना कोणती व्यक्ती नाहीये तर एक स्वप्ननगरी आहे, ज्या ठिकाणी चोवीस तासांची धावपळ आहे.

'साधना' एक संस्था आहे, जी मतिमंद व्यक्तींच्या पुनर्वसनाचे काम करते. गेल्या २४ वर्षांपासून मुळशी, कोळवण खोरे- चिखलगाव या ठिकाणी काम करत आहे. काही जागा अशा असतात ज्या तुम्हाला नेहमी खुणावत असतात, अशीच 'साधना व्हिलेज' माझ्यासाठी होती. साधनाबद्दल खूप काही ऐकले होते, जाणेही झाले होते, पण एकत्र काम करण्याचा योग आला नव्हता. एक दिवस असेच फेसबुक बघत असताना एका मित्राची पोस्ट पाहायला मिळाली, की तो साधनाच्या मुलांसोबत काही आर्टवर्क करू इच्छित आहे व काही मदतही हवी आहे. मी लगेच होकार दिला. या निमित्ताने साधनातील सर्व मुलांना भेटणे झाले. रंगकामही झाले व साधनासोबत काम करण्याची माझी सुरुवात झाली.....

तिथे दोन ताई भेटल्या, विजयाताई व मेघाताई. विजयाताई या साधनाच्या २४ वर्षांच्या विजयाचा एक भाग आहे, तर मेघाताई या साधनाच्या मुलांवरची माया आहे. गेली २४ वर्षे अनेकांच्या सहकार्याने या साधनाची कोळवण खिंड लढवत आहेत. विजयाताई व मेघाताई यांना मी 'ताई' जरी म्हणत असलो तरी एक सख्खी आई व एक सावत्र आई म्हटले तरी चालेल. विजयाताईंना माहिती होते की मी डान्सर आहे. ''मग तू आपल्या मुलांना डान्स शिकवशील का?'' त्यांनी विचारले. मी लगेच होकार दिला व माझ्या वाढदिवसाला डान्सवर्ग सुरू करण्याचे ठरले. या वेळेस मला स्पेशल किड्स किंवा स्पेशल फ्रेंड्सना डान्स शिकवायचा होता. साधनातील सर्व मुले ही वयाने वीस वर्षांपेक्षा जास्त आहेत व त्या पहिल्या वेळेस त्यांना मी कोणत्याही प्रकारे डान्स शिकवू शकलो नाही. माझी थोडी निराशा झाली. मी तिथे जाण्यापूर्वी काही

गोष्टी ठरवल्या होत्या, की मी मुलांना 'असा डान्स शिकवेन, तसा डान्स शिकवेन' पण असे काही झाले नाही. त्या दिवशी तिथल्या सत्य परिस्थितीची जाणीव झाली.

नंतर माझे विजयाताईंशी बोलणे झाले व त्या बोलण्यात मी माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट शिकलो. आपली मुलंही स्पेशल किड्स आहेत. सर्व गोष्टी ते सहजपणे करू किंवा शिकू शकत नाहीत म्हणून तर ते स्पेशल आहेत. त्या म्हणाल्या डान्सच्या वर्गात डान्स शिकवलाच पाहिजे अशी सक्ती नाही, तर त्यांना त्या डान्सच्या वर्गाचा मनसोक्त आनंद घेता यावा, मग त्यांनी गणपती मिरवणुकीतील डान्स का करेनात, ही आमची इच्छा आहे आणि खरंच हीच जगण्याची खरी गंमत आहे. त्या दिवसानंतर मुलेही, नेहमी माझ्या येण्याची वाट बघू लागली. डान्सवर्ग हा पूर्ण मजा-मस्तीने भरलेला असायचा. साधनामध्ये कधीही मी कसा बोलतो, कसा चालतो किंवा मी कसे कपडे घालतो याच्याशी काही घेणे नसते, तर मी तिथे येऊन काय करतो? हे महत्त्वाचे असते. साधनाने मला खऱ्या अर्थाने स्वीकार करायला शिकवलं.

मेधाताईंकडून मी एक महत्त्वाची गोष्ट शिकलो, की नेहमी आपल्याबरोबर इतरांनाही एकत्र घेऊन चला, कारण माणसाला एकट्याने लढणे कठीण असते. त्याला एका समूहाची, वर्गाची गरज असते. एकटेच आपण जास्त काळ टिकू शकत नाही. विजयाताईंशी माझी मैत्री ही अगदी सहज व पटकन झाली कारण आमच्या काही आवडीनिवडी समान आहेत. आम्ही दोघेही कलाकार आहोत. विजयाताई या माझ्या अगदी जवळच्या व्यक्ती (किंवा मैत्रीण म्हणाली तरी चालेल पण मैत्रीच्या नात्यात काही अपेक्षा, काही स्वार्थ असतो पण आमचे आई व मुलाचे नाते अपेक्षा व स्वार्थाच्या पलीकडचे आहे). त्याप्रमाणे मेधाताईंशी मैत्री होण्यास थोडा वेळ लागला, पण त्यांनी केलेली एक गोष्ट माझ्या मनात एकदम घर करून गेली. एका साधनाच्या व्यक्तीने सर्वांसाठी काही भेटवस्तू दिल्या होत्या. खास महिलांसाठी लेडीज पर्स व पुरुषांसाठी रुमाल सर्वांना देण्यात आले. ज्या वेळेस माझी वेळ आली त्यावेळेस ताईंनी मला विचारले, 'दीपंकर तुला काय हवे आहे?' हलकेसे मन भरून आलं, कुठेतरी आपला विचार केला जात आहे. त्या दिवशी आमचे नाते बदलून गेले. एका क्षणातच विचार व मत बदलणारा तो माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण होता. त्यानंतर आजवर आमचे अनेक विषयांवर बोलणे होते. कधीकधी वेळ व विषय इतका रंगून जातो, की फार मजा येते. इट्स ऑल अबाऊट ॲक्सेप्टन्स.

आता वळूया माझ्या मुलांकडे. मी ज्यांना मुलं म्हणतो ती खरंतर माझ्या वयाच्या दुप्पट वयाची आहेत. जर मला कोणी दादा म्हटले तरी मला वाईट वाटायचे, पण साधनातली मुले दादा, काका, मामा, भाऊजी, अशा सर्व नावाने हाक मारतात. खास करून 'मनोज' म्हणून एक खूप मोठा मुलगा पण मनाने अगदी लहान. खासकरून त्याच्या 'हाऊस मदर्स'चा लाडका, नेहमी हसणारा, नाचणारा, सर्वांची मजा घेणारा व मी आल्यावर 'भाऊजी तुम्ही आलात, आनंद आहे' असं म्हणणारा.

एक आमचा 'साऊथ सुपरस्टार' विनायक आहे. तो आठ ते नऊ भाषांमध्ये बोलू शकतो, नक्कल करू शकतो. भन्नाट स्मरणशक्ती व सातत्याने प्रश्न विचारण्याची क्षमता. कोणी नवीन आले तर नाव, नंबर, ईमेलपर्यंत विचारणे, सर्व माहिती लक्षात ठेवणे. सर्व मुलं त्याला साधनाचा 'कम्प्युटर' म्हणतात.

आता आमची साधनाची डॉन-मालिनीताई. सर्वांत जास्त आवाज करणारी आमची 'कचोरी', (वर मला 'कचोरी' म्हणायचं नाही, असं रागवणारी). तिची एक मैत्रीण आहे 'छकुली', या दोघी नेहमी एकत्र,

छकुली ही सर्वांची लाडकी आहे, खासकरून विजयाताईची. साधनात तिला जवळपास दोनेक वर्षे झाली आहेत. तिच्यातील अनेक बदल मला पाहायला मिळाले पण तिच्यातील निरागसपणा तसाच आहे.

अमय आणि नाथ आमची नाटकमंडळी आहे. खासकरून नाथ. कधीही न बोलणारा, न रागावणारा, शांत शांत असणारा मुलगा ज्या वेळेस नाटकाच्या रंगमंचावर येतो तेव्हा बक्षीस घेऊनच परतणार.

या मुलांबरोबर नाटक करणे किंवा त्यांचे नाटक बसवणे हा माझ्यासाठी सुंदर अनुभव होता. आम्ही 'खरा हिरा' हे नाटक बसवले व साधनाला नाटकातले पहिले पहिले बक्षीस मिळवून दिले.

माझ्या मनात नेहमी यायचे, की मला या मुलांबद्दल इतके का वाटते? काय आहे आमच्यामध्ये? आमचा तो कोणता एक धागा समान आहे जो आम्हाला एकत्र जोडतो? एक समलैंगिक मुलगा व काही प्रौढ मतिमंद व्यक्तींचे हे प्रेमाचे, मायेचे नाते. नात्याचे नाव 'माय लव्ह फॉर साधना'.

मला एकदा कुणीतरी विचारले होते, की तुला मुले चिडवत नाहीत? खरंतर मुलं ही मुलं असतात. अगदी आरशासारखी मनाने साफ. तुम्ही जर त्यांना प्रेम दिलं तर तुम्हाला प्रेम देणारी, तुम्हाला जीव लावणारी. इट्स ऑल अबाऊट ॲक्सेप्टन्स.

साधनात जाऊन आल्यानंतर मी एक विचार केला, जरा स्वार्थी होऊन देवाचे धन्यवाद मानले. एक धडधाकट व्यक्ती म्हणून जन्म दिल्याबद्दल व एक समलिंगी व्यक्ती असल्याने रडत बसण्यापेक्षा लढण्यासाठी, स्पेशल बनवल्याबद्दल.

CHANGING THE POPULAR NARRATIVE OF LGBTHQIA+ INDIA

QueerInk

PRINT and ACROSS SCREENS

BOOKS | FILMS | EVENTS

info@queer-ink.com





|| Granth ||
THE BOOK WORLD
is proud to announce

rainbow corner

A dedicated section of books by, for and about the LGBTIQA !!!

Books by all famous authors
(Bindumadhav Khire, Raja Rao, Ruth Vanita, Jerry Johnson, Salim Kidwai, Sachin Kundalkar, Vikrant Seth, Amruta Patil, Devdutt Pattanaik & many more )

Books in English, Marathi & Hindi.


Visit today!

RAINBOW CORNER
Granth the book world, 5th lane rajarampuri, kolhapur 416008. Cont.: 9922295522

# प्रवासातील असाही अनोखा अनुभव

श्री. उमेश देशपांडे हे पुणे विद्यापीठात परीक्षा विभागाचे प्रमुख म्हणून काम करतात. LGBTI समाजाच्या न्याय आणि हक्कांचे ते पुरस्कर्ते आहेत. आपण स्वतः एका समलिंगी मुलाचे वडील आहोत याचा त्यांना अभिमान वाटतो.

**ईमेल -** sukrutd@gmail.com



**उमेश देशपांडे**

मी व्हिएतनाम, कंबोडिया या ट्रीपला २९ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २०१८ ला गेलो होतो. ४ ऑक्टोबरला कंबोडियाची हिंदू मंदिरे पाहून ४ ला रात्री 'हो ची मिन्ह' (व्हिएतनाम) शहराच्या विमानतळावर उतरलो. आमच्या ग्रुप बरोबर सोळा स्त्रिया व नऊ पुरुष होते. विमानतळावर आम्हांस घेण्याकरिता स्वागत कक्षात एक तरुण उंचापुरा, गोरा, सडपातळ, डोक्यावर काळी टोपी व हातात आमच्या ग्रुपची पाटी घेऊन स्वागतकक्षात उभा होता.

त्याने आम्हांस हॉटेलवर नेण्यासाठी एका आरामगाडीत बसविले. पुढील तीन दिवस व्हिएतनाममधील 'हो ची मिन्ह'जवळील प्रेक्षणीय स्थळे दाखवण्यासाठी तो आमचा गाईड होता. त्याचे नाव त्याने चँग सांगितले. त्याचे आईवडील अमेरिकेत असून तो येथे आनंदाने राहतो, असेही त्याने त्याची ओळख करून देताना सांगितले. तो खूपच बोलका होता, उद्या काय पहायचे हे त्याने सांगितले. तसेच या ग्रुपमधील स्त्रिया सुंदर आहेत, तसेच पुरुषही सुंदर आहेत असे त्याने आमचे वर्णन केले. स्त्रियांनी याला कारण नसताना तुझे लग्न झाले आहे का? असे विचारल्यावर तो नुसता गालात हसला. तो कसा बोलतो, कसा वागतो याकडे का कोणास ठाऊक माझे बारीक लक्ष होते. काही वेळातच हॉटेल आले. उद्या ठीक आठ वाजता आपण निघणार आहोत असे त्याने सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सात वाजता नाश्ता घेऊन, आठ वाजता तयार झालो. हॉटेलच्या पोर्चमध्ये आम्ही सर्वजण जमलो असताना काही लोक चँगबद्दल चर्चा करीत होते. 'तो जरा 'करण जोहर' आहे ना?' अशी एकाने शंका काढली. यावर बहुतेकांनी सहमती दर्शवली. ठीक आठ वाजता आम्ही गाडीत बसलो. चँग सर्वांशी अगदी हसूनखेळून होता. इकडची तिकडची माहिती देत होता. हास्यविनोद चालले होते. चँगवरही महिलांनी टॉन्ट (म्हणजे थट्टा) करण्यास सुरुवात केली. गाडीमध्ये गाणी लावण्यात आली. त्यावर लोकांनी डान्स करण्यास सुरुवात केली. यामध्ये चँगही सामील झाला. तोही नाच करू लागला. यावर काही महिलांनी ''बाई वाड्यावर या'' असा रिमार्क मारला. 'लोक आपली टिंगल करतायत' असे त्याला भाषा जरी कळत नव्हती तरी त्यास जाणवत होते. हे कळूनसुद्धा तो दिलखुलास वावरत होता. यावर त्याने त्याच्या भाषेत गाणीही म्हटली. यानंतर त्याला काही महिला 'अक्का' या नावाने संबोधू लागल्या. अंदाजे चार वाजता प्रेक्षणीय स्थळे पाहून आम्ही परतीच्या प्रवासास लागलो.

सायंकाळी चँग आम्हाला इंडियन रेस्टॉरंटमध्ये डिनरसाठी घेऊन गेला. या रेस्टॉरंटमध्येही त्याची तेथील महिला कर्मचाऱ्यांशी चांगली ओळख होती. व्हिएतनाममध्ये हॉटेलमध्ये बहुतांश महिला कर्मचारी

होत्या. त्यांच्याशी पण चँगची चांगलीच सलगी होती. अगदी अंगाशी खेळण्यांपर्यंत. याकडे आमच्या सर्वांचे लक्ष होते.

चँगचे एकंदर वागणे, बोलणे यावरून सर्वांच्या मनात चँग कोण आहे हे पक्के व्हायला लागले पण त्याबद्दल कोणाशी उघड चर्चा केली नाही. चँगशी आपले सर्व लोक असे का वागतात याबद्दल मला आता राग यायला लागला होता, पण बोलणार कोणाशी? कारण तीन ते चार वर्षांपूर्वी मीही असाच चँगबद्दल विचार केला असता पण माझ्या आठवणीनुसार ज्यांना नैसर्गिक देणे आहे त्यांच्याबद्दल मला नेहमी कणव येते. कोणास ठाऊक पण माझ्याप्रमाणे इतर लोक का विचार करत नाहीत? ज्यांना निसर्गाने असे बनविले आहे त्यात त्यांचा काय दोष आहे? आपण त्यांना समजून घ्यायला नको का? आधार द्यायला नको का? जाऊ द्या, जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे म्हणतात ना?

तिसऱ्या दिवशी सकाळी ०८.३० वाजता आमच्यासाठी चँग गाडी घेऊन आला. सर्वजण गाडीमध्ये बसले. गाडीमध्ये बसल्यानंतर एकाने चँग कसा चालतो तसे गाडीमध्ये चालून दाखवले. सर्वजण खोखो करून हसले. ॲक्शन करणाऱ्याचे सर्वांनी कौतुक केले, पण कोणास ठाऊक मला त्या ॲक्शन करणाऱ्याच्या तोंडात मारावीशी वाटली, पण मी काही प्रतिक्रिया दिली नाही. कारण मनात वेगळीच भीती होती.

आजची प्रथम व्हिजिट बांबू व नारळाच्या धाग्यांपासून बनविणाऱ्या वस्तूंच्या कारखान्यात होती. येथील सर्व कारखान्यात बहुतेक मुली होत्या, त्या तरुण व आकर्षक होत्या. नेहमी येण्याजाण्यामुळेच चँगची त्यांच्याशी चांगली सलगी होती. या बांबू व नारळाच्या धाग्यांपासून वस्त्रे कशी वापरतात त्याचे प्रात्यक्षिक एका रूममध्ये आम्हांला एका तरुण महिलेने करून दाखविले. तिने काही धाग्यांची, वस्त्रांची प्रात्यक्षिके दाखविली; ती कशी परिधान करायची हे सांगितले. तिला चँगने विचारले ''ही वस्त्रे परिधान केल्यास आत काही वस्त्रे पाहिजेत का?'' ती नुसती हसली. एवढे मोकळे वातावरण होते. या प्रात्यक्षिकानंतर काही लोकांनी वस्तू खरेदी केल्या.

यानंतर आमची व्हिजिट नंदीमध्ये असलेल्या एका सुंदर बेटावर होती. या बेटावर जाण्यासाठी आमचा बोटीचा प्रवास अगदी आनंदात झाला. या बोटीमध्ये लोकांनी गाणी म्हटली, डान्स केला. या बेटावर उतरल्यानंतर तेथे आमची लंचची व्यवस्था होती. या लंचबरोबर तेथील स्थानिक मुलींनी आम्हांस गाणी म्हणून दाखविली, त्यांच्याशी चँगची चांगलीच सलगी होती.

जेवणानंतर आम्ही एका कॅनॉलमध्ये बोटीने प्रवास केला. घोडागाडीमध्ये बसलो. चँगने ही सर्व व्यवस्थित मदत केली, पण त्याला आता महिला चँग अशी हाक न मारता 'अक्का' अशी हाक मारत होत्या. मला वाटले तुम्ही त्याला असे का संबोधता? त्याची टिंगल करू नका, त्याला समजून घ्या, पण सांगणार कसे? संयम ठेवला. कोण काय बोलते याकडे लक्ष न देता, मी मात्र चँगशी अगदी आपुलकीने वागत होतो. मी त्याच्याबरोबर एक फोटोही घेतला. त्याने एक सरळ फोटो दिला व दुसरा फोटो तोंडाचा चंबू करून दिला. यानंतर मी त्याची पाठ थोपटली. यामध्ये मी त्याला समजून घेत आहे हे दर्शविले. यानंतरचे चँगची माझ्याशी वागणे आपुलकीचे होते. बोटीची सफर करून आम्ही हॉटेलवर यायला निघालो. येताना एकाने 'आती क्या खंडाळा' असा टॉन्ट टाकला. मला परत वाईट वाटले. काय करावे या

लोकांना?

हॉटेलवर फ्रेश झाल्यानंतर आम्ही डिनरसाठी एका इंडियन रेस्टॉरंटमध्ये गेलो. रेस्टॉरंट सुरेख होते. जेवणही चांगले होते. या ठिकाणी दोन वेटर चँगचे दोस्त होते. ते चँगप्रमाणेच दिसणारे होते. तसे आमचे लोक म्हणाले, की येथे सर्वच चँग आहेत. सर्वच 'अक्काबाई' आहेत. या दोघांमध्ये एक अगदी वीस वर्षांचा होता तो सडपातळ, नाजूक, गोरागोमटा होता. ॲक्शन पण अगदी तशीच, दुसरा जाड होता पण हालचाली चँगपेक्षाही जास्तच. दोघेहीजण सर्विस देत होते. लोकांनी काही तक्रार केली तरी निमूटपणे ऐकत होते. एखादा पदार्थ उशिरा आल्यास काहीजण त्यांच्यावर ओरडत होते पण ती मुले अगदी अदबीने कानाशी येऊन, 'थोडे थांबा' असे म्हणत असत. मी पण लोकांना जरा सबुरीने घ्या असा सल्ला दिला.

मी जेवताना त्या दोघांकडे अगदी आधार द्यायच्या दृष्टीने पाहत होतो. जेवणानंतर मी त्या दोघांना बक्षीस देऊ केले पण त्यांनी ते घेतले नाही, यांकडे सर्वांचे लक्ष होते. आमच्यापैकी एका महिलेने त्यांना बक्षीस दिले. त्यांनी घेतले व त्या महिलेने मला सांगितले, की तुम्ही परत जाऊन त्यांना बक्षीस द्या. ते द्यायला मी परत गेलो, त्यांना बक्षीस दिले. त्यांनी ते घेतले. त्यांना आनंद झाला. 'असेच आनंदी रहा' असा आशीर्वाद देऊन मी खाली आलो. त्यांना सहानुभूती दाखविण्यात मला बरे वाटले. मी त्यांना टीप दिली हे सर्वांना माहिती झाले पण व्यक्तिशः मला कोणी काही बोलले नाही. डिनर घेऊन हॉटेलवर आलो.

अशा मुलांशी समाज असं का वागतो? त्यांची टिंगल का करतो? ते आनंदी जीवन जगण्याचा प्रयत्न करतात ना? मग तुम्ही त्यांची टिंगलटवाळी का करता? आपल्यात कुणी असा मुलगा-मुलगी, भाऊ, नातेवाईक जवळचा असेल तर असेच वागाल का? मला खात्री आहे, मी या अशा मुलांबद्दल असा विचार का करतो हे इतरांना सांगितले तर तेही समजून घेतील. अगदी बाहेर नाही तरी तोंडावर तरी काही म्हणणार नाहीत. पण आज धाडस झाले नाही. बघू, पुन्हा धाडस होईल का? पण खऱ्या अर्थी याबाबत काम होणे आवश्यक आहे.

# कविता

संदेश कुडतरकर एका आय. टी. कंपनीत टीम लीड म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे लेख पुरुष स्पंदन, स्त्री-उवाच, अक्षरनामा, वेब पोर्टल, तसेच लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स या दैनिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

**ईमेल -** msgsandesa@gmail.com



**संदेश कुडतरकर**

## अंतर

तुझ्या-माझ्यात नेहमीच असणार आहे अंतर
एक रबरी पडदा विलग करत राहणार आहे
आपल्या देहांना, कितीही प्रेम असलं माझं तुझ्यावर
किंवा बाय चान्स, तुझंही माझ्यावर असलं
तरी लग्न झालेले नवराबायको, अंतरपाट दूर होऊन
गळ्यात माळा पडल्या, की एकमेकांच्या देहावर मालकी हक्क गाजवू शकतात
एकनिष्ठ असल्याचं भासवत,जमत नसलं तरी
शिळं झालेलं नातं, वर्षानुवर्षं
जडशीळ बीनबॅगसारखं, फरफटत नेत इकडून तिकडे
पण तरीही घराच्या उंबऱ्याच्या, आतच ठेवत
तसं आपलं कुठे आहे? रबरी पडदा फाटला की
असंख्य संसर्गजन्य रोगांचे जंतू, वाटच पाहतायत
तुला, मला बदनाम करण्याची, कणाकणाने संपवण्याची
कितीही इच्छा असली तरी, याच कारणामुळे
तुझ्या पॅलेटवरचे रंग पूर्णपणे, माझ्यात मिसळू शकणार नाहीत कधीच
तरीही माझं प्रेम असेलच तुझ्यावर, तुला मुक्त करणारं
कुठल्याही लेबलशिवाय, मला तुझ्याशी जोडून ठेवणारं
आणि बाय चान्स, तुझंही माझ्यावर असलं
मग असेना का अंतर, एका रबरी पडद्याचं

.........संदेश कुडतरकर

## उद्धार

तुझ्या मस्क्युलाईन गंधात फुटलेली पहाट, ओंजळीत धरता धरता निसटून जाते
बोटांच्या पेरांमधल्या मोकळ्या जागेतून, एकमेकांचे ओठ दुखवेपर्यंत
स्मूच करून झाल्यावरही, तुझी क्षुधा शमत नाही आणि माझीही
मग असंच काहीतरी विचित्र मनात येतं..., की सगरपुत्रांचा उद्धार करायला
भगीरथाने आवाहन केलेल्या, स्वर्गातून कोसळणाऱ्या गंगेच्या प्रपातासारखा
माझा सर्वनाशी प्रणय कोसळू पाहतो, समस्त विश्वाचा विनाश करत...
तेव्हा त्याला रोखण्यासाठी गरज असते, तुझ्यासारख्याच
हलाहल पचवलेल्या सर्वशक्तिमान शिवाची, माझा आवेग नातं जोडू शकतो फक्त तुझ्यासारख्याच
आदि आणि अंत नसलेल्या महाकाय विश्वाशी, स्वतःहून शरण जाऊ इच्छितो तुझ्या जटांना
धन्य मानणार असतो स्वतःला तुझ्यापुढे लीन होण्यातच..., मग तुझ्या राकट देहात मिसळलेली
माझी वासना
पारिजातक फुलवत रंध्रारंध्रांत पसरते..., निर्माल्य झाल्यावरही दरवळत राहते...

.........संदेश कुडतरकर

## हार्टब्रेक

तिशी उलटून गेलेल्या पुरुषांचे हार्टब्रेक होत नसतात
काहींना दुःखाचे कढ येतात मध्येच बरसून गेलेल्या पावसाच्या सरीसारखे
काहींच्या वेदनेच्या कविता होतात
आणि बरीचशी दुःखं बुडून जातात सेन्सॉर्ड व्यसनांतही
बाकी हे सगळं लोणच्यासारखं बरणीत भरून ठेवणारे
आणि काही नसलं करायला की अधूनमधून तोंडी लावणारे
अल्पवयीन तरी असतात किंवा प्रेम कळलंय आपल्याला, अशा भ्रमात जगणारे..

.........संदेश कुडतरकर

# तृतीयपंथी (ट्रान्सवुमन) विजयाचे आत्मकथन



**विजया वसावे**

*विजया वसावे ही तृतीयपंथी (ट्रान्सवुमन) व्यक्ती आहे. पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेतून त्यांनी आपले M.S.W. चे शिक्षण पूर्ण केले आहे.*

**ईमेल -** vijaysingvasave1993@gmail.com

नमस्कार !

सर्वप्रथम मी माझी ओळख करून देते. मी वसावे विजया, माझा जन्म (एक मुलगा म्हणून) आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील एका गावात आदिवासी कुटुंबामध्ये झाला. वडिलांची तीन लग्न झाली, त्यात मी सर्वात मोठ्या आईचा सर्वात लहान मुलगा. जसे वडिलांचे लग्न झाले तसे आई हे जग सोडून गेली. आता घरात सर्वांत लहान आई, वडील आणि भाऊ, बहीण, वहिनी असा परिवार आहे.

गावात शाळा नव्हती म्हणून गावापासून १३ कि.मी. अंतरावरच्या एका गावाला घरच्यांनी प्राथमिक शिक्षणासाठी शाळेत दाखल केले. प्राथमिकमध्ये असतांना शाळेत हुशार म्हणून सर माझं नाव घेत असत. मला आठवते, मी अगदी लहान असतांना मला मुलींसोबत खेळणे, राहणे आवडे. माझ्या मैत्रिणी मुली होत्या. साडी नेसून खेळणे, असे माझे बालपणीचे दिवस. लहानपणापासून मी एक मुलगी आहे असे वाटत होते. शिव्या देणे, नीट न वागणे माझ्या बाबतीत कधी घडले नाही. शारीरिक आकर्षणाच्या गोष्टी मला सहावी-सातवीत असताना जाणवू लागल्या.

शिक्षण गावाकडे झाले पण मुलगा चांगला शिकावा म्हणून वडिलांनी जिल्ह्याच्या ठिकाणी एका खाजगी संस्थेत बोर्डिंगमध्ये इयत्ता पाचवीमध्ये दाखल केले. पाचवीचा प्रवेश विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन होत असे. या पाचवीच्या वर्गाच्या प्रवेशाला वडिलांच्या मित्रांचीदेखील मुले होती. पण या सर्वांमध्ये मी एकटाच पास झालो (वडिलांच्या मित्रांच्या मुलांना कालांतराने प्रवेश मिळाला). बोर्डिंगमध्ये प्रवेश झाल्यानंतर चार-पाच दिवस खूप चांगले गेले. काही दिवसांनंतर आमच्या ग्रुपमधला एकजण (वडिलांच्या मित्राचा मुलगा) माझ्या लाजाळू वृत्तीमुळे, माझ्या दिसण्यावरून मला 'माझी गर्लफ्रेंड' म्हणून चिडवू लागला. मलाही खूप छान वाटायचे. माझ्यापेक्षा तो दोन वर्गाने पुढे होता.

बोर्डिंगमध्ये खूप कमी सुविधा होत्या. बाथरूमची सोय पुरेशी नव्हती त्यामुळे मुले उघड्यावर आंघोळ करत असत पण मला उघड्यावर तो समोर दिसला, की खूप लाज वाटत असे आणि उघड्यावर आंघोळ करता येत नसे कारण मीही त्याला माझा 'बॉयफ्रेंड' म्हणून मानत होते. मलाही तो खूप आवडत असे पण मी त्यापुढे कधी व्यक्त झाले नाही. 'माझी बायको', 'माल', 'गर्लफ्रेंड' असे शब्द वापरून मला तो खूप चिडवत असे. मी एकटी असायचे तेव्हा हे चिडवणे मला खूप छान वाटायचे पण माझ्याबरोबर जास्त मुले असली, की त्यांच्यापुढे चिडवणं मला खूप त्रासदायक असायचं, कारण बाकीचे मित्र मला 'बायल्या-बायल्या' म्हणून खूप चिडवत असत. त्यामुळे मला खूप मानसिक त्रास होत असे. माझा सर्व

मित्रांपुढे खूप अपमान होत असे.

पाचवीनंतर मी मेकप करणे, चेहऱ्याला हळद लावणे, शाल साडीसारखी नेसून खोलीत बसणे माझ्या मनाला खूप आवडत असे. काही मित्र मला 'काय मुलीसारख्या सवयी करतो' असे म्हणत असत. मला जो विद्यार्थी माझी 'गर्लफ्रेंड' म्हणत होता त्याला मी इयत्ता १२ वीपर्यंत माझ्या मनात एक बॉयफ्रेंड म्हणून समजत होते. तो मला जास्त वेळ जवळ दिसला नाही तर मी त्याला लपून लपून बघत असे. पण मला काय माहीत तो फक्त त्याच्या मनोरंजनासाठी मला चिडवत आहे? मला त्याची दुसरी 'गर्लफ्रेंड' आहे माहीत पडल्यावर, मी त्याला जास्त आवडत नसेल म्हणून तर त्यानी मला सोडले नसेल? असे वाटत होते. पण त्यालाही कुठे माहीत होते मी मुलाच्या रूपाने एक मुलगी म्हणून जन्माला आली आहे आणि त्याला मी माझा बॉयफ्रेंड म्हणून समजत आहे. किती वेगळं ना हे जीवन? निसर्गाने मला या वेगळ्या पद्धतीने मुलाच्या रूपात मुलगी म्हणून जन्म दिला. मी त्याच्यापुढे कधीही त्याची 'गर्लफ्रेंड' म्हणून व्यक्त झाले नाही. पण माझी कविता खास त्या प्रेमासाठी आहे ती खालील प्रमाणे :

## प्रेम

पावसाळ्याच्या पहिल्या सरीत मातीचा सुगंध दरवळत गेला
शाळेच्या पहिल्या भेटीत तुझे अंजन इशारा देत गेले
शाळेच्या दुसऱ्या भेटीत अंजनच्या इशाऱ्यानी ओळख होत गेली,
अंजनचे ओळखीचं रूपांतर मैत्रीत होत गेले
मैत्रीच्या वेलीत तू मला माझी म्हणत गेला
मैत्रीच्या वेलीत मी तुला माझा समजत गेले
पावसाळ्याच्या पहिल्या सरीत मातीचा सुगंध दरवळत गेला
शाळेच्या पहिल्या भेटीत तुझे अंजन इशारा देत गेला,
जीवनाच्या खऱ्या आयुष्याला माझ्यातील भावना व्यक्तच झाल्या नाही
जीवनाच्या खऱ्या आयुष्याला तुझ्याजवळची मी तुला कळलेच नाही
आजही मी म्हणते,
पावसाळ्याच्या पहिल्या सरीत मातीचा सुगंध दरवळत गेला
शाळेच्या पहिल्या भेटीत तुझे आंजन इशारा देत गेला.

जसजसे बोर्डिंगमध्ये शिकत होते, वरच्या वर्गात गेले तसतसे शारीरिक बदलामुळे मानसिक ताण वाढत गेला. अनेक समस्या वाढत गेल्या कारण या शारीरिक बदलांबद्दल माझ्याबाबतीत काय होत आहे ते मला अजिबात समजत नव्हते. वडिलांचा स्वभाव थोडा कडक होता म्हणून कोणाला सांगावे हे कळत नव्हते. या बदलांमुळे अभ्यासात लक्ष लागत नव्हते, फक्त शिकायचं म्हणून शिकत होते आणि कसेतरी पास होऊन वरच्या वर्गाची पायरी चढत होते.

माध्यमिकला असताना १४ वर्षांखालील गटात खोखो हा खेळ खेळत होते. संघातील इतर मुलांप्रमाणेच सराव करत असे पण इतर मुलांपेक्षा मी लवकर थकून जात असे. त्यावेळेस मला वाटायचे माझ्यात काही तरी दोष आहे. आमचे खेळाचे शिक्षकदेखील मला ''काय मुलीसारखा पळतो? नीट पळत

जा'' असे सांगत असत आणि समोर असणारे लोक माझे पळणे बघून खूप हसत असत. त्यामुळे मला खूप लाज आणि मानसिक त्रास होत असे.

११वीत असताना घरच्यांनी विज्ञान शाखेला प्रवेश घेऊन दिला. इंग्रजी अगोदरपासून नीट येत नव्हते कारण या सर्व समस्यांमुळे या विषयाकडे व अभ्यासाकडे खूप दुर्लक्ष झाले. विज्ञान शाखेतील विषय येत नव्हते याचा ताण १२वीच्या वर्षात खूप आला. शारीरिक बदलामुळे भयंकर त्रास झाला. काय करावे कळत नव्हते, त्यामुळे खूप डोकेदुखी व्हायची. या दोन वर्षांत अनेक वेळा आत्महत्त्येचा विचार मनात आला. मी दररोज 'डेटॉल'ची बाटली सोबत घेऊन झोपत असे. आज नाही उद्या, काही वेळाने पिईन असा विचार करून आणि सततच्या ताणताणावाने रडून दिवस काढत असे. रात्रंदिवस झोप लागत नसे. उन्हाळ्याच्या सुट्टीत गावाकडे घाटावरून उडी मारून आत्महत्या करण्याचा विचार करत असे. पण घाटाजवळ आजूबाजूला इतर व्यक्ती असत त्यामुळे थोड्या वेळाने लोक नसतील त्या वेळेस घाटावरून खाली उडी मारू म्हणत वेळ काढत असे. आईचा मी लहान असतानाच मृत्यू झाला त्यामुळे मला या वेगळेपणातून मुक्त व्हायचं असेल तर आत्महत्या हाच माझा चांगला निर्णय आहे असे वाटत होते. मी मेले, तर मेल्यानंतर माझी आई मला स्मशानभूमीत भेटेल असादेखील त्यावेळचा माझा विचार होता. आदिवासी समाज म्हटल्यावर मला भेडसावणाऱ्या समस्यांचं उत्तर कुठे मिळणार त्यावेळेस?

१२वी पास झाल्यानंतर पदवीशिक्षणासाठी मी नाशिकला प्रवेश घेतला. त्यावेळेस स्मार्ट फोन होता. त्यावेळेस फक्त समलिंगी व्यक्तींसबंधित काही माहिती वर्तमानपत्रातून वाचायला मिळाली, म्हणून मी पण एक समलिंगी आहे असे समजत असे. पदवीशिक्षण घेत असतांना मी एकदा महाविद्यालयाच्या बाहेर गुंड प्रवृत्तीच्या मुलांच्या कचाट्यात सापडले. 'तू समलिंगी आहे का?' म्हणून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. त्या दिवशी खूप रडले. माझ्याबाबतीत असचं का होत आहे? मी स्वत:ला खूप दोष देऊ लागले. महाविद्यालात विभागप्रमुखाला घरी जाते म्हणून फोन करून निघून गेले. तेव्हापासून एकटं बाहेर जाण्यास खूप भीती वाटत असे.

पदवीशिक्षण घेत असताना एका समुपदेशकाला भेटले. त्यावेळी त्यांनी मला सहा-सात महिन्यांत बरा होऊन जाशील म्हणून खूप गोळ्या लिहून दिल्या. मी कधी या गोळ्यांनी सुधारते याची वाट बघत होते. त्या गोळ्यांनी काही फायदा झाला नाही. त्यानंतर सर्वप्रथम मी माझ्या मोठ्या बहिणीला या समस्येबाबतीत सांगितले. तीदेखील 'अशी समस्या असलेली व्यक्ती आम्ही कधी ऐकली नाही' असे म्हणत असे. त्यानंतर घरातील इतरांना माझ्या या वेगळेपणाबाबत कळलं. माझ्या बहिणीने, कोणीतरी काही मांत्रिक केले असेल म्हणून मला भगतकडे घेऊन गेल्या. त्या भगतने 'याला काळी जादू केली आहे' असे सांगितले व त्या भगत महिलेकडे अनेक विधी करायला लागतील असे सांगितले. घरात काही विधीदेखील केले पण या गोष्टी मला पटत नव्हत्या तरीदेखील त्यांच्या आग्रहा मुळे केल्या. शेवटी मी सुधारले असे सांगून विषय बंद केला. कारण घरात काहीजण, याला असे का झाले असेल? म्हणून ताण घेत होते.

पदवीशिक्षण झाल्यानंतर पुण्यातील कर्वे समाज सेवासंस्थेत M.S.W. साठी प्रवेश झाला आणि या महाविद्यालयातून खरी जीवनाची कसोटी सुरू झाली. या महाविद्यालयाचा अगदी प्रवेशपरीक्षेच्या दिवसापासून ते M.S.W. पूर्ण होईपर्यंत एक - एक दिवस माझ्या आयुष्याला वळण देणारा होता. माझ्यात

जे शारीरिक बदल जाणवत होते ते मला माझ्या आयुष्यात या महाविद्यालयाच्या लायब्ररीत मला पुस्तक रूपाने वाचायला मिळाले. त्या दिवशी मी खूप रडले. मला २५ वर्षं होऊन गेली. माझ्यातल्या वेगळेपणाबद्दल सर्वप्रथम मला या एवढ्या वर्षांनंतर वाचायला मिळाले. याच बरोबर मला डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी आधार दिला.

त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापिका मसदेकर मॅडमना माझ्या या वेगळेपणाविषयी सविस्तर कथन केले कारण मला ज्या ठिकाणी 'फिल्ड वर्क' म्हणून एका संस्थेत दिले त्या ठिकाणी मला खूप वस्तीपातळीवर त्रास होत होता. त्यामुळे माझ्या अभ्यासावर परिणाम होत होता. अनेकदा मॅडमनी विचारलेल्या प्रश्नाला काहीतरी उत्तर द्यायचं म्हणून मी देत होते. हळूहळू सवय होत गेली आणि जे काही शिकतो त्याचा मला खूप फायदा व्हायला लागला. या महाविद्यालयातील प्राध्यापक, सर्व शिक्षक कायम माझ्या लक्षात राहतील. एकदा महाविद्यालयाने 'लैंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी 'व्हिजिटिंग फॅकल्टी' म्हणून मा. बिंदुमाधव खिरे यांना बोलावले होते. 'लैंगिकता' या विषयावर मला निर्माण झालेले, माझ्या बदलाविषयी अतिशय सोप्या शब्दात संपूर्ण विषय त्यांनी समजून सांगितला. या लेक्चरपासून मला निमार्ण झालेल्या प्रश्नांची शास्त्रशुद्ध माहिती या ठिकाणी मिळाली आणि माझ्या जीवनाला नवीन दिशा मिळाली.

माझ्यासारख्या वेगळेपणा वाटणाऱ्या व्यक्तीसाठी शिक्षकाची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मसदेकर मॅडम व नेहा मॅडम मला भेटल्या हे मी माझं भाग्य समजते. त्यांनी माझी समजूत काढली आणि मला माझे M.S.W. शिक्षण पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले, हे मी माझ्या आयुष्यात कधीच विसरणार नाही.

समपथिक ट्रस्टचे मा.बिंदुमाधव सर यांनी मला माहिती दिली. मी स्वतः त्यांची भेट घेऊन या विषयाबद्दल शास्त्रशुद्ध माहिती जाणून घेतली आणि मग घरच्यांना समजून सांगितली. तसेच मा.बिंदुमाधवसरांनी पुण्यातील प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अरविंद पंचनदिकर यांच्याकडे असेसमेंटसाठी पाठवले. तसेच ज्या व्यक्ती या समस्येतून गेल्या आणि त्यांची लिंगबदल शस्त्रक्रिया झाली त्यात ट्रान्सवुमन गझल (सिने अभिनेता अमीर खान याच्या 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमात त्या आलेल्या आहेत.) ट्रान्समॅन आर्या पाशा, मिस. ट्रान्सक्वीन २०१८ विना सेन्द्रे, महाराष्ट्र पोलीस दलातील ललित साळवे या सर्व व्यक्तींच्या मुलाखती, आत्मकथनं घरातील व्यक्तींना दाखवली. त्यामुळे माझे हे वेगळेपण घरच्यांना समजण्यास सोपे गेले आणि आता माझ्या नवीन आयुष्याला सुरुवात करायचे ठरवले. प्रत्येक सेकंद एका पुरुषासारखे वर्तन करणे मला अशक्य आहे. माझ्या नवीन आयुष्याला नवीन ओळखीने, नवीन पाऊलखुणांनी, नवीन आयुष्यात स्त्रीची शरीररचना घेऊन मी नवीन आयुष्याची सुरुवात करणार आहे. काही दिवसांनी लिंगबदल शस्त्रक्रिया करायची आहे. त्याने माझ्या जीवनाला नवीन दिशा प्राप्त होईल. मला माझ्या संपूर्ण कुटुंबाचा पाठिंबा मिळाला आहे. माझ्यावर सर्वजण आता पूर्वीपेक्षा जास्त प्रेम करत आहेत. माझ्या काकू, बहीण, भाऊ, वहिनी माझ्याशी मैत्रिणीप्रमाणे वागतात.

शास्त्रशुद्ध माहिती देऊन कार्य करणारे बिंदुसर यांच्या आदर्श रूपाने पुढील जीवन जगताना नेहमी सरांच्या कार्याप्रमाणे माझा जेवढा समुदायाला हातभार लागेल तेवढा मला द्यायचा आहे.

### कविता

तो का ती त्यालाच व्यक्त होऊ दे
माणसा, तो आणि ती असल्याचे जन्मत: नको ठरवू
निसर्ग चक्र बदलते
तसं माणसाचे चक्रही बदलते
माणसा, तो आणि ती असल्याचे जन्मत: नको ठरवू
समुद्राच्या लाखमोलाच्या शिंपल्यात एक मोती असतो
तसं माणसाच्या लाखमोलाच्या शिंपल्यात तो आणि ती अंतर्मनाने एक असतो
माणसा, तो आणि ती असल्याचे जन्मत: नको ठरवू
तो का ती त्यालाच व्यक्त होऊ दे
तो का ती त्यालाच व्यक्त होऊ दे
माणसा, तो आणि ती असल्याचे जन्मत: नको ठरवू

---

# एक समलिंगी मी



कॉम्रेड अभिलाष

कॉम्रेड अभिलाष समलिंगी असून, ते कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) सी.पी.आय.(एम) चे सक्रीय सभासद आहेत व स्टुडन्ट फेडेरेशन ऑफ इंडियाचे व्हॉलंटीअर आहेत.

**ईमेल-** abhirajechoudhary@gmail.com

### कविता

होतो कसा, आहे जसा
सर्वांसारखा मी, पण थोडा पुरुषीवेडा
प्रेमात गुंतून राहतो मी, केला विचार
जर मिळाला होकार, करील मी संसार
ठेवील निष्ठा, न करिता चेष्टा
कारण एक समलिंगी मी
कारण एक समलिंगी मी

---कॉम्रेड अभिलाष

# विदेश – देश खबरबात

## विदेश



### अभिनंदन तैवान

**१७ मे २०१९–** तैवानच्या संसदेने समलिंगी विवाहाला मान्यता दिली. समलिंगी विवाहाला मान्यता देणारा तैवान हा आशिया खंडातील पहिला देश आहे. गेल्या वर्षी 'समलिंगी विवाहाला मान्यता द्यावी का?' या प्रश्नावर जनमत घेण्यात आले होते. जनमतात असे दिसले, की समलिंगी विवाहाला ५०% पेक्षा जास्त लोकांचा विरोध आहे, असे असूनही तैवानच्या संसदेने समलिंगी विवाहाला मान्यता दिली.



**सुलतान हस्सानल बोल्कीआ**

### धिक्कार असो !

**एप्रिल २०१९ –** ब्रुनई देशाचा सुलतान हस्सानल बोल्कीआ याने शरीया कायद्याचा आधार घेऊन एप्रिल २०१९ मध्ये जाहीर केले, की समलिंगी संभोग करणाऱ्यास दगडाने ठेचून ठार मारण्यात येईल. जगभरातून तीव्र निषेध झाल्यावर त्यांनी या कायद्यास तूर्तास स्थगिती दिली आहे.

### याला म्हणतात स्पष्टवक्तेपणा!

**एप्रिल २०१९ –** लाग्झेम्बर्ग देशाचे प्रधानमंत्री झेवियर बेटेल समलिंगी आहेत व त्यांनी त्यांच्या पुरुष जोडीदाराबरोबर समलिंगी विवाह केला आहे. फेब्रुवारी २०१९ साली इजिप्तमध्ये झालेल्या युरोपियन युनियन व अरब देशांच्या परिषदेमध्ये ते म्हणाले, ''माझा समलिंगी विवाह झाल्यामुळे तुमच्या अनेक देशांत मला मृत्युदंडाची शिक्षा होऊ शकते.'' या वाक्यावर सर्व परिषद एकदम शांत झाली. नंतर ट्विटरवर ते म्हणाले, ''न बोलणे हा माझ्यापाशी पर्याय नव्हता.''



**श्री. झेवियर बेटेल**



**रोड्रीगो ड्युटेरटे**

### पुढारी आणि पाऱ्याचा बुळबुळीतपणा !

**जून २०१९ –** फिलिपाईन्सचे अध्यक्ष रोड्रीगो ड्युटेरटे यांनी टोकियोमध्ये एका मेळाव्यात सांगितलं, की ''सुंदर स्त्रियांच्या मदतीने मी समलैंगिकतेपासून बरा (मुक्त) झालो.'' ''लाडलाड'' (इंग्रजीत अर्थ: 'come out') पक्षाचे अध्यक्ष डटन रेमोटो म्हणाले ''ड्युटेरटे ची वाक्यं पाऱ्यासारखी असतात. प्रेक्षक कोण आहे त्यावर त्यांची मते ठरतात.''

## 'Sledging' पडले महागात!



ज्यो रूट

**फेब्रुवारी २०१९** – वेस्ट इंडीज आणि इंग्लंडमधील सेंट लुसियामध्ये झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात खालील संभाषण स्टंप मायक्रोफोनमध्ये ध्वनीमुद्रीत झाले.
शानन गेब्रीयल (वेस्ट इंडीज) : ''माझ्याकडे बघून का हसतोयस? तुला पोरं आवडतात का?''
ज्यो रूट (कॅप्टन इंग्लंड क्रिकेट संघ) : ''हा विषय अपमान करण्यास वापरू नकोस. समलिंगी असण्यात काहीही गैर नाही.'' ज्यो रूटच्या या उत्तराचे जगभर कौतुक झालं आणि शिक्षा म्हणून शानन गेब्रीयलला ४ कसोटी सामने खेळण्यास बंदी घालण्यात आली.

## उलटा प्रवास !



डोनाल्ड ट्रम्प


**मे २०१९** – अमेरिकन लष्करातील इतर व्यक्तींप्रमाणे सर्व वैद्यकीय सुविधांचा लाभ अमेरिकन लष्करातील तृतीयपंथींनाही घेता येत होता. पेंटॅगॉनचे नवीन धोरण मात्र प्रतिगामी आहे. या धोरणानुसार लिंगबदलाशी निगडीत कोणतीही वैद्यकीय सुविधा तृतीयपंथीयांना मिळणार नाही. लष्करात जर काम करायचे असेल तर तृतीयपंथीयांनी आपली लैंगिकता दाबून ठेवण्यासाठी समुपदेशन घेतलेच पाहिजे. हे नवीन धोरण अमेरिकन लष्करातील तृतीयपंथीयांसाठी अत्यंत घातक आहे.

## भूतान– हम तुम्हारे साथ हैं !

**०७ जून २०१९** – रोजी भूतान देशाच्या कनिष्ठ सभागृहाने समलिंगी संबंधांना गुन्हा ठरवणारे भूतान दंडविधानातील कलम २१३ आणि २१४ काढून टाकण्यास बहुमताने पाठिंबा दिला, ही अत्यंत आशादायी बाब आहे. आशा आहे, की भूतानचे वरिष्ठ सभागृहदेखील, भूतानच्या LGBTI समाजाच्या मानवी हक्कांच्या बाजूने मतदान करेल.




## केनिया – अरेरे काय हा निकाल!




**२४ मे २०१९** – रोजी केनिया देशाच्या न्यायालयाने दोन प्रौढ व्यक्तींनी संमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना गुन्हा ठरवणारा कायदा वैध ठरवला. केनिया न्यायालय असे म्हणते, की ''समलिंगी नात्यांना संमती देणे राज्यघटनेच्या चौकटीला छेद देणारे ठरेल.''

## अभिनंदन बोटस्वाना



**११ जून २०१९** – रोजी बोटस्वानाच्या (आफ्रिका) उच्च न्यायालयाने बोटस्वाना दंड विधान संहिताचे कलम १६४ घटनाबाह्य घोषित करून संमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना गुन्ह्याच्या यादीतून काढून टाकले. बोटस्वाना न्यायालय असे म्हणते, की कलम १६४ हे भेदभाव करणारे, घटनाबाह्य आणि जनहिताच्या विरोधी आहे. हा निकाल आफ्रिकन देशातील LGBTI समाजासाठी मोठा विजय आहे.

## देर आये दुरुस्त आये !

आपल्या शारीरिक लिंगाशी आपला लिंगभाव संलग्न नसण्याला ट्रान्सजेंडर म्हणतात. ट्रान्सजेंडर असण्याला वैद्यकीय शास्त्र आजपर्यंत मानसिक आजार समजत होते. या कालबाह्य विचारसरणीला छेद देऊन, 'जागतिक आरोग्य संघटनेने' 'Gender Identity Disorder' म्हणजे ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी असणे म्हणजे मानसिक आजार आहे हे निदान ICD11 (International Classification of Diseases) मधून काढून टाकले आहे. याचा अर्थ ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी असणे म्हणजे मानसिक आजार नाही. यामुळे त्यांच्यावर होणारे अत्याचार आणि त्यांना 'बरे' करण्यासाठी वापरली जाणारी अघोरी वैद्यकीय उपचारपद्धत बंद होण्यास उपयोगी ठरेल.

# देश

## कलम ३७७ ला मूठमाती



आदरणीय भारतीय सर्वोच्च न्यायालयाने ०६ सप्टेंबर २०१८ रोजी भा.दं.सं. कलम ३७७ वर ऐतिहासिक निर्णय देत, दोन प्रौढ व्यक्तींनी सहसंमतीने खाजगीत केलेल्या समलिंगी संबंधांना गुन्ह्याच्या यादीतून वगळलेले. आदरणीय न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला. भा.दं.सं. कलम ३७७ हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४,१९,२० आणि २१ कलमांचे उल्लंघन करणारे आहे असे घोषित करण्यात आले.

## अभिनंदन दुती चंद !



**२० मे २०१९** –१०० मीटर शर्यतीत भारतात विक्रम नोंदवणारी व २०१८ साली आशियाई स्पर्धेत दोन रौप्यपदक मिळवणारी दुती चंद ही, आपण समलिंगी नात्यात आहोत हे जाहीरपणे सांगणारी पहिली भारतीय क्रीडापटू ठरली आहे. आपल्या जोडीदाराबरोबर राहायला आवडेल असेही ती म्हणाली आहे. तिच्या या धाडसाचे देशविदेशातून कौतुक केले गेले आहे. (मात्र तिच्या गाववाल्यांचा दुतीच्या या नात्यास विरोध आहे). दुती चंदच्या या धाडसाला आमचा सलाम आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## शुभ मंगल!



**एप्रिल–मे २०१९** – अरुण कुमार (वर) व सिरजा (एक तृतीयपंथी वधू) नी लग्न करायचं ठरवलं. तुतीकोरीनच्या रामेश्वर मंदिरात त्याचं लग्न झालं. मॅरेज रजिस्ट्रारनी त्यांच्या लग्नाची नोंदणी करण्यास नकार दिला. जोडप्याने मद्रास उच्च न्यायालयाकडे धाव घेतली. न्यायमूर्ती. जी. आर. स्वामिनाथन यांनी महत्त्वाचा निर्णय दिला, की हिंदू विवाह कायदा, कलम ५ नुसार यांचं लग्न कायदेशीर आहे आणि त्याची रजिस्ट्रारने नोंद केली पाहिजे. त्यानुसार या लग्नाची कायदेशीर नोंद करण्यात आली.

## माझे शरीर, माझी निवड, माझे अधिकार!




**एप्रिल/मे २०१९** – न्यायमूर्ती जी. आर. स्वामिनाथन (मद्रास उच्च न्यायालय) यांनी वरील निकालात द्विलिंगी बाळांवर लिंग घडवण्याची शस्त्रक्रिया करण्यास बंदी घातली आहे. बाळास किंवा लहान मुलास आपल्या लिंगभावाची ओळख झालेली नसते. अशा परिस्थितीत आई–वडिलांच्या हट्टापायी किंवा सामाजमान्यतेपायी त्या बाळावर अशी शस्त्रक्रिया करणे हा त्या बाळावर अन्याय आहे. याबाबतीत आई वडिलांची संमती ग्राह्य धरली जाऊ शकत नाही.

## समलिंगी विवाहाला पाठिंबा !



लोकसभेच्या (२०१९) जाहीरनाम्यात समलिंगी विवाहाला पाठिंबा देणारा **सी.पी.आय.(एम)** हा देशातील पहिला पक्ष ठरला आहे.

## भेदभावविरोधी कायद्याची मागणी!



ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) पर्सन राइट्स बिल (२०१९) वर ०५-०८-२०१९ ला संसदेत बोलताना, ३७७ चा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देत **(भा.ज.पा. खासदार) किरण खेर** म्हणाल्या, की ''सकारनी सर्व LGBT समुदायासाठी एक भेदभावविरोधी कायदा केला पाहिजे.''

# रात्रीत उघडलेली गुपितं



राहुल हनुमंत शिंदे

राहुल शिंदे हे पेशाने शिक्षक आहेत आणि त्यांना विविध विषयांवर लिहायला आवडते. माहेर, मेनका, लोकप्रभा यांसारख्या अनेक दिवाळी अंकांमध्ये त्यांचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे.

**ईमेल** - rahul.shinde1541@gmail.com

त्या चौघांची मैत्री दुर्मिळ होती. निसर्गनियमाप्रमाणे मुळातंच माणूस स्वार्थी असतो. इतरांना मदत करतो, त्यातून त्याला काहीतरी मिळणार असते म्हणूनच पण नियामांना अपवाद असतात की! तशीचं त्यांची मैत्री. नि:स्वार्थी, एकमेकांना उन्नत करणारी. आज त्याचीच साक्ष म्हणून अनघासाठी इतर तिघे रोहित, मनोज आणि सुप्रिया रात्री एक वाजता तिच्याकडे आले होते.

''काही अवघड नसतं गं, हा जाणवणारा एकटेपणा मानसिकच जास्तचं असतो.'' त्या चौघांमधला सर्वात लहान, पंचंविशीचा रोहित जवळपास आपल्या दुप्पट वयाची असणाऱ्या आनघाला समजावीत होता. क्त

''अचानक सगळं भयावह वाटायला लागलं, श्वास अडकून राहिल्यासारखं वाटत होतं ... कसली ओढ लागते कळत नाही, फक्त डोळ्यांत अधूनमधून अश्रू येत राहतात.'' अनघा हतबलपणे बोलत होती.

''आम्ही आलोय न आता, तुला जो काही त्रास होतोय तो बोलून, हवं तर रडून मोकळा कर.'' सुप्रियाने अनघाचा हात हातात घेतला.

''या भावना काही काळापुरत्या असणाऱ्या पाहुण्या असतात. त्या भावनांच्या आहारी जितकं कमी जाता येईल तितकं जायचं, बस! एवढं लक्षात ठेवायचं, शेवटी सगळचं नश्वर आहे. शारीरिक वेदना, मानसिक त्रास सगळंच नश्वर.'' नेहमीप्रमाणे रोहितमधला तत्त्वज्ञानी आणि सकारात्मक माणूस बोलत होता.

रोहित अनघाला सर्वांत जास्त ओळखत होता. अनघानं रोहितजवळ आपल्या आयुष्याचं पूर्ण गुपित उलगडलं होतं......

''माझे आईवडील जुन्या पारंपरिक विचारांचे. अठरा वर्षांची झाल्यापासून मला स्थळं बघायला सुरुवात झाली. विसाव्या वर्षी माझं लग्न ठरलं. तो मुलगा मला पसंद नव्हता पण घरात माझ्या नकाराला काहीही महत्त्व नव्हते . त्या काळी आईवडिलांना फक्त माझ्या वाढत्या वयाची चिंता होती. मनाविरुद्ध माझं लग्न झालं, तो मला पसंद नसल्याकारणाने लग्नानंतर मी त्याला शरीरसंबंधांना नकार देऊ लागले. जेव्हा दोघांची मने जुळतील तेव्हाचं एकत्र येऊ अशी जणू अट घातली. त्याच्यासाठी तो धक्का होता. त्याचीही चिडचिड व्हायला लागली. अशीच काही वर्षे गेली, आमचं काही जुळलं नाही. शेवटी आम्ही घटस्फोट घेऊन वेगळे झालो. नंतर मला मनासारख्या जोडीदाराची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. एकटेपणा

सतावू लागला. शारीरिक, मानसिक त्रास चालू झाला. काही वर्षांनी समुपदेशकाकडे चकरा सुरू झाल्या.

काही वर्षांनी मला मनीष भेटला. तो मला आवडला, पण त्याचा स्वभाव तापट आणि लहरी होता. लग्नानंतर मी त्याला माझ्या प्रेमाने बदलेन अशी आशा बाळगून मी त्याच्याशी लग्न केले. फसले मी. मी त्याला बदलू शकले नाही. लग्नानंतर स्वतःच लहान मुलासरखा रडायचा, मला सॉरी म्हणायचा. प्रचंड त्रास सहन केला मी त्याचा. तो स्वतःही कसल्या तरी नैराश्यात जाणवायचा मला, पण बोलायचा नाही. कसला 'पुरुष' होता तो देव जाणे, पण शरीरसंबंधात त्याला इंटरेस्टच नसायचा. अगदी बोटावर मोजण्या इतपत वेळा आम्ही जवळ आलो. दैवाने मला मुलगा 'अनिकेत' झाला. मुलगा झाल्यानंतरही मनीषमध्ये काही बदल झालाच नाही.... काही वर्षांनंतर मनीषला हार्टअटॅक आला आणि त्यातच तो गेला. मी नंतर स्वतःच्या पायावर उभी राहिले. आर्थिक अडचण कधीच आली नाही. मला मिळालं नाही ते मनासारखं प्रेम आणि ज्या वयात ज्याची प्रकार्षाने गरज होती ते सेक्स, तेही..... आता अनिकेत मोठा झालाय, मला आता स्थिर व्हायचंय, जोडीदार हवा आहे.''

अनघानं रोहितकडे उलगडलेलं हे गुपित त्याला आठवून गेलं.

चौघंही सिंगलच्या गटात भेटलेले, प्रत्येकाची वेगळी हकीकत, वेगळा प्रवास. मनोजचा घटस्फोट झालेला, सुप्रिया पस्तीशी ओलांडून अजून अविवाहित, अनघाचा दुसरा नवरा मनीष आकस्मिक निधन झाल्यामुळे ही विधवा म्हणून या गटात सामील झालेली. रोहित इतका तरुण असूनही सिंगलच्या गटात का सहभागी झालेला आहे? याचं मात्र सर्वांनाच कोडं पडलेलं होतं.

''आता लहान आहेस म्हणून असं म्हणतोस. एका विशिष्ट वयानंतर जोडीदाराची तीव्र गरज भासायला लागली, की कळेल तुला.'' एकदा अनघा त्याला म्हणाली होती.

''हे झालं सर्वसामान्यांबद्दल, पण काही असामान्य लोकांच्या शरीर आणि मनाची रचना निराळी असते. ते लोक आपले आयुष्य आपल्या धेयासाठी झोकून देतात. त्यांचे ध्येय म्हणजेच त्याचा जोडीदार. विवेकांनद, डॉ.कलाम अशी कितीतरी उदाहरणे आहेत. आय एम अल्सो एक्स्ट्राऑरडीनरी. मी ध्यान-धारणेतून अशा पायरीपर्यंत पोहचंलो आहे, की मला जोडीदाराची गरज नाही. मी कोण? परमेश्वर आणि निसर्गात माझं नेमकं स्थान काय? या प्रश्नाची उत्तरे मला हळूहळू मिळत आहेत.'' रोहित स्वतःला असामान्य समजत होता, त्याचं हे बोलणे अनघाच्या तेव्हा काही अंशी डोक्यावरून गेलं होतं.

रात्रीचे दीड वाजले होते, ते अनघाच्या घराच्या गच्चीवर होते. आल्हाददायी वारा सर्वांच्या मनाला मोहरून टाकत होता. रस्त्यावरच्या गाड्यांचा नेहमीचा त्रासदायक आवाज नव्हता, माणसांचा गलका नव्हता. सोबतीला फक्त निसर्ग होता, काळ्या आकाशात चांदण्या खुलल्या होत्या. निसर्गाच्या या किमयेने आणि आपल्या माणसाच्या नुसत्या असण्याने अनघाचा मानसिक त्रास गायब होऊन तिच्यात वेगळेच चैतन्य निर्माण झालं होतं.

''आता खरचं बरं मस्त वाटतंय.... आज जो त्रास होत होता तसा प्रसंग वैऱ्यावरही येऊ नये. एकेक क्षण माझं काळीज कुरतडत होता.'' अनघा म्हणाली.

''माणसाच्या वेदना किती विचित्र असतात, काही क्षणांसाठी येऊनही परत कधीच जाणार नसल्याचा

आभास निर्माण करून माणसाला गिळंकृत करायला बघतात. या निमित्ताने अशा या अद्भूत वेळेस भेटलो. चहूंकडे प्रकाश कसा मंदपणे पसरला आहे. ही रात्र, हा क्षण न क्षण उलटूचं नये अस वाटतं.'' मनोज सारं काही अनुभवून बोलत होता.

''याच क्षणाला कवेत घेऊन आज आपण खेळ खेळूया.'' अनघा उत्साहित होऊन म्हणाली.

''खेळ?'' इतरांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं.

''हं... सिक्रेट टेलिंगचा खेळ, प्रत्येकाने आपल्या आयुष्याचं गुपित सांगायचं, कुठलही, ते गुपित, वेगळं, वाईट असलं पाहिजे. 'bad secret' म्हणतो ना, तेच. आपल्या मैत्रीला कसलंच बंधन नाही. आपण प्रत्येकजण वेगवेगळ्या वयातले आहोत. आपलं सिक्रेट एकमेकांना सांगून आपण आपल्या मैत्रीचे बंध अजून घट्टपणे विणूयात''. अनघाने समजावून सांगितलं, तशी इतरांनी उत्सुकतेने मान डोलावली.

''आयडीया मस्त आहे, पण.... माझ्याकडे तसं सांगण्यासारखं काहीच नाही. आय एम एनिवेज ओपन अबाऊट एव्हरीथिंग.'' रोहित म्हणाला.

''हो का? तू असामान्य आहेस ना! नसेल काही सांगण्यासारखं तर तू एखादा किस्सा सांग हं!'' अनघा रोहितची खिल्ली उडवत म्हणाली. त्यावर मनोज ''तसं त्याला कितपत सिक्रेट म्हणता येईल मला नाही सांगता येत.'' विचार करून म्हणाला.

''येस प्लीज, इथे जेन्ट्स फर्स्ट'' अस म्हणतं सुप्रियाने अनघाला टाळी दिली.

''हे जे सिक्रेट आहे, तेच माझ्या घटस्फोटचं कारण आहे. आमचं अॅरेंज मेरेज. लग्नाआधी आम्ही दोघेही एकमेकांना आवडलो होतो, पण ते प्रथमदर्शी प्रेम होतं. एकमेकांना पूरक आहोत का हे जाणून घेण्याआधीच आमचं लग्न झालं. आम्ही दोघेही समजूतदार, तरीही शरीराने जवळ येऊन मनाने कधीच जवळ येऊ शकलो नाही. चार वर्षं एकत्र राहिलो. एकमेकांबद्दल ओढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला, पण काही निष्पन्न झालं नाही. आमच्यात जुळत नाही म्हटल्यावर दोघांनीही एकमताने वेगळे व्हायचं ठरवलं. नात्यात कुठेतरी पोकळी होती, घट्टपणा नव्हता. लोकांसाठी आम्ही 'आयडील कपल' होतो. खरं सांगू, घटस्फोट का झाला? या प्रश्नाला माझ्याकडे काहीच समर्पक उत्तर नाही. कदाचित ते माझं मलाच माहिती नाही.'' हे सांगताना मनोज अंतर्मुख झाला.

''उत्तर मिळेल मनोज, तू आता जे आम्हांला सांगितलंस, तेचं शांतपणे स्वतःला कधीच सांगितलं नसशील. काही प्रश्नांना थेट उत्तरं नसतात, पण त्या प्रश्नांच्या अवतीभवतीचे अनेक प्रश्न स्वतःला विचारले की ती उत्तरं मिळतात.'' तत्त्वज्ञानी रोहितचं हे बोलणं मनोजला पटलं.

''सुप्रिया इट्स युवर टर्न नाऊ.'' अनघा म्हणाली. ''हो... माझं सिक्रेट खरंच bad आहे हं'' सुप्रिया.

रात्र आता मध्यावर आली होती. मधूनचं रस्त्यावरून येणारा कुत्र्यांचा आवाज नीरव शांतता भंग करत होता.

''मी अविवाहित असले तरी वर्जिन नाही.'' सुप्रियाच्या या वक्तव्यावर काय प्रतिसाद द्यावा हे क्षणभर कोणालाच कळेना.

''वर्णानं मी काळी, लहानपणापासून मी किती कुरुप आहे, हे सर्वजण मला दाखवत आले. तारुण्यात मला प्रेम मिळालं नाही. माझ्यासाठी स्थळं आली त्यात मला नकार मिळत गेला. माझं वय वाढल्यावर आईवडील कुठल्याही स्थळाला 'हो' म्हणायला लागले, जी मला पसंत नसायची. दुसरीकडे मी स्वतंत्रपणे जोडीदार शोधू लागले... कामाच्या ठिकाणी एकजण मला आवडू लागला, त्यालाही मी आवडले. तो विवाहित होता, पण शरीराच्या मागणीपुढे दुबळी झाले होते. न मिळालेली स्वप्नारंजीत गोष्ट मला मिळत होती, मी त्याच्या आहारी गेले.'' सुप्रियाने सांगून टाकले.

''अजूनही भेटता तुम्ही?'' काही क्षणांच्या शांततेनंतर अनघाने विचारले.

''नाही, तो सोडून गेला. त्याला थांबवण्याचा मलाही काही अधिकार नव्हता... त्याचा संसार होता, हक्काचं घर होतं. मला खूप त्रास झाला. नंतर मी ठरवलं, अशी चूक पुन्हा करायची नाही. आपल स्वतःचं हक्काचं माणूस हवयं मला. त्याच्या शोधात आहे मी... ''

''सिक्रेट सांगण्यामागचा हेतूच हा असतो, बोचरा भूतकाळ दुसऱ्याला सांगून त्यातून बाहेर यायला मदत होते...'' सुप्रिया म्हणाली. ''डियर, तुला मनासारखा जोडीदार मिळेल.'' अनघाच्या या बोलण्यावर रोहित आणि मनोजने मानेनं सहमती दर्शवली.

''कॉफी घेणार का?'' मनोजच्या प्रश्नावर सगळेच चटकन 'हो' म्हणाले. अनघा, मनोजच्या मदतीने घरातून कॉफी तयार करून, दोघे पुन्हा गच्चीवर आले. मध्यानाची रात्र, रस्त्यावर लखलखणारे दिवे, वाऱ्याचा सुखावणारा स्पर्श, कॉफीचा दरवळ, सारं काही स्वप्नात घडत होतं.

''रोहित, तुझ्याकडे सांगण्यासारखं काहीच नाही? मग मी सांगते माझं, जे तुला मी ऑलरेडी सांगितलंय, पण ते सिक्रेट मनोज आणि सुप्रियाला माहिती नाही... माझ्या पहिल्या घटस्फोटाचं आणि नवऱ्याचंही..'' अनघा म्हणाली.

''अनघाताई, आहे माझ्याकडही सांगण्यासारखं.'' रोहितचा चेहरा इतका पडलेला प्रथमचं त्या तिघांनी पाहिला. ''याला कॉफी चढली की काय? चेहरा बघा याचा.'' अनघाच्या या बोलण्यावर मनोज आणि सुप्रिया हसू शकले नाहीत, रोहितच्या चेहऱ्यावरचे भाव बदललेले होते, ज्याकडे त्याचं लक्ष वेधलं होतं. दुसऱ्या क्षणी अनघालाही, हा फरक जाणवला.

''मी आतापर्यंत तुम्हांला खोटं सांगत आलो... पूर्वायुष्यात कित्येक टप्प्यांवर मी स्वतःशीच खोटं बोलत आलो. प्रत्येक दिवशी चेहऱ्यावर खोटा मुखवटा चढवून खरे अश्रू, वेदना आतल्या आत लपवत आलो. घुसमटत राहिलो.'' रोहितचं हे अनपेक्षित बोलणं ऐकून अनघाने त्याच्या पाठीवर हात ठेवला. ''रोहित काय बोलतोयस हे?''

''मी 'गे' आहे, माझं मनानं आणि शरीराने पुरुषाकडे आकर्षण आहे.'' रात्रीच्या गडद अंधारात रोहितच्या तोंडातून बाहेर पडलेले हे शब्द तिघांचीही मनं खोलवर हलवून गेले.

''शारीरिक बदल घडत असताना आपला लैंगिक कल इतरांपेक्षा वेगळा आहे, हे समजल्यावर मानसिक पातळीवर खचून गेलो. आपल्यासारखं दुसरं कोणीच नाही का? आपण पापी आहोत का? असे प्रश्न अजाण वयात पडायचे. हे बदलावं म्हणून देवाकडे प्रार्थना चालू केली. त्या लहान वयात उपवास

केले, कोणालाही न सांगता. देवाने हे बदलावं. मीच का असा म्हणून खूप चीडचीड व्हायची. कॉलेजमध्ये मित्रांसोबत असताना आपल्यालाही मुलीच आवडतात असं सांगून चेहऱ्यावर खोटा मुखवटा घालून वावरलो. माणसांच्या घोळक्यात असूनही मनाने खूप एकटा पडलो. एम.एस्सी.च्या शेवटच्या वर्षाला असताना माझं एका मुलावर प्रेम जडलं. तो आपल्यासारखा नसला तर? या विचाराने मात्र मी व्याकूळ व्हायचो. भावनांना कोंडून ठेवलं, पण एक दिवस त्या भावनांचा बांध फुटला, मी त्याला तो आवडत असल्याचं बोलून दाखवलं... तो माझ्यासारखा नव्हता; माझ्यावर प्रचंड चिडला तो, 'तुला अस वाटलंच कसं की मी तुझ्यासारखा असेन?' मी म्हणालो, 'मला माफ कर. माझ्या भावनांचा उद्रेक झाला, मला आता कळालं, आता आपल्यात फक्त मैत्रीचं नात राहील.' त्यानं मात्र मैत्रीचं नातंही तोडून टाकलं. मी कोलमोडून गेलो. कित्येक रात्र नीट जेवण नाही की झोप नाही. एक-एक करून माझी सगळी माणसं मला सोडून जाताहेत अशी विचित्र स्वप्नं पडायची. हा त्रास एवढा असह्य झाला, की एकदा मध्यरात्री उठून होस्टेलच्या बाहेर येऊन जोरात हंबरडा फोडला, आजूबाजूचं काही भान नव्हतं.''

''नोकरीला लागल्यावरही प्रचंड त्रासात होतो, पण कामाच्या ठिकाणी काही चांगले सहकारी भेटले. एका सहकाऱ्याशी चांगली मैत्री झाली, त्याला मी माझ्याबद्दल सांगितले तो क्षण माझ्या आयुष्यातला कलाटणीचा क्षण ठरला, त्यानं मला फक्त स्वीकारायलाच नाही तर माझ्या असण्याचा त्याला अभिमान असल्याचं सांगितलं... त्यानं माझ्या आत्मविश्वासावर बसलेल्या धुळीवर फुंकर मारली, माझ्यातल्या हरवलेल्या 'मी'ची पुन्हा भेट घडवून दिली. स्वतःच स्वत:चा शोध सकारात्मकतेने घेत राहिलो, आशावादी बनत गेलो.''

''स्वतः खंबीर बनतबनत मी आईलाही सांगितलं. ती कोलमडून गेली, माझं पुढं काय होईल, बाहेरच्या जगात कसा निभाव लागेल, म्हणून चिंतातूर असते. मी तिला बळ देत असतो. या सगळ्यातून मी शिकत राहिलो, उन्नत होत गेलो. वाचनातून, अनुभवातून सकारात्मक आणि शांत बनत गेलो. समाज मला सहजासहजी का स्वीकारत नाही म्हणून आधी त्रास व्हायचा, पण आपण स्वतःशी किती प्रामाणिक आहोत हे महत्त्वाचं हे समजल्यावर तो त्रासही आता होत नाही. संघर्षाशी सामना करण्याची ताकद आहे, संघर्ष संपला नाही, बदल होणं मात्र गरजेचं आहे. कितीतरीजण अशा वेगळ्या कलामुळे न सांगता आपली जीवनयात्रा संपवतात. लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकेतसुद्धा २०१५ साली समलिंगी विवाहाला मान्यता देण्यात आली. आपल्याकडे मात्र... हे सगळं माझ्या मनात साठून असतं. मी माझ्या इतरांना समृद्ध करत असतो. इतरांना धीर देत असतो तेव्हा नकळत मी स्वतःलांच धीर देत असतो. मी लग्न करायचं नाही म्हणतो त्यामागे हेच कारण. पण मला एका पुरुष जोडीदाराची नितांत गरज आहे, जो माझ्या सारखाच आहे. हे मला कोणालाही सांगायची लाज वाटत नाही पण समोरच्याची मला समजून घ्यायची वृत्ती असायला हवी...''

''एक गोष्ट खूप प्रकर्षाने समजली, माणसं मनातली एखादी सल शेवटपर्यंत ओढत नेतात आणि मृत्युच्या दारातही अपूर्णत्वाची खंत असते. असं असू नये. निसर्गाने आपल्याला कमालीची बुद्धीमत्ता दिली आहे, त्या बुद्धीमत्तेचा उपयोग आपण 'नसणं' शोधण्यापेक्षा 'असणं' शोधण्यावर केला पाहिजे, तरंच आयुष्य सर्वकाही असतं.'' रोहित हे शांत, निर्विकारपणे सांगत असताना तिघांच्या डोळ्यात अश्रू

आले होते.

''मी, आता खंबीर असलो तरी माणसाची गरज प्रत्येकाला असतेच ना?'' रोहित म्हणाला. जसा मनोज आधारासाठी त्याच्याजवळ गेला तसा रोहितला हुंदका आला आणि तो मनोजच्या खांद्यावर डोकं ठेऊन लहान मुलासारखा रडू लागला.

आता गुपित सांगायची वेळ अनघावर होती, तिने तेचं गुपित सांगितलं जे रोहितला याआधी तिनं सांगितलं होतं, पण रोहितचं गुपित ऐकून तिला तिचा दुसरा नवरा मनीष तिच्याजवळ येण्यास का उत्सुक नसायचा याचं गूढ आणि गुपित उलगडलं होतं. मनातल्या प्रश्नांची उत्तरं याच जन्मात मिळवीत, ही एक प्रकारची मुक्तीच.


चौघांनीही एकमेकांकडे गुपित उलगडून आपली दुखरी नसच दाखवली होती. त्यावर मलम सापडलं नव्हतं, पण मलम शोधण्यासाठी आता एकाचे चार हात झाले होते.

# कोलाज
## ‘अद्वैत’
### पुणे आंतरराष्ट्रीय क्विअर चित्रपट महोत्सव २०१९


**दिनांक** : २३ मार्च, २०१९ * स्थळ : राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पुणे.
**आयोजक** : समपथिक ट्रस्ट, पुणे, VIIV, द हमसफर ट्रस्ट, कॅनडा कॉन्सुलेट




देश-भारत, भाषा-मल्याळम,
(इंग्रजी सबटायटल्स)




देश-अमेरिका, भाषा-इंग्रजी,
(हिंदी डबींग)




देश-श्रीलंका, भाषा-सिंहली,
(इंग्रजी सबटायटल्स)




देश-भारत, भाषा-हिंदी,
(इंग्रजी सबटायटल्स)





**स्थळ** : राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पुणे



श्री. विवेक राज आनंद (सी.ई.ओ. ‘द हमसफर ट्रस्ट’, मुंबई) चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना



टीम: ‘इव्हिनिंग शॅडोज’ मोना आंबेगावकर, श्रीधर रंगायन आणि अभय कुलकर्णी



**स्वयंसेवक (अद्वैत २०१९)**

**डावीकडून** : तेजश्री जाधव, राज जाधव, परीक्षित शेटे, सुयोग, विक रोय, बिंदुमाधव खिरे, टिनेश चोपडे, उमेश कांबळे, अभिषेक शर्मा, दिगंबर शिंदे, अमोल शिंदे

# फेरा



बिंदुमाधव खिरे

बिंदुमाधव खिरे हे समलिंगी ॲक्टिविस्ट आहेत. त्यांनी लैंगिकतेवर आठ पुस्तके लिहिली आहेत. ते समपथिक ट्रस्टचे अध्यक्ष आहेत व बिंदु क्वियर राईट्स फाउंडेशनचे डायरेक्टर आहेत.
**ईमेल -** khirebindu@hotmail.com

**हे एक अंकी नाटक मोनोलॉग आहे. याला मराठी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे सेन्सर सर्टिफिकेट मिळाले आहे. (डीआरएम–१६९/२०१८, तारीख २३–०२–२०१८)**

श्रद्धांजलीला दोन मिनिटं उभं रहायचं म्हणजे ती दोन तासांसारखी वाटतात. नंतर बसायला सुद्धा त्राण उरला नाही, तसं आम्ही बसलो. पहिलं मलाच बोलायला सांगितलं. मी... मी जड पावलांनी स्टेजवर गेलो. समोर बघीतलं, मोटे सर बसलेले. समुद्र किनारी देवमासा वाहत आला असावा तसे निर्जीव, पण तरी ... ते एक टक माझ्याकडे पहात होते. त्यांच्या शेजारी नवीन सरांच्या डॅडींची रिकामी खूर्ची.

नवीन सरांच्या आई आल्याच नाहीत. हॉस्पिटल मध्ये होत्या. डॅडी आले. अशा प्रसंगीसुद्धा मिलिटरीचा युनीफॉर्म चढवून. स्टिरिओटिपीकल जाडजुड मिशा. सभा सुरू व्हायच्या अगोदर त्यांना मोटे सारांनी माझ्यापाशी आणलं. ''हाच तो'' म्हणून ओळख करून दिली आणि सारांच्या डॅडींची नजर साराईतपणे माझ्या गोऱ्या चेहऱ्यावरून, नाजूक शरीरावरून फिरली. त्यांचा चेहरा दगड झाला. दोन सेकंद माझ्याकडे बघितलं... आणि ....आणि अबाऊट टर्न करून हॉल मधून कायमचे माझ्या आयुष्यातून निघून गेले.

मी पोडीयमवरचा माईक घट्ट धरला. नवीन सरांचा हात घट्ट धरावा तसा... हताशपणे समोर पाहिलं. पण आता मला समोर कोणीच दिसत नव्हतं.... दिसत होता तो पहिल्यांदा अनुभवलेला अथांग समुद्र... 'नवीन सर' म्हणून सुरवात केली पण ते शब्दसुद्धा हाक मारावी तसे आले.... आणि मग काहीच नाही. किती वेळ तसाच उभा होतो कोण जाणे. शेवटी कोणीतरी माझ्या दंडाला अलगद धरून स्टेजवरून उतरवलं आणि बाजूच्या खूर्चीत बसवलं. दुसरा वक्ता स्टेज चढू लागला पण माझं लक्ष नव्हतं. मला गुदमरायला लागलं. ताडकन् उठून मी हॉलच्या बाहेर आलो. जीना उतरलो. नकळत माझीही पावलं या स्विमिंग पूलकडे वळली. या निळ्याशार पाण्याकडे.

मला माहीत आहे, की...की थोड्याच वेळाने माझा पाठलाग करत मोटे सर येणार... मला आज नक्की पकडणार. त्या दिवसापासून मी त्यांना टाळायचा खूप प्रयत्न केला पण आज....

(त्या दुसऱ्या वक्त्याचा आवाज बारीक ऐकूयेतोय असा अभिनय)

त्या वक्त्याचा आवाज ओळखीचा वाटतोय... मी ओळखतो त्याला... वकील आहे तो.

तो दोन दिवसांपूर्वी घरी येऊन गेला होता. कॉलेजवर केस करायची म्हणून बाबांना पटवत होता. सही मागत होता. बाबा म्हणाले विचार करून सांगतो. आजसुद्धा काम आहे असं सांगून बाबा आले नाहीत.

सालं कॉलेजचं नशिब सुद्धा वाईट. निवडणूका नाहीत, अपघात नाहीत की घोटाळे नाहीत. माध्यमांना दुसरं कोणतंच कारण नव्हतं. त्यामुळे कॉलेजच्या वाट्याला खूप अपप्रसिद्धी आली.आमच्या जिल्ह्यातलं सर्वात मोठं कॉलेज. एकदा बालवाडीला मुलाला घातलं की मास्टर्स होईपर्यंत सर्व इथंच. काहींची लग्नंही. अभ्यास असू देत, खेळ असू देत, आम्ही अव्वल. म्हणून कॉलेजवर हल्ला करणाऱ्यांनी कोणीही संधी सोडली नाही.

''कॉलेजनी पालकांची संमती पत्रकं घेतली होती का?''

''हो, घेतली होती''

''पण नुसती संमती पत्रकं का? ॲफिडेवीट का नाही लिहून घेतली?'' ॲफिडेवीट? कशाची ॲफिडेवीट?

उत्तरं मिळत नव्हती आणि कदाचित म्हणूनच जोमाने कारणं शोधणं चालू होतं. हाताशी आलेली मुलं जातातच कशी? कोण जबाबदार? जबाब दो, जबाब दो!!!

''मुलांना समुद्रात जाऊच का दिलं?'' पालकांचा कॉलेजसमोर आक्रोश. कॉलेजने शिक्षकांना धारेवर धरलं. मग स्वभावत: माणसं जे करतात तेच शिक्षकांनी केलं. आपलं ओझं तिथे नसलेल्याच्या माथी मारलं. कोणीतरी म्हणालं, ''आम्ही नव्हतोच तयार पण नवीन सरांचा आग्रह झाला.'' लगेचच ''हो, हो'' म्हणत वरुणने मागून कोरस लावला.

त्याचं नाव निघालं की मला त्याचा तो आसूरी आनंदी चेहरा आठवतो. ''गोरी गोरी पान पोरीसारखी छान, दादा मला एक वहिनी आण.'' असं म्हणत मुलंमुली माझा शोध घ्यायची. हा जिन्याखालचा कोनाडा त्याला साक्षीदार आहे. या जनावरांना चुकवण्यासाठी किती वेळा मी याच कोनाड्याचा आसरा घेतलाय.

सुरवातीला मी खूप चिडायचो... खूप...खूप. पण मग लक्षात आलं, की जेवढा मी चिडतोय तेवढी मुलंमुली excite होतात. तेव्हा हळूहळू माझा विरोध मावळला. हे कायम असंच राहणार म्हणून हताश झालो.निसर्गाने माझ्याच वाट्याला हे फासे टाकले म्हणून मी नशीबाला कोसायचो. ना मित्र ना मैत्रीण. येता-जाता प्रत्येकाची नजर माझ्यावर आहे असं वाटायचं. करण ती असायचीच. मी कितीही पुरुषी चालायचा प्रयत्न केला तरी माझं वेगळेपण लोकांच्या नजरेत यायचं.

कॉलेजचा जीना चढताना विशेष काळजी घ्यावी लागायची. माझं लक्ष नसलं की जीना चढताना वरुण हमखास माझ्या मागून जीना चढत यायचा आणि माझ्या ढुंगणावर जोरात रट्टा मारायचा. मी कळवळून वळून बघितलं की तोच भुवया वर करून ''काय'' असं मलाच धमकीवजा आवाजात विचारायचा आणि फिदीफिदी हसायचा. मग मीच अपराध्यासारखी मान खाली घालायचो आणि भरभर जीना चढून वर्गात सगळ्यात मागच्या बाकड्यावर जाऊन बसायचो. पुढे बसलो तर मागून निलम आणि वरुण रबरबँडमधून कागदाचे बोळे मारायचे.

कॉलेजच्या वॉशरुमला जायची सोय नव्हती. किती वेळ मी मूत दाबून ठेवायचो. आणि मग दूरवरच्या चौकात मुतारीत जायचो. या यातनाघरात एक एक दिवस मी कसा काढत होतो माझं मलाच माहीत. सुरक्षित होतो ते फक्त माझ्याच घरात, स्विमिंग पूलवर आणि कॉलेजमध्ये त्या जीन्याखालच्या कोनाड्यात.

पण एक दिवस जे नको होतं व्हायला ते झालंच. वरुणने मला या कोनाड्यात जाताना पाहिलं आणि नीलूला हाक मारली. नीलू वरुणची गर्लफ्रेंड होती. दिसायला नाजूक, सुंदर. पण जणू काही माझं सौंदर्य तिला आव्हान देत असल्यासारखं ती माझ्यावर कमालीचा व्देष करायचीआणि तिला खूष करायची एकही संधी वरुणने कधी सोडली नाही. किती वेळा माझ्या मनात विचार आला असेल की ही साली मरावी... अगदी हाल-हाल होऊन, तडफडत मरावी.

गेली... ती एकमेव सुरक्षित जागा गेली...

ही....ही नीलूही गेली... (Pause) अपचन झाल्यासारखं लाटांनी तीला तीन दिवसांनी किनारी ओकून टाकलं. शरीर हे असं टंच फुगलेलं. माशांनी डोळे आणि अंग कुरतडून काढलेलं.

तिच्या आईचा हंबरडा TVवर ऐकला, पाहिला. ''हे काय झालं? माझ्या पोरीच्या वाट्याला हे काय आलं?" तिच्या मागची दुसरी बाई "वेळ आली होती दुसरं काय?'' मग Replay. मग परत. मग आणखी एकदा.

या असल्या प्रश्नांना खरंच उत्तरं असतात का? सोईने केलेल्या कुठल्या पाप-पुण्याची बेरीज वजाबाकी करून याची उत्तरं मिळणार? पण मला उगाचच अपराधी वाटतंय. जणू काही माझ्याच शापाने हे झालं. (कुचकट हसत) काय माझा अहंगंड!

(सुस्कारा टाकत) गेली बिचारी. नाजूक, गोरीपान. तेव्हाची मला वरुणची नजर आठवतेय. त्याचे डोळे खरंच खूप सुंदर, खूप सुंदर. पण त्या दिवशी. त्या इतक्या सुंदर डोळ्यांमध्ये एवढा व्देष होता! आला नी माझा दंड गच्च धरला. जणूकाही त्याला माझा भुगा करायचा होता. रागाने थरथर कापत होता. तो बोलायला लागला पण त्याला शब्दच फुटत नव्हते...

''जिथे तू जायचास तिथे नीलू...''

हा... हा भडवा निवाडा करणार (कुचकट हसत) कोणाची वेळ आली होती ते! माझ्या सुदैवाने निवाड्याची वेळ त्याच्यावर नाही आली. माझ्या वाट्याला निसर्गाने वेगळेच फासे टाकले होते. अगदी दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या दिवसापासून...

आदल्या रात्री मला अजिबात झोप नव्हती. नवीन कॉलेजचं वर्ष सुरू व्हायची नांदी. अजून दोन वर्षं या यातनाघरात काढायची होती. पण तेव्हा कुठे माहीत होतं.... की एखादी मुलायम लाट यावी तसं माझ्या आयुष्यात नवीन सर येतील आणि अलगद सगळं अमंगळ नष्ट करून जातील.

नवीन सरांनी वर्गात पाऊल टकलं आणि... आणि मलाच पहिलं वाक्य उद्देशून म्हणाले ''ए बाबा मागे काय बसलायस? ये असा पुढे ये'' मी गडबडलो, ''नको सर, इथेच ठीक आहे.'' ''अरे बाबा, मला मोठ्याने बोलायला लागेल. थोडासा मास्तरच्या नरड्याचा विचार कर'' ...स्वत:ला एकेरी संबोधून सरांनी

वर्गाकडून हशा मिळवला. मी नाईलाजाने रकसॅक उचलून पुढे आलो. मान खाली घालून बसलो. मग हळूच वर पाहिलं आणि... आणि मी त्यांच्यावर भाळलो. उंच, गहूवर्ण, डोक्यावर घट्ट कुरळे काळेभोर केस. उजव्या बाजूला ओठखाली एक बारीकसा तीळ. पण माझ्या लक्षात ठळकपणे उभं राहतंय ते त्यांचे डोळे. त्या डोळ्यांचा रंग मला तेव्हाही कळला नाही आणि आजही सांगता येणार नाही. कधी घारे, कधी चॉकलेटी, कधी पिंगट कधी...

त्यांनी मलाच नाही तर सर्वांनाच मोहून टाकलं. त्यांची शिकवण्याची पद्धत इतकी सुंदर होती की वाटलं त्यांचा तास संपूच नाही. पुढे पुढे तर वर्गात कधीही न दिसणारी मुलं फक्त सरांच्या तासाला दिसू लागली. ही याच वर्गातली आहेत का? असा प्रश्न मला पडयचा.

अर्थात अशा गोष्टी इतर शिक्षकांपर्यंत लगेच पोहोचतात. त्यांची सरांबद्दल बारीकसारीक चौकशी सुरू झाली. जाता जाता मुलांसमोर सरांबद्दल एखादा टोमणा मारणं हाही हळूहळू एक नियम झाला. आपलं पाणी वेगळं आहे याची किंमत मोजावी लागतेच.

त्यादिवशी कॉलेज सुटलं आणि मी या स्विमिंग पूल पाशी आलो. या कठ्ठ्यावर बसायची माझी दररोजची सवय. लोकांचं सूर मारून त्यांचं माशासारखं पाण्यात शिरणं मला मोहून टकतं. पण मी यायचो ते खरं तर मोटे सरांसाठी. ते 'मुटका' specialist होते. पार त्या (वरती हात दाखवत) तिसऱ्या फळीवरून मुटका मारायचे. सर शिडी चढून वरती जायला लागले की सगळे जण पोहणं थांबवायचे. तलावात पूर्णपणे शांतता पसरायची. सर्वांचं लक्ष (वरती खूण करत) आणि मग.... हाताने नाक धरून उडी मारायचे. पायांची मांडी घालायचे. आणि त्यांचा अजस्त्र देह 'धपाक' दिशी पाण्यात पडायचा. देवमासा उसळी घेऊन परत पाण्यात पडावा तसा. आम्ही कठावरचे प्रेक्षक मागे सरूनसुद्धा तुषारांनी भिजायचो. त्यांना बुडून परत वर यायला वेळ लागायचा. आम्ही श्वास रोखून वाट बघायचो. सर वरती आले की हायसं वाटयचं. मग आमच्या टाळ्या. दररोज मुटका. एकदाच. बस. मग सगळे आपापल्या उद्योगाकडे वळायचे.

''काठावर काय करतोस?'' मी दचकून मागे वळून पाहिलं. नवीन सर मला विचारत होते. माझ्या बाजूला त्यांनी टॉवेल, कपडे ठेवले. ''येतं ना पोहायला?'' मी नकरार्थी मान हलवली. त्यांना स्विमिंग ट्रंकस्मध्ये बघून मी चटदिशी मान वळवली. माझी नजर माझं गुपित उघडं करेल याची भीति वाटत होती. ''उद्या ट्रंक्स घेऊन ये. तुला शिकवीन'' असं म्हणत ते पुढे गेले आणि पाण्यात सूर मारला.

माझ्या छातीत धस्स झालं. त्यांच्यासमोर मी कपडे काढायचे या विचारांनीच मी पाणी पाणी झालो. ते माझ्या पोटाखाली हात धरून मला हातपाय मारायला शिकवणार. माझ्या उघड्या अंगाला स्पर्श करणार या विचारांनीच ....(अंगावर रोमांच उठले असा आविर्भाव) छे...छे शक्यच नाही.

सर ब्रेस्ट स्ट्रोक मारत होते. मग बॅक स्ट्रोक आणि मग बटरफ्लाय स्ट्रोक. त्यांच्या खांद्याचे ते पीळदार स्नायू असे टणक होत होते..... मला एकदम सणसणीत अपराधीपणा वाटू जाणवला.... का कुणास ठाऊक.

त्या दिवसापासून सगळंच बदललं. मी Economicsचा अभ्यास मनापासून करायला लागलो आणि

एकदा ... मला बोळा मारत असताना सरांनी रोहनला रंगेहात पकडलं. तेव्हा त्यांना आम्ही पहिल्यांदाच आणि शेवटचं रागावलेलं पाहिलं. त्यानंतर परत मला त्रास द्यायचं कोणालाही धजलं नाही. लेक्चर झाल्यावर म्हणाले, ''ही माझी पुस्तकं लायब्ररीमध्ये जमा कर.'' आणि त्यानंतर हा दररोजचा नियम झाला. माझ्यावर सर हक्क दाखवतात याचा आनंद मी शब्दात नाही सांगू शकत. मी कधी नव्हे ते पुढचे चॅप्टर अगोदरच अभ्यास करून येऊ लागलो, भीतभीत उत्तरं देऊ लागलो. माझ्यात धीटपणा आला. त्यांची प्रत्येक शाबासकी मला स्वर्ग दाखवी... आणि उत्तर चूकलं की मी नैराश्याच्या गर्तेत जाई. कधी एकदा सकाळ होते आणि मी कॉलेजला जातो असं व्हायचं.

त्यांचा वाढदिवस मी फेसबुकवरून कढला. आणि कधी तो दिवस येतोय असं झालं. त्या दिवशी मी एक मोठी कॅडबरी विकत घेतली. प्रश्न होता कोणाला न कळता ती कशी द्यायची? इतरांना कळलं तर 'हा पुढे पुढे करतो' म्हणून गावभर झालं असतं. त्या दिवशी क्लासमध्ये त्यांच्या शिकवण्याकडे माझं लक्षच नव्हतं. एक शब्दही लक्षात राहिला नाही. वर्ग झाल्यावर लायब्ररीत पुस्तकं देऊन सरांना भेटयला गेलो तर ते दुसऱ्या लेक्चरला गेले होते.

संध्याकाळी पोहायला आले. टॉवेल आणि कपडे माझ्या बाजूला ठेवले. मी आता कॅडबरी देऊ? का का पोहून झाल्यावर देऊ? का. राहवलं नाही. ''सर'' मी भीतभीत कॅडबरी पुढं केली. सरांच्या लक्षात येईल एवढा माझा हात कापत होता. ''हॅ..हॅ...हॅपी बर्थ-डे सर!'' सर म्हणाले, ''थँक्यू, ए... नाही रे...'' '' सर प्लिज'' असं मला म्हणायचं होतं पण शब्दच फुटले नाहीत. फुटला तो एक हुंदका.... ''बरं! रडू नकोस'' सर हसत म्हणाले. कॅडबरी घेतली. wrapper थोडं काढलं आणि कॅडबरीचा एक तुकडा चघळू लागले. खात खात ''आता खूष?'' असं म्हणाले. मी लाजलो. होकार देत खाली बघायला लागलो.

मला कळायच्या आत त्यांनी कॅडबरीचा अजून एक तुकडा मोडला आणि माझ्या तोंडात घातला. कॅडबरी भरवताना त्यांचं बोट माझ्या ओठांमध्ये आलं. मी पार गोरामोरा झालो असणार कारण माझा चेहरा बघून सर एकदम ''तू खा'' असं गडबडून म्हणाले आणि माझ्या हाती चॉकलेट देऊन त्यांनी चटकन पुढे जाऊन सूर मारला. पाय लटपटत मी मटकन खाली बसलो. पुढचा कितीतरी वेळ मी मान खाली घालून बसलो. वर पाहिलं तर सर बटरफ्लाय स्ट्रोक करत होते.

मी हळूच बाजूचा त्यांचा टी-शर्ट हातात घेतला. नेटींगचा.गडद जांभळा. पिवळ्या बाह्या. नाकाशी धरून त्याचा दीर्घ खोल श्वास घेतला. तो वास मनात कुठेतरी कायमचा साठवायची व्यर्थ धडपड करत राहिलो.

''आवडला शर्ट?'' मी झटदिशी वर पाहिलं. सर. मी गेरामोरा झालो. ''हवाय?'' असं म्हणंत माझ्या केसावरून हात फिरवला. माझ्या डोळ्यातलं पाणी सरांना दिसण्या आधी तिथून धडपडत उठून पळून गेलो.

नंतर दोन दिवस सर कॉलेजला आलेच नाहीत. माझा जीव कासवीस झाला. काय झालं? माझ्या हातून काही चूकलं का? मला सोडून तर ते गेले नाहीत ना? नाही- नाही ते विचार मनात आले. दोन रात्र झोप नाही. तिसऱ्या दिवशी आले तेव्हा माझा जीव भांड्यात पडला. वर्गातच सर्वांसमोर सरांवर ओरडावसं वाटत

होतं.... ''दोन दिवस का नाही आलात?'' पण तेवढ्यात वरुणननेच नेहमीप्रमाणे लुबरेपणा केला. ''काय सर? लाँग विकेंड घेऊन फिरायला गेले होते काय?'' सर दगडासारखे उभे राहीले. वाटलं चिडलेत. वर्ग शांत झाला. ''अरे नाही रे. माझी एंगेजमेंट होती.'' हाताची अंगठी दाखवत म्हणाले.

''सर काँग्रॅट्स'', "पार्टी हवी सर" म्हणून मुलांचा गिल्ला. माझा श्वास छातीतच अडकला. ''सर लव मॅरेज की अॅरेंजड्?'' वरुणनी विचारलं. मला त्याच्या एक थोतरीत द्यावीशी वाटत होती. ''सर, तिचं नाव काय?''

''सर, मंजिरीला ट्रीपला घेऊन या ना....''

''नाही... नाही सर घेऊन याच तिला...'' काहींचा मस्का आणि काहींची तिला भेटायची उत्सुकता.

त्या दिवसापासून मी Economics चा अभ्यास करणं सोडून दिलं. होईन नापास. शून्य मिळू देत. सगळ्या जगाला कळू देत मी याच लायकीचा आहे. त्या दिवसापासून आजपर्यंत मी या Pool वर आलो नव्हतो.

सरांची होणारी सौ. मंजिरी गेली.....

आणि.... सरही गेले..... माझे सर गेले....

अजून दोन फर्स्ट इयरची मुलंही.... (गेली अशी खूण करून) नावं नाहीत लक्षात. (Pause)

(थोडी मान मागे करून कान देऊन)

मोटे सर येतायत ना? ते का आले आहेत मला माहीत आहे. ते मला काय विचारणार तेही माहीत आहे..... आणि त्यांच्या चेहऱ्याकडे मख्खपणे बघत बसण्यापलीकडे मी काय उत्तर देणार हा ही प्रश्नच आहे. मीच जे शोधतोय.... ज्याच्यासाठी परत परत या किनाऱ्यावर येतोय.

का कुणास ठाऊक स्विमिंग पूल मध्ये राजा असलेले माटे सर एकदाही समुद्रात उतरले नाहीत. Trip ला आम्ही मुलांनी खूप आग्रह केला पण नाही..... एकटेच वाळुत बसून मजा घेत होते. वरुण आणि इतर काही जण Frisbee खेळत होते. आणि Frisbee मागे एक कुत्रा धावत होता.

ती मोठी लाट येताना मोटे सरांनीच बघितली आणि ओरडले. त्यानंतर जे घडलं त्याला फक्त मोटे सरच साक्षीदार होते.

''जवळ मंजिरी, नीलू बुडत असताना नवीन सरांनी मंजिरीला सोडून तुलाच का वाचवलं रे?''

का वाचवलं? काय उत्तर आहे याचं? खरं तर मी बुडायला पाहिजे होतं. रोहनच्या भाषेत, माझ्या सारख्याला जगण्याचा काय अधिकार? आणि बुडलो ही होतो.... ती लाट परत जाताना हाताला लागेल ते खेचून जात होती. माझ्या नाका तोंडात पाणी. फुप्फुसामध्ये ऑक्सिजनसाठी लागलेला वणवा... आणि अंधारी यायच्या आधी कोणाचा तरी स्पर्श. किनाऱ्यावर मी खोकत, उलटी करत शुद्धीवर येईस्तोवर... नवीन सर मला वाचवून परत गेले होते इतरांना वाचवायला....

हीच... हीच जीन्स घातली होती. अशीच फोल्ड केलेली. (जीन्स टाचेपाशी फोल्ड करतो.) मुलांचे घोळके पाण्यात खेळत होते. मी नुसताच किनाऱ्यावर रेतीत चालत होतो. शिंपले मिळतात का शोधत

होतो. छे... सगळे तुटलेले किंवा ओबड धोबड. नकळत मी नवीन सरांजवळ आलो. सरांच्या शेजारी मंजिरी आणि मंजिरीच्या शेजारी नीलू. लाटांत पाय भिजवत उभे होते. मी सरांपासून थोडं अंतर ठेऊन समुद्राकडे बघत उभा राहिलो.

पाण्याच्या ओलाव्याने तळपाय गारेगार जाणवत होते आणि सर सानिध्यात होते म्हणून, बाकी सर्व शरीर मात्र उन्हाने लाही लाही व्हावी तसं तापलेलं.

मंद लाटा हळूच येऊन घुटण्याला मिठी मारत होत्या, सोडत होत्या. अलगद मीठी सोडताना पायाखालचे दोन चार वाळूचे कण हळूच चोरून घेऊन जात होत्या.

असा अनुभव तुम्हाला कधी आलाय, मोटे सर? असं पाय घट्ट रोवून ठामपणे किनाऱ्यावर उभं राहणं. हळूहळू पायाखालची वाळू सरकायला लागून गुदगुल्या झाल्या की गालातल्या गालात हसणं. तोल जाईल म्हणून काहींचं घाबरून मागे सरकणं. पायांवर वाळूचं अस्तर अलगद चढत जाणं. लाटांकडे पाहिलं की डगमगायला होणं.आता तोल जाणार! धपदिशी पडयचो आणि हसू व्हायचं. सावरलं पाहिजे असं वाटणं? का नको सावरायला? कदाचित हा प्रश्न समोर येईस्तोवर काहिंनी आपलं उत्तर शोधलेलं असतं.... जाऊ देत. जे होईल ते होईल. करू तो भार अलगद निसर्गाच्या हवाली. त्यालाच निर्णय घेऊ देत. या हिरव्या, आकाशी, पिवळ्या तांबुस कुशीत भोवळ आल्यासारखं अलगद सामावून जावू. परत...परत... आणखी एकदा...आणखी....

@ @

### @ तेजस्वी सूर्या (खासदार,भा.ज.प.)



काहीजणांना काळजी वाटतीये, की कलम ३७७ गेले की समलिंगी विवाहाची मागणी होईल. का मागणी करू नये? लग्न, वारसा हक्क, दत्तक घेणं या सर्व गोष्टी कायद्याने कल्पनेतूनच घडवल्या आहेत ना? मग समलिंगी जोडप्यांसाठी या कल्पनेत जागा का असू नये? स्वाभाविक आहे ना?

● पेशाने वकील असलेले तेजस्वी सूर्या हे भारतीय जनता पक्षाचे दक्षिण बंगळूरू लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार आहेत.

### @ सुप्रिया सुळे (खासदार,राष्ट्रवादी कॉ.)



#PRIDE महिन्यासाठी हार्दिक शुभेच्छा! आपण जे आहात याबद्दल अभिमान बाळगा ! उद्या (२ जून २०१९) पुण्यात LGBTIQ ची अभिमान पदयात्रा आहे. या निमित्ताने मी सर्व LGBTIQ समुहाला व त्यांना आधार देणाऱ्यांना माझ्या शुभेच्छा !

● सुप्रिया सुळे या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या खासदार आहेत व मे २०१९ ला त्या तिसऱ्यांदा खासदार झाल्या आहेत.

### @ शशी थरूर (खासदार,भा.कॉं.प.)



११ जुलै रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची मानवी हक्क परिषद, लैंगिक कल आणि लिंगभाव यांवर आधारित हिंसाचार व भेदभाव होऊ नये म्हणून नवीन अध्यादेश आणणार आहे. मी आपल्या सरकारला या अध्यादेशाच्या बाजूने मतदान करावे अशी विनंती करतो. LGBT समाजाला पाठींबा द्या.

● शशी थरूर हे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे तिरुवनंतपुरम लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार आहेत.

### @ प्रिया दत्त (माजी खासदार,भा.कॉं.प.)



संयुक्त राष्ट्र संघटनेत LGBT समाजाच्या बाजूने मतदान करून भारताने पुरोगामी धोरण दाखवण्याची वेळ आहे.

● प्रिया दत्त या समाजसेविका व माजी खासदार आहेत.

# Solaris Pictures

*Indian LGBTQ Film Production*
*Distribution & Exhbition*

Organizer of KASHISH Mumbai International Queer Film Festival




## *India Out of The Closet*

www.solarispictures.com

# आमचे (भिन्नलिंगी) दोन शब्द...



अमोल शिंदे

*ही मनोगतं 'पुरुष उवाच' दिवाळी अंक-२०१३ मध्ये प्रकाशित झालेली आहेत.*
*(संबंधीत लेखातील काही भाग इथे प्रकाशित करण्यासाठी संपादक 'पुरुष उवाच' यांची पूर्व संमती मिळवलेली आहे)*
*लेखक अमोल शिंदे हे समपथिक ट्रस्ट चे माजी सहकारी आहेत. सध्या ते राजीव गांधी रुग्णालय, येरवडा येथे ICTC समुपदेशक म्हणून काम करत आहेत. पुणे LGBTI अभिमान पदयात्रे सोबत त्यांनी ८ वर्षे स्वयंसेवक म्हणून मदत केली आहे.*

मी अमोल. मूळचा लातूरचा. पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी पुण्यात आलो. भारती विद्यापीठातून MSW (मास्टर्स इन सोशल वर्क) करताना मला समपथिक ट्रस्ट या संस्थेत क्षेत्र कार्यासाठी कॉलेज तर्फे पाठविण्यात आलं. ही संस्था बुधवार पेठ मध्ये आहे असे समजल्यावर मला भीती वाटली कारण गावाकडे माहिती होतं, की येथे वेश्याव्यवसाय चालतो. संस्था समलिंगी लोकांच्या आरोग्यावर व कायदेशीर बाबींवर काम करते. पण मी याबद्दल कधीही ऐकलेलं नव्हतं, ना काही माहिती होती. संस्थेत जाऊ लागलो तेव्हा समलिंगी व तृतीयपंथी लोकांबरोबर बोलण्याची भीती वाटायची. हिजडे शेजारी बसले तरी मी अंग चोरून घ्यायचो. कोणीतरी लैंगिकदृष्ट्या स्पर्श करेल का ही भीती असायची. पण हळूहळू जशी या समाजांची ओळख झाली तसतशी माझी भीती व सुरक्षितता कमी झाली. यातले अनेक जण माझे मित्र मैत्रिणी बनले. मला हे सांगायला आवडतं, की मी सुरुवातीला येथे विद्यार्थी म्हणून शिकण्यासाठी आलो होतो. पण येथील क्षेत्रीय कार्य झाल्यानंतर मला येथे काम करण्याची संधी मिळेल हे सांगण्यात आलं. माझं MSW पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर समुपदेशक म्हणून इथे कामाला लागलो. मला मिळालेली ही संधी स्वीकारून सध्या संस्थेत काम करत असताना खूप काही शिकायला मिळते आहे व मला या समाजाबरोबर काम करताना खूप आनंद होत आहे.

---

*आस्पाक फकीर हे समपथिक ट्रस्ट चे माजी सहकारी आहेत. सध्या ते यशस्विनी लोकासंचलीत साधन केंद्र, अक्कलकोट (जि. सोलापूर) या संस्थेत मॅनेजर म्हणून काम करतात.*



आस्पाक फकीर

मी सोलापूर जिल्ह्यातील एका खेडेगावात राहतो. मी चंदेले कॉलेजमधून MSW (मास्टर्स इन सोशल वर्क) पूर्ण केले. मी पहिल्यांदा नोकरीच्या शोधात पुण्यात आलो. तेव्हा सहेली या संस्थेत सोशल वर्कर म्हणून काम करू लागलो. नंतर समपथिक ट्रस्ट मध्ये समुपदेशक म्हणून कामाला लागलो. ही संस्था

समलैंगिक लोकांसाठी काम करते हे कळाले.

मला 'गे', 'टिजी' काय आहे हे माहीत नव्हते. हे लोक कसे आहेत? हे लोक काय बोलतात, काय करतात? पण माझ्याशी कसे बोलतील, कसे वागतील ही भीती होती. मला काही नवीन शिकायला मिळेल याचा आनंद होत होता. येथे कामाला लागल्यावर पहिल्यांदा आयुष्यात 'गे', 'टिजी', 'लेस्बियन' हे शब्द ऐकले. या विषयावरची पुस्तकं वाचून माहिती घेतली.

माझ्या गावाकडे हिजडा हा समाज असतो हे माहिती होतं. काहीजण देवरूषी पण करतात हे माहिती होतं. पुरुष वेश्याव्यवसाय ही चालतो हे या संस्थेमध्ये आल्यानंतर कळाले. पहिल्यांदा मला आश्चर्य वाटलं. मी साइटवर पहिल्यांदा एका हिजड्याला भेटलो, तेव्हा मला त्याच्याशी काय व कसं बोलावं असा प्रश्न पडला. त्याची भीतीही वाटली. हळूहळू भीतभीत मी त्याच्याशी बोलू लागलो व त्याला प्रश्न विचारून माझ्या मनातील काही शंका/गैरसमज दूर केले.

मी गेल्या दीड वर्षांपासून येथे काम करत आहे. आता मला या विविध समाजांबद्दल आपुलकी वाटते. या 'गे', 'टिजी', 'लेस्बियन' आणि 'जोगता' समाजाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. मी माझ्या मित्रांना माहिती देतो. लोकांमध्ये काही चुकीच्या कल्पना/गैरसमज मी दूर करण्याचा प्रयत्न करतो. हीसुद्धा माणसंच आहेत, त्यांना पण इज्जतीने जगता आलं पाहिजे.

**२०१६ च्या सुरवातीला श्री.बिंदुमाधव खिरे यांनी डॉ. जी. प्रसाद राव (अध्यक्ष IPS) यांजकडे भारतीय मानसोपचार संघटनेची लिंगभाव व समलैंगिकता याबद्दलची भूमिका लिखीत स्वरुपात मागितली होती. या विनंतीस मान देऊन मार्च २०१६ ला अशी भूमिका श्री.बिंदुमाधव खिरे यांस दिली गेली. या मूळ इंग्रजी भूमिकेचं मराठी भाषांतर सुरेश खोले, बिंदुमाधव खिरे व अनिल उकरंडे यांनी केले आहे. आम्ही डॉ. जी. प्रसाद राव यांचे मनापासून आभारी आहोत.**

# भारतीय मानसोपचार संघटनेची समलिंगी आकर्षण, कल, वर्तन आणि जीवनशैली याबद्दलची भूमिका

आधुनिक वैद्यकशास्त्र आणि मानसशास्त्राने १९७० च्या दशकापासूनच समलैंगिक कल आणि वर्तनाला आजार मानणे सोडून दिले आहे.[1] जागतिक आरोग्य संघटना समलिंगी कल हा मानवी लैंगिकतेचे एक सामान्य वेगळेपण आहे हे मान्य करते.[2] संयुक्त राष्ट्र संघटनेची मानवी हक्क परिषद समलिंगी स्त्री, पुरुष, उभयलिंगी आणि तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांना महत्त्व देते.[3]

अलीकडेच, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने मानवी अधिकारांच्या विरोधात जाऊन भा. दं. सं. कलम ३७७ वर निकाल देत समलिंगी संबंधांना परत गुन्हा ठरवले आहे.[4] भारतातील तत्कालीन परिस्थिती व अलीकडच्या काळातील वादविवाद पाहता यावर स्पष्टता येण्यासाठी खलील मत मांडले आहे.

भारतीय मानसोपचार संघटना समलिंगी अभिव्यक्ती आणि संस्कृतीचे वैश्विक अस्तित्व मान्य करते. भारतीय मानसोपचार संघटनेचा विश्वास आहे, की समलिंगी कल असल्याने वस्तुनिष्ठ पातळीवर मानसिक कार्यात दोष उत्पन्न होत नाहीत, तसेच निर्णयक्षमतेत, मानसिक स्थिरतेत व व्यावसायिक क्षमतेत कमरता भासत नाही.[5] भारतीय मानसोपचार संघटना समलिंगी आकर्षण, कल आणि वर्तन हे मानवी लैंगिकतेचे सामान्य वेगळेपण आहे असे मानते.[5] संघटना मानते, की मानवी लैंगिकता, लैंगिक कल, वर्तन व जीवनशैली यांच्या जडणघडणीत अनेक घटकांचा समावेश असतो. लैंगिक कल बदलण्यास शास्त्रीय उपचार उपलब्ध नसल्याची संघटनेला जाणीव आहे व कोणत्याही प्रकारे लैंगिक कल बदलण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे त्या व्यक्तीला अपाय होतो, त्याची हानी होते हे आम्ही अधोरेखित करू इच्छितो.[5]

समलिंगी कल असलेल्या व्यक्तींवरच्या सामाजिक कलंकाची व त्यातून त्यांच्यावर होणाऱ्या भेदभावाची संघटनेला जाण आहे.[5-6] त्यांना येणाऱ्या अडचणींमुळे त्यांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते व याकारणे या समाजासाठी पुरेशा मानसिक आधाराची तरतुद करण्यात यावी.[5-6]

भारतीय मानसोपचार संघटना समलिंगी कल आणि वर्तनाला गुन्हा ठरवणारे कायदे काढून टाकण्यासाठी पाठिंबा देते व LGBT व्यक्तींच्या मानवीय, सामाजिक आणि राजकीय हक्कांना पाठिंबा देते.[6] २१ व्या शतकात या लोकशाही राष्ट्रात, १९ व्या शतकातील ३७७ सारख्या कलमाची गरज नाकारत, कलम ३७७ काढून टाकण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देते. समलिंगी सहजीवन, नागरी सहजीवन, समलिंगी लग्न, समलिंगी व्यक्तींना मूल दत्तक घेण्याचा व पालकत्वाचा अधिकार मिळण्यासाठी संघटना पाठिंबा देते.[6] तसेच संघटना LGBT व्यक्तींसाठी दमदाटी/छेडछाड करण्याविरोधी कायदा करण्यास; विद्यार्थी, रोजगार आणि निवासव्यवस्था/घर मिळवण्यासंदर्भातले भेदभावविरोधी कायदे करण्यास; विदेशी स्थलांतराच्या कायद्यांमध्ये समानता आणण्यास व लैंगिक संबंधांसाठी संमतीच्या वयात समानता देणारे कायदे करण्यास पाठिंबा देते व त्याचबरोबर पूर्वग्रहदुषित दृष्टीतून समलिंगी, तृतीयपंथी समाजांवर होणाऱ्या हिंसात्मक गुन्ह्यांना अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या कायद्यांची निर्मिती करण्यास पाठिंबा देते.[6] भारताच्या संसदेने कलम ३७७ काढून टाकून प्रगतिभिमुख वारसा चिरकाळ टिकवण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना भारतीय मानसोपचार संघटना पाठिंबा देते.

**संदर्भ यादी**


1. American Psychiatric Association. Diagnostic and statistical manual of mental disorders III rd edition. Washington DC: APA 1980.
2. World Health Organization. International Classification of Disease 10: classification of behavioral and mental disorders. Geneva: WHO 1992.
3. United Nations Human Rights Office of the High Commissioner. Born Free and Equal: Sexual Orientation and Gender Identity in International Human Rights Law, New York and Geneva: Office of the High Commissioner, United Nations Humans Rights; 2012. Available from : http://www.ohchr.org/Documents/.....EqualLowRes.pdf. [Last accessed on 2013 Dec. 31]
4. Kuashal SK and another versus NAZ Foundation and others. Civil appeal NO.10972 of 2013. Available from: http://www.judis.nic.in/supremecourt/imgs1.aspx?filename=41070. [Last accessed on 2013 Dec 31]
5. Satyanarayana Rao T S. Jacob KS. Homosexuality and India. Indian Journal of Psychiatry, 2012; 54:1-3.
6. Satyanarayana Rao T S. Jacob KS. The Reversal of Gay Rights in India. Indian Journal of Psychiatry 2014: 56:1-2.



**Dr. G. PRASAD RAO**
M.D., D.P.M
ASHA HOSPITAL
**PRESIDENT**
INDIAN PSYCHIATRY SOCIETY

# BINDU QUEER RIGHTS FOUNDATION PUNE

CIN:U85300PN2019NPL182601
COMPANY INCORPORATED UNDER SECTION 8 OF COMPANY ACT, 2001

## बिंदू क्वियर राइट्स फौंडेशन, पुणे

### उपलब्ध सुविधा

- **हेल्पलाईन**

  +919763640480 **(सोमवारी संध्याकाळी ८ ते ९ फक्त)**
- **समुपदेशन (कौन्सिलिंग)** (आगाऊ अपॉईंटमेंट घेणे बंधनकारक)

  समलैंगिकता

  परालैंगिकता (तृतीयपंथी/ट्रान्सजेंडर)

  लिंगबदल शस्त्रक्रिया संदर्भात मार्गदर्शन/कयदेशीर सल्ला
- **रेफरन्स**

  मानसोपचारतज्ज्ञ

  एच. आय. व्ही/एडस् वर उपचार करणारे डॉक्टर

  गुप्तरोगावर उपचार करणारे डॉक्टर

  हारमोन्स थेरपी

  कायदेशीर सल्ला
- **बिंदुमाधव खिरे क्वियर सीड फंड इनिशिएटीव्ह (देश/विदेश)**

**संपर्क**

Email- bindumadhav.khire@gmail.com

Facebook page- bindumadhav khire

**संस्थापक : बिंदुमाधव खिरे**

**२०१६ च्या सुरवातीला श्री.बिंदुमाधव खिरे यांनी डॉ. दिनेश भुग्रा (अध्यक्ष WPA) यांजकडे जागतिक मानसोपचार परिषदेची लिंगभाव व समलिंगी लैंगिकता याबद्दलची भूमिका लिखीत स्वरुपात मागितली होती. या विनंतीस मान देऊन मार्च २०१६ ला अशी भूमिका श्री.बिंदुमाधव खिरे यांस दिली गेली. आम्ही डॉ. दिनेश भुग्रा यांचे मनापासून आभारी आहोत. या मूळ इंग्रजी भूमिकेचं मराठी भाषांतर सुरेश खोले, बिंदुमाधव खिरे व अनिल उकरंडे यांनी केले आहे.**

# जागतिक मानसोपचार परिषदेची लिंगभाव व समलिंगी लैंगिकता, आकर्षण व वर्तन याबद्दलची भूमिका

**पार्श्वभूमी**

अनेक देशांतील अलीकडच्या काळातले विवाद बघता समलैंगिक कल, आकर्षण आणि वर्तन यांवर अधिक स्पष्टता येणे गरजेचे होते.

इतर अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांप्रमाणेच, जागतिक मानसोपचार परिषद समलिंगी कल एक निसर्गदत्त बाब आहे असे मानून तिच्या जडणघडणीत जैविक, मानसिक, विकासात्मक आणि सामाजिक घटक असतात हे मानते.

पन्नास वर्षांपूर्वी किन्से व इ.(१९४८) यांनी लैंगिक वर्तनाच्या वैविध्यावर संशोधन केले. आश्चर्य म्हणजे त्या काळात त्यांना या वैविध्यात १०% पेक्षा जास्त जनसमूहामध्ये समलिंगी लैंगिक वर्तन आढळले. त्यानंतर झालेल्या संशोधनातून असे दिसून आले, की अंदाजे लोकसंख्येच्या ४% लोकांमध्ये समलिंगी/उभयलिंगी कल (यांत समलिंगी स्त्री, समलिंगी पुरुष व उभयलिंगी व्यक्ती येतात) आढळून येतो. या व्यतिरिक्त जनसमुदायाच्या ०.५% व्यक्ती अशा आहेत, ज्यांचा लिंगभाव त्यांच्या शारीरिक लिंगाशी संलग्न नसतो (उदा. ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी)) (गेट्स २०११). या सर्वांची बेरीज ही जागतिक लोकसंख्येमध्ये २५० दशलक्षपेक्षा जास्ती येते.

सर्व समाजघटकांतील सामाजिक विषमता कमी करणे (यात लिंगभाव आणि लैंगिक कल संदर्भातील विषमताही अंतरभूत आहे) ही मानसोपचारतज्ञांची सामाजिक जबाबदारी आहे.

वैद्यकीय इतिहासात जरी समलिंगी लैंगिक कल व वर्तन हे दुर्दैवाने सामाजिक कलंक व भेदभाव पोसण्यास/प्रोत्साहन देण्यास कारणीभूत असले तरी अद्ययावत वैद्यकीयशास्त्राने समलिंगी लैंगिक कल आणि वर्तन हा आजार किंवा विकृती आहे असे मानणे अनेक दशकांपूर्वीच सोडून दिलेले आहे (APA १९८०). जागतिक आरोग्य संघटना (WHO) समलिंगी कल हा मानवी लैंगिकतेचे एक सामान्य वेगळेपण आहे हे मान्य करते (WHO १९९२). संयुक्त राष्ट्र मानव अधिकर संघटना (२०१२) समलिंगी, उभयलिंगी आणि ट्रान्सजेंडर(तृतीयपंथी) व्यक्तींच्या हक्कांचा पुरस्कार करते. वैद्यकशास्त्रामध्ये रोगांच्या निदानासाठी आणि वर्गीकरणासाठी मार्गदर्शक म्हणून नामांकित असलेल्या दोन आतंरराष्ट्रीय

वर्गीकरणांमध्ये (रोगांचे आंतरराष्ट्रीय वर्गीकरण (ICD 10 आणि DSM 5) समलिंगी लैंगिकता, आकर्षण, वर्तन आणि व्यक्तीचा लिंगभाव त्याच्या लिंगापेक्षा वेगळा असणे आजार म्हणून ओळखल्या जात नाहीत. (WHO १९९३, APA २०१३).

लैंगिकतेविषयक झालेल्या अनेक संशोधनांमधून स्पष्ट झाले आहे, की लैगिंक वर्तन आणि लैंगिकतेत होणारे बदल हे अनेक कारणांवर अवलंबून असतात. (वेनट्रिग्लीओ व इ. २०१६)

अनेक संशोधनांनी निर्णयात्मकदृष्ट्या सिद्ध केले आहे, की समलिंगी, उभयलिंगी आणि ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) व्यक्तींमध्ये इतरांच्या तुलनेत जास्त प्रमाणात मानसिक आजार आढळून येतात, (लीवोउनिस व इ. २०१२, कालरा व इ. २०१५) पण जसजशी त्यांच्या अधिकारांना व समानतेला मान्यता मिळते तसतशी या आजारांच्या प्रमाणात घट दिसायला लागते. (गोंझालेस २०१४, हॅटझेनबुहेलर व इ.२००९, २०१२, पाडूला व इ. २०१५)

विभिन्न लैंगिक कल अथवा लिंगभाव असणाऱ्या व्यक्ती, आपले आयुष्य सहजतेने जगता यावे, ताण कमी व्हावा, समाजातील भेदभावाला सामोरे जाता यावे आणि स्वतःचा लैंगिक कल/लिंगभाव अधिक प्रमाणात स्वीकारणे शक्य व्हावे म्हणून मानसोपचारतज्ज्ञाच्या मदतीने विविध पर्याय शोधू शकतात. हे तत्त्व आपल्या लैंगिकतेविषयी ताण/संभ्रम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, मग ती विषमलिंगी लैंगिकता असणारी का असेना, लागू होते.

जागतिक मानसोपचार परिषद (WPA) पुरावाधिष्टित उपचार पद्धतीवर विश्वास ठेवते. व्यक्तीचा लैंगिक कल बदलता येतो असा कोणताही शास्त्रशुद्ध पुरावा नाही. पुढे जाऊन असे म्हणता येईल, की समलिंगी लैंगिक कल बदलण्याच्या ज्या तथाकथित उपचार पद्धती आहेत त्या या समाजाबद्दलचे असणारे पूर्वग्रह व होणारा भेदभाव यांना खतपाणी घालतात व हे या व्यक्तींसाठी हानिकारक ठरते (राव व जेकॉब २०१२). जो आजार नाही अशा अवस्थेला आजार मानून त्यावर कोणतेही 'उपचार' करणे पूर्णपणे अनैतिक आहे.

## कृती

१. जागतिक मानसोपचार परिषद असे मानते, की समलिंगी स्त्री/पुरुष, उभयलिंगी व ट्रान्सजेंडर(तृतीयपंथी) व्यक्ती हे समाजाचे महत्त्वपूर्ण घटक आहेत, ज्यांना इतर सर्व नागरिकांप्रमाणेच समान अधिकार व जबाबदाऱ्या आहेत. त्यात आरोग्य सेवेंचा समान अधिकार आणि नागरी समाजामध्ये जगण्यास आवश्यक असणारे सर्व अधिकार आणि जबाबदाऱ्यांचा समावेश होतो.

२. जागतिक मानसोपचार परिषद समलिंगी अभिव्यक्ती आणि संस्कृतीचे वैश्विक अस्तित्व मान्य करते. परिषद असे मानते, की समलैंगिक कल असल्याने वस्तुनिष्ठ पातळीवर मानसिक कार्यात दोष उत्पन्न होत नाही तसेच निर्णयक्षमतेत, मानसिक स्थिरतेत व व्यावसायिक क्षमतेत कमतरता भासत नाही.

३. जागतिक मानसोपचार परिषद समलिंगी आकर्षण, कल आणि वर्तन हे मानवी लैंगिकतेचे एक सामान्य वेगळेपण आहे असे मानते. परिषद मानते, की मानवी लैंगिकता, लैंगिक कल, वर्तन व जीवनशैली यांच्या जडणघडणीत अनेक घटकांचा समावेश असतो. लैंगिक कल बदलण्यास शास्त्रीय उपचार उपलब्ध नसल्याची परिषदेला जाणीव आहे व कोणत्याही प्रकारे लैंगिक कल बदलण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे

त्या व्यक्तीला अपाय होतो, त्याची हानी होते हे आम्ही अधोरेखित करू इच्छितो.

४. समलिंगी लैंगिक कल असलेल्या व्यक्ती आणि ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) व्यक्तींवरच्या सामाजिक कलंक व त्यातून त्यांच्यावर होणाऱ्या भेदभावाची जागतिक मानसोपचार परिषदेला पूर्ण जाणीव आहे. त्यांना येणाऱ्या अडचणींमुळे त्यांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते व याकारणे या समाजासाठी पुरेशा मानसिक आधाराची तरतुद करण्यात यावी.

५. जागतिक मानसोपचार परिषद समलिंगी कल, वर्तन आणि आपल्या शारीरिक लिंगापेक्षा वेगळा लिंगभाव असणाऱ्या व्यक्तींना गुन्हेगार ठरवणारे कायदे काढून टाकण्यासाठी पाठिंबा देते व LGBT व्यक्तींच्या मानवीय, सामाजिक आणि राजकीय हक्कांना पाठिंबा देते. तसेच LGBT व्यक्तींसाठी दमदाटी/छेडछाड करण्याविरोधी कायदा करण्यास; विद्यार्थी, रोजगार आणि निवासव्यवस्था/घर मिळवण्यासंदर्भातले भेदभावविरोधी कायदे करण्यास; विदेशी स्थलांतराच्या कायद्यांमध्ये समानता आणण्यास व लैंगिक संबंधांसाठी संमतीच्या वयात समानता देणारे कायदे करण्यास पाठिंबा देते. त्याचबरोबर पूर्वग्रहदूषित दृष्टीतून समलिंगी, तृतीयपंथी समाजांवर होणाऱ्या हिंसात्मक गुन्ह्यांना अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या कायद्यांची निर्मिती करण्यास पाठिंबा देते.

६. समलिंगी, उभयलिंगी आणि ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) व्यक्तींचे मानसिक आरोग्य सुदृढ व्हावे/राहावे यासाठी होत असलेल्या वैद्यकीय व सामाजिक उपक्रमांवर पुरावाधिष्टित संशोधनाची व अशा पुरावाधिष्टित विकास कार्यक्रमांच्या निर्मितीची गरज आहे असे जागतिक मानसोपचार परिषद मानते.

## संदर्भ यादी


1. American Psychiatric Association (1980). *Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders* (3rd edition). Washington, DC: APA.
2. American Psychiatric Association (2013). *Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders (DSM-5)* (5th edition).Washington, DC: APA.
3. Gates GJ (2011). How many people are lesbian, gay, bisexual and transgender? Access March 4, 2016. Available at: http://williamsinstitute.law.ucla.edu/wp-content/uploads/Gates-How-Many-People-LGBT-Apr-2011.pdf.
4. Gonzales, G (2014). Same-sex marriage – a prescription for better health. *New England Journal of Medicine* 370:1373- 1376.
5. Hatzenbuehler ML, Keys KM, Hasin D. (2009). State-level policies and psychiatric morbidity in lesbian, gay and bisexual populations. *American Journal of Public Health*, 99: 2275-2281.
6. Hatzenbuehler ML, O'Cleingh C, Grasso C, Meyer K, Safren S, Brandford J (2012). Effect of same sex marriage laws on health care use and expenditure in sexual minority men: a quasi –natural experiment. *American Journal of Public Health*, 102: 285-291.
7. Kalra G, Ventriglio A, Bhugra D (2015). Sexuality and mental health: issues and what next? *International Review of Psychiatry*, 27: 463-469.
8. Kinsey AC, Pomeroy CB, Martin CE (1948). *Sexual Behavior in the Male*. Bloomington, IN: Indiana University Press.
9. Levounis P, Drescher J, Barber ME (2012). *The LGBT Casebook*. Washington, DC: APA.
10. Padula William V, Heru S, Campbell JD (2015). Societal Implications of Health Insurance Coverage for Medically Necessary Service in the US Transgender Population: A Cost-Effectiveness Analysis. *Journal Of General Internal Medicine*: 1-8
11. Rao TSS, Jacob KS (2012). Homosexuality and India. *Indian Journal of Psychiatry*, 54: 1-3.

12. United Nations Human Rights Office of the High Commissioner (2012). *Born Free and Equal: Sexual Orientation and Gender Identity in International Human Rights Law*. New York and Geneva: Office of the High Commissioner United Nations Human Rights; 2 Available from:
13. http://www.ohchr.org/Documents/.....EqualLowRes.pdf. [Last accessed on 2013 Dec 31]
14. Ventriglio A, Kalra G, Bhugra D (2016). Sexual minorities and sexual fluidity. Discussion paper (available from authors).
15. World Health Organization (WHO) (1992). *International Classification of Disease 10: Classification of Behavioral and Mental Disorders*. Geneva: WHO.

**जिनिव्हा २०१६**

जागतिक मानसोपचार परिषदेच्या पुढील गटानी वरील भूमिका तयार केली- डॉ. क्रिस्टेन एक्सत्रांड (यु.एस.ए.), पेट्रोस लेवोउनीस (यु.एस.ए.), अनिंद्या कर (भारत), केनेथ आर जावते (फिलिपीन्स). प्रा.दिनेश भुग्रा यांनी गटप्रमुख म्हणून भूमिका बजावली.

**संदर्भ :** जागतिक मानसोपचार परिषदेची लिंगभाव व समलिंगी लैंगिकता, आकर्षण व वर्तन या बद्दलची भूमिका. मार्च २०१६.

# शांतीची गोष्ट (तामीळनाडू)

**'इंटरसेक्स एक प्राथमिक ओळख' (लेखक बिंदुमाधव खिरे, प्रकशक समपथिक ट्रस्ट, पुणे) या पुस्तकातून एका द्विलिंगी व्यक्तीची ही गोष्ट पुनर्मुद्रीत करत आहोत.**

*शांतीला भेटायचा किंवा तिच्याशी बोलायचा योग आला नाही. ती तामीळनाडूमध्ये एक छोट्याशा गावात राहत असल्यामुळे तिला तिथे जाऊन भेटणं शक्य नव्हतं. काही संस्था व पयोष्नी मित्रा यांच्याकडून तिच्याशी संपर्क होऊ शकतो का? हा प्रयत्न मी केला. पण त्याला यश आलं नाही. म्हणून मी तिची कथा वर्तमानपत्रातील लेख, पयोष्नीचं 'ध कान्ट आय रन?' या शांतीवर काढलेल्या डॉक्युमेंटरीच्या आधारावर लिहिली आहे.*

**– बिंदुमाधव खिरे**

शांती सौंदराजन तामीळनाडूतल्या एका छोट्याशा गावी एका गरीब, दलित कुटुंबात लहानाची मोठी झाली. वडील मजुरी करायचे.

शांतीला लहानपणापासून खेळाची खूप आवड. तिला आजोबांचं प्रोत्साहन मिळालं. पुरेसा पौष्टिक आहार नसतानासुद्धा तिने दौडीत उत्कृष्ट कामगिरी केली व ११वी-१२वीत ती तामीळनाडू राज्यासाठी खेळू लागली. २००२ मध्ये तिला राष्ट्रीय स्पर्धेतील दौडीत सुवर्णपदक मिळालं. २००५ मध्ये तिला आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप्स स्पर्धेत ८०० मीटर दौडीत चांदीचं पदक मिळालं.

२००६ मध्ये तिने दोहा (कतार)येथे आशियाई स्पर्धेत भाग घेतला. तिथे तिला दौडीत चांदीचं पदक मिळालं. त्यानंतर तिची 'जेन्डर टेस्ट' करण्यात आली. त्याचा निकाल तिला कोणी सांगितला नाही. नंतर तिला बातम्यांमध्ये कळालं, की ती 'जेन्डर टेस्ट' अनुत्तीर्ण झाली. सांगण्यात आलं, की तिला वैद्यकीयदृष्ट्या स्त्री मानता येत नाही. याचा तिला व तिच्या घरच्यांना मोठा धक्का बसला; त्यांना खूप दु:ख झालं. दोहामध्ये झालेल्या स्पर्धेत मिळालेलं चांदीचं पदक तिच्याकडून काढून घेतलं गेलं. तिला खेळाचं क्षेत्र सोडून जाण्यास सांगितलं गेलं.

काही प्रसारमाध्यमांनी सांगितलं, की शांतीला 'अँड्रोजेन इन्सेन्सिटिव्हिटी सिंड्रोम' आहे (म्हणजे लिंग गुणसूत्रानुसार ती मुलगा आहे पण तिच्यात अँड्रोजन संप्रेरकं तयार होत असली तरी या संप्रेरकांचा वापर तिच्या शरीराच्या पेशी करून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे तिची जननेंद्रियं पुरुषाची म्हणून विकसित झाली नाहीत. बाह्य जननेंद्रिय स्त्रीची बनली. मासिक पाळी आली नाही. छाती सपाट राहिली). शांतीचा लिंगभाव स्त्रीचा होता व ती सर्वांना हेच सांगत होती, 'मी स्त्री आहे', पण तिच्या लिंगभावाला खेळाच्या कायद्यात काही किंमत नव्हती.

परिस्थिती बिकट होत गेली. आशियाई स्पर्धेच्या अगोदर तिने भारतीय रेल्वेत नोकरीसाठी अर्ज केला होता; पण या घडामोडीनंतर तिला कुठे नोकरी मिळेना. समाजातील इज्जत गेली. शांतीने सर्वांची

फसवणूक केली असे तिच्यावर लोक आरोप करू लागले. तिच्याकडे लोक वेगळ्या नजरेने बघू लागले– 'हा पुरुष आहे का कोण आहे?' तिची आई म्हणाली, "घरच्या एकावर संकट कोसळलं की त्याचा इतरांवर परिणाम होतो. तिच्या बहिणींची आता लग्न होणार का?"

शांतीला खूप नैराश्य आलं. पोटापाण्यासाठी ती विटेच्या भट्टीत काम करू लागली. तिला आधार द्यायला कोणी नव्हतं. ती म्हणते, "मला 'तामीळनाडू ॲथलेटिक असोसिएशन', 'इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन', 'ॲथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया' यापैकी कोणीही मदत केली नाही. कास्टर सेमेन्याच्या पाठीशी तिचा देश उभा राहिला. माझ्या बाजूने मात्र कोणीच उभं राहिलं नाही. मी जर दलित नसते किंवा श्रीमंत असते तर माझी ही अवस्था झाली नसती."

आपलं सर्व कर्तृत्व मातीला मिळाल्यामुळे तिची जगण्याची उमेदच संपली. २००७ मध्ये नैराश्याच्या भरात तिने विष पिऊन आत्महत्या करायचा प्रयत्न केला, पण ती बचावली.

कालांतराने शांतीने स्वत:ला सावरलं. आपल्याशिवाय आपल्या वयस्कर आईवडिलांकडे बघायला कोणी नाही; बहिणींची लग्नं बाकी आहेत; म्हणून आपण असं हार मानून चालणार नाही; आपल्याला जरी खेळता आलं नाही तरी इतर अनेक जण आहेत, ज्यांना आपण प्रशिक्षण देऊन पुढे आणू शकतो; अशाने आपल्याला समाधान व आनंद मिळेल असा विचार करून ती परत उमेद धरू लागली.

तामीळनाडूचे मुख्यमंत्री एन. करुणानिधी यांनी रुपये ५०००/– महिना मानधनावर तिची प्रशिक्षक म्हणून नेमणूक केली. जिल्ह्यातील नव्या खेळाडूंना ती प्रशिक्षण देऊ लागली. कालांतराने तिने 'स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया' (SAI)च्या बेंगलोर सेंटरमध्ये 'नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ स्पोर्ट्स' (NIS)चा प्रशिक्षकाचा डिप्लोमा करण्यासाठी अर्ज केला. तिला तिची खेळाशी जोडलेली नाळ तोडायची नाही. तेच तिचं विश्व आहे; पण मार्ग मात्र आता बदलला आहे.

शांतीचं वैयक्तिक, कौटुंबिक आयुष्य कसं असणार आहे? याबाबत तिची आई म्हणाली, "तिने लग्न करायचं का नाही हा तिचा निर्णय असेल." शांती म्हणाली, की तिला माहीत नाही, की तिच्या आयुष्यात पुढे काय लिहून ठेवलं आहे.

# तरीही कधीकधी वाटते



अभिजित गडाख

अभिजित गडाख हे नाशिकमध्ये राहत असून ते MBA करत आहेत.
त्यांना लिखाण, अभिनय, डान्स, मॉडेलिंग आणि फोटोग्राफीमध्ये रूची आहे.
**ईमेल -** abhijitgadakh123@gmail.com

नकळत कोणत्या क्षणी, तुझीमाझी भेट झाली, तळमळणाऱ्याला दोन ह्रदयांची भेट अगदी थेट झाली. समाज काय म्हणेल; याची पर्वा न करता तो आणि मी अगदी बेफिकीर राहतो, अर्थात प्रेम म्हणजे प्रेम असतं तुमचं आमचं सेम असतं हे पटवून सांगण्यात आम्ही बहुतांशी सफल झालो, तरीही या लोकांच्या चोरट्या नजरा बघून कधी कधी वाटते...

कधी कधी वाटते,
एका अशा ठिकाणी जावे.
''तो आणि मी''
सोबत दुसरे कोणीही नसावे.
दूर ती वाट असावी
कोणाचीही पाऊले तिथे कधीच न पडावी
लाल मातीचा गंध असावा
धुंद गंधाने त्याच्या, हवेत गारवा घुमावा.
हात तुझा माझ्याच हातात असावा
ओठांवरती ओठ असावेत
हवेच्या नाजूक झुळकीने
मनाला माझ्या भेदून जावे.
स्पर्शाने तुझ्या मग
हे देह अगदी रोमांचित व्हावे
धुंद त्या क्षणी भावनांचे काहूर माजावे
आणि मधूरमिठीत तुझ्या
माझे सर्व विश्व एकरूप व्हावे

रजि.नं- इ ३६६२

स्थापना-११/०९/२००२

SAMAPATHIK TRUST

समपथिक ट्रस्ट, पुणे

## समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी समाजाच्या अधिकारांसाठी

वार्षिक कार्यक्रम

- **LGBTI** अभिमान पदयात्रा आयोजन/मार्गदर्शन करणे.
- 'अद्वैत' पुणे क्वियर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव.
- 'मूकनायक' **LGBTI** मराठी साहित्य संमेलन.

विक्रीसाठी उपलब्ध पुस्तके

- पार्टनर (किंमत ४० रुपये)
- इंद्रधनू- समलैंगिकतेचे विविध रंग (किंमत १२५ रुपये )
- अतरंग- समलिंगी मुला/मुलींच्या आत्मकथा (किंमत १५० रुपये)
- सप्तरंग- ट्रान्सजेंडर व तृतीयपंथी मुला/मुलींच्या आत्मकथा (किंमत १२५ रुपये)
- मनाचिये गुंती- समलिंगी मुला/मुलींच्या पालकांच्या आत्मकथा (किंमत ९० रुपये)
  (या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर **Beautiful people** किंमत १०० रुपये)
- इंटरसेक्स- एक प्राथमिक ओळख (किंमत १२५ रुपये)

**संपर्क**

**samapathik@hotmail.com**

**Facebook Page- bindumadhav khire**

संस्थापक: बिंदुमाधव खिरे

अंकासाठी अर्थसहाय्य

Being Equal — Being LGBTQ in India

THE HUMSAFAR TRUST

ViiV Healthcare

SAMAPATHIK TRUST

रजि.नं- इ ३६६२

स्थापना-११/०९/२००२

SAMAPATHIK TRUST

समपथिक ट्रस्ट, पुणे

**समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी समाजाच्या अधिकारांसाठी**

वार्षिक कार्यक्रम

- **LGBTI** अभिमान पदयात्रा आयोजन/मार्गदर्शन करणे.
- 'अद्वैत' पुणे क्वियर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव.
- 'मूकनायक' **LGBTI** मराठी साहित्य संमेलन.

विक्रीसाठी  उपलब्ध पुस्तके

- पार्टनर (किंमत ४० रुपये)
- इंद्रधनू- समलैंगिकतेचे विविध रंग (किंमत १२५ रुपये )
- अतरंग- समलिंगी मुला/मुलींच्या आत्मकथा (किंमत १५० रुपये)
- सप्तरंग- ट्रान्सजेंडर व तृतीयपंथी मुला/मुलींच्या आत्मकथा (किंमत १२५ रुपये)
- मनाचिये गुंती- समलिंगी मुला/मुलींच्या पालकांच्या आत्मकथा (किंमत ९० रुपये)
  (या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर **Beautiful people** किंमत १०० रुपये)
- इंटरसेक्स- एक प्राथमिक ओळख (किंमत १२५ रुपये)

**संपर्क**

**samapathik@hotmail.com**

**Facebook Page- bindumadhav khire**

संस्थापक: बिंदुमाधव खिरे

अंकासाठी अर्थसहाय्य

Being Equal

Being LGBTQ in India

THE HUMSAFAR TRUST

ViiV Healthcare

SAMAPATHIK TRUST